CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | गुरुवार, ३ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४५ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

कोलकाता रायडर्स वि. सनरायजर्स हैद्राबाद

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : ईडन गार्डन, कोलकाता



राष्ट्रहिताची सुरक्षा सर्वतोपरी मानून या सुरक्षेचा जागृत प्रहरी म्हणून संघ कार्य करीत आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाच्या, गटाच्या, वर्गाच्या वा व्यक्तीच्या राष्ट्रविरोधी कारवाया संघ चालू देणार नाही.

**-तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस**

# बीडमधील सर्व गँगना सुतासारखे सरळ करणार : अजित पवार

- सध्या गाजत असलेल्या राखवाल्या गँगलाही गंभीर इशारा
- चुलत्याच्या कृपेने बरं चालल्याचे अजितदादांकडून अखेर मान्य
- आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नसल्याची दादांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड, दि.२ एप्रिल**

बीड : राख गोळा करणारी गँग, वाळू तस्करीची गँग, भूखंड गँग या सगळ्या गँगना सुतासारखे सरळ करणार, कुणाच्याही दबावाला तुम्ही घाबरु नका. आज मी महसूल खात्याच्या सचिवालाही आणले आहे. मी सगळी यंत्रणा व्यवस्थित राबवतो, तुम्हाला कळेल कामाचा वेग वाढला आहे. रस्ता नुसता मंजूर करुन जो बिले काढेल त्याला नाही मातीत घातला तर बोला. असंही अजित पवार म्हणाले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज बीड दौऱ्यावर आहेत. आपल्या बीडमधील भाषणात त्यांनी युवकांना उद्देशून अनेक मोलाचे सल्ले दिले. बोलताना भान बाळगा हे सांगत असतानाच पुढाऱ्यांच्या पाया पडायचे असेल तर त्याची हिस्ट्री आठवा असाही सल्ला दिला. तसंच माझ्या पाया पडायला येऊ नका, हार, टोप्या, मानचिन्ह काही देऊ नका, चुलत्याच्या कृपेने आमचं बरे चालले आहे असेही म्हणाले. अजित पवारांनी शरद पवारांचं नाव घेतले नाही पण त्यांचा उल्लेख केला. अनेकदा सोशल मीडियाचाही वापर चांगल्या पद्धतीने होत नाही. व्हॉटस्ॲपवरुन काहीतरी मेसेज करायचे. चुकीचं काहीतरी पाठवायचं. आमचे नेते म्हणजे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार पदावर बसले आहेत. त्यामुळे आता मला कोण काय बोलणार आहे? या गैरसमजात राहू नका. मेसेज डिलिट केला तरीही सगळे मेसेज मिळतात. अशा गोष्टी केल्या आणि अडकलात तर मी सोडवायला येणार नाही. काही लोकांना तर मी मकोका लावायला सांगितला आहे. मी कुणाचीही दादागिरी खपवून घेणार नाही हे लक्षात ठेवा असाही इशारा अजित पवारांनी दिला. आपल्याला पुढे जायचे असेल तर सर्वधर्म समभाव जपला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना सगळ्या समाजांना घेऊन स्वराज्याची स्थापना केली. विशिष्ट समाजाचेच लोक महाराजांच्या दरबारी होते, असे काहीजण सांगतात त्याला काही अर्थ नाही. महाराजांच्या दरबारी अल्पसंख्याक समाजातले ही लोक होते. एका धार्मिक स्थळाजवळ जिलेटिन उडवण्यात आले ही विकृती असल्याचेही अजित पवार म्हणाले.

### दादांनी काकांना आशिर्वादापुरतेच मर्यादित ठेवले : देवेंद्र फडणवीस

अजित पवारांच्या विधानावर प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अजित पवार बरोबर म्हणाले. मोठ्यांचे आशीर्वाद घ्यायचे असतात. काकांना त्यांनी आशीर्वादापुरतेच त्यांनी मर्यादित ठेवले आहे. हे तुम्ही लक्षात घ्या.



### चुलत्याच्या कृपेने आमचे बरे चालले आहे : अजित पवार



शाली आणू नका, टोप्या घालू नका, हार घालू नका नमस्कार करा तेवढे बरे वाटेल. जेवढा मोठा हार तेवढी भीती वाटते. याने काहीतरी केलंय त्यामुळे हाराचा बोजा आहे आता आमच्यावर. आई-बापाच्या कृपेने, चुलत्याच्या कृपेने बरे चालले आहे आमचे. आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत. ज्याच्या पाया पडता त्याची हिस्ट्री आठवा तुम्हीच म्हणाल मी कुणाच्या पाया पडलो, आई-बापांच्या पाया पडा, गुरुंच्या पाया पडा, पुढाऱ्यांच्या पाया पडू नका. असंही अजित पवार त्यांच्या भाषणात म्हणाले. गुरु जो आपल्याला शिकवतो त्यांच्या पाया पडा. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील ही आभाळाएवढी माणसं होती. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, आई जिजाऊ, बाबासाहेब आंबेडकर, मौलाना आझाद, अण्णा भाऊ साठे अशा किती जणांची नावं घेऊ त्यांच्यापुढे नतमस्तक व्हा. उगीचच पाया पडणं लाचारी पत्करल्यासारखं वाटतं असं मी तरुणांना सांगतो, राम राम किंवा नमस्कार करा की. सलाम वालेकुम म्हणा काय हरकत आहे? सगळ्या धर्मांचा आदर केला पाहिजे असेही अजित पवार म्हणाले. काका शरद पवारांची कृपा असल्याचे अखेर अजितदादांनी मान्य केल्याने अनेकांच्या भुवया नक्कीच उंचावल्या असणार आहेत.

# बाळासाहेबांच्या विचारांचा अंश बाकी असल्यास वक्फ बिलाला विरोध करणार नाहीत

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ठाकरेंना टोला

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२ एप्रिल**

वक्फ संशोधक सुधारणा विधेयक हे कुठल्याही समाजाच्या किंवा धार्मिक आस्थांच्या विरोधातील नाही. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा अंश त्यांच्यामध्ये बाकी असेल तर ते बिलाला विरोध करणार नाहीत. असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे गटाचे शिवसेनेला बुधवारी लगावला.



संसदेत बुधवारी वक्फ सुधारणा बिल सादर करण्यात आले. त्याला ठाकरे गटाने विरोध दर्शविला आहे .त्याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले की, हे विधेयक कोणत्याही धर्माच्या किंवा समाजाच्या विरोधात नाही. त्यामुळे आस्थेलालाही धक्का पोहोचणार नाही .मात्र मागच्या मागच्या बीलामध्ये ज्या चुका होत्या, त्यामुळे जमिनी लाटल्या जात होत्या. त्याला प्रतिबंध लागणार आहे. ट्रिपल तलाक विरोध विधेयकानंतर आता या सुधारणा विधेयकामुळे मुस्लिम भगिनींना वक्फ बोर्डात प्रतिनिधित्व मिळणार आहे.

त्यामुळे ज्याची ज्याची सदविवेक बुद्धी जागृत आहेत ते या विधेयकांचं स्वागत करतील, वक्फ बील पुर्णपणे पास होईल असा विश्वास आहे, सेक्युलर शब्दाचा प्रत्यय बिलातून पाहायला मिळत आहे. मात्र विरोधी पक्ष मताची लाचारी असल्यामुळे , मताच्या लांगुनचालनासाठी हे बिलाला विरोध करत आहेत ,असे सांगून उद्योगपती धन सम्राट यांना जमिनी बाळकाविण्यासाठी विधेयकांच्या विरोधकांच्या आरोपाला प्रत्युत्तर देताना ते म्हणाले की, ' विरोधक या संदर्भातील एकही पुरावा संसदीय समितीपुढे आणू शकले नाहीत, जेव्हा काहीही उरत नाही त्यावेळी अशा गोष्टी मांडल्या जातात. विरोधकांनी छातीवर हात ठेवून विचार केला तर लक्षात येईल की विरोधी पक्ष मताची लाचारी असल्यामुळे विरोध करत आहेत. मताच्या लांगुनचालनासाठी हे बिलाला विरोध करत आहेत.

बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा अंश त्यांच्यामध्ये बाकी असेल तर ते बिलाला विरोध करणार नाहीत. विधेयकाला समर्थन देतील अशी माझी अपेक्षा आहे. असे सांगून संजय राऊत यांनी विचारलेल्या प्रश्नांवर खोचक टोला लगावताना ते म्हणाले,' कोण आहेत ते? तुम्ही माझ्या लेव्हलचे प्रश्न विचारत जा, नाहीतर मला तुमच्या बुद्धीची कीव येते.

## महत्त्वाचे

### कुणाल कामराला दिलासा; अटकपूर्व जामीन

चेन्नई : विनोदी कलाकार कुणाल कामरा याला तामिळनाडूच्या एका न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या विनोदाबद्दल कायदेशीर खटल्यांना सामोरे जात असलेल्या कामरा याला तामिळनाडूतील वानूर येथील जिल्हा मुन्सिफ- कम-न्यायिक दंडाधिकारी न्यायालयाने संक्रमण अटकपूर्व जामीन मंजूर केला. ट्रान्झिट ॲन्टिसिपेटरी जामिनामुळे अटकेपासून तात्पुरते संरक्षण मिळते. कुणाल कामरा यांनी मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली होती व ट्रान्झिट ॲन्टिसिपेटरी जामिनासाठी अर्ज केला होता, त्यामुळे एफआयआर नोंदवलेल्या अधिकारक्षेत्रापेक्षा वेगळ्या अधिकारक्षेत्रात अटकेपासून तात्पुरते संरक्षण प्रदान करतो.

### पाकिस्तानी लष्कराच्या घुसखोरीचा प्रयत्न उधळला

**श्रीनगर** : आतापर्यंत अतिरेक्यांना घुसखोरी करण्यासाठी मदत करणाऱ्या पाकिस्तानी लष्कराने पूंछ जिल्ह्यातील कृष्णा घाटी परिसरात केलेला घुसखोरीचा प्रयत्न भारतीय लष्कराने मंगळवारी पराक्रम गाजवत उधळून लावला. पाकिस्तानी आगळीकीला चोख प्रत्युत्तर देत लष्कराने चार ते पाच घुसखोरांचा खात्मा केला. पाकिस्तानी सैनिकांनी आणि घुसखोरांनी मंगळवारी अंदाधुंद गोळीबार भारतीय लष्करावर केला. भारतीय जवानांनी त्याला चोख प्रत्युत्तर दिले. भारताच्या जवानांनी केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे मोठे नुकसान झाल्याची माहिती गुप्तचर सूत्रांनी दिली. पाकिस्तानने संघर्षविरामाचे उल्लंघन केल्याच्या वृत्ताला अलिकडच्या काही महिन्यांत भारतीय लष्कराने प्रथमच दुजोरा दिला आहे.

### मध्यप्रदेशात दोन महिला नक्षलवाद्यांचा खात्मा

**भोपाळ** : मध्यप्रदेशातील मंडला जिल्ह्यात दोन जहाल महिला नक्षलवाद्यांचा पोलिसांनी चकमकीत खात्मा केला. या दोघींच्या शिरावर एकूण १४ लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली. बिछिया पोलिस ठाणे हद्दीत ही चकमक झडली, अशी माहिती पोलिस महासंचालक कैलाश मकवाना यांनी दिली. घटनास्थळावरून सेल्फ लोडिंग रायफल, एक साधी रायफल, वायरलेस सेट आणि दैनंदिन वापराच्या वस्तू जप्त केल्या. चकमकीत ठार झालेल्या दोन्ही महिला नक्षलवाद्यांच्या शिरावर एकूण १४ लाख रुपयांचे बक्षीस होते, अशी माहिती मुख्यमंत्री मोहन यादव यांनी दिली.

### निवडणूक आयोगाचा संवाद उपक्रम

**नवी दिल्ली** : राजकीय पक्षांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी निवडणूक आयोगाने संवाद उपक्रम राबवला आहे. आयोगाने ४ हजार ७१९ बैठका घेतल्या, तर २८ हजार प्रतिनिधींशी चर्चा केली. या माध्यमातून पक्षांच्या प्रलंबित समस्या सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. देशभरातील सर्व मतदारसंघात आयोजित करण्यात आल्या.

# वक्फ दुरुस्ती कायदा सगळ्यांना मान्य करावा लागेल : अमित शाह

**नवी दिल्ली, २ एप्रिल**

वक्फ दुरुस्ती कायदा हा संसदेचा कायदा आहे, तो सगळ्यांना मान्य करावाच लागेल, या शब्दात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज विरोधकांना ठणकावले. चर्चेदरम्यान विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्यांवर स्पष्टीकरण देत विरोधकांना सडेतोड उत्तर दिले. गृहमंत्री बोलत असताना विरोधकांनी हंगामा करण्याचा प्रयत्न केला पण अमित शाह सर्वांना पुरून उरले.

वक्फ दुरुस्ती कायद्यावरील लोकसभेतील चर्चेत सहभागी होतांना अमित शाह यांनी या विधेयकाचे जोरदार समर्थन करतांना विरोधकांच्या सर्व आक्षेपांचे मुद्देसूद निराकरण केले. देशातील अल्पसंख्य समाज हा कायदा मान्य करणार नाही, याकडे एका सदस्याने लक्ष वेधले असता, संसदेने बनवलेला कायदा सगळ्यांना मान्य करावाच लागेल, असे शाह म्हणाले.

हा कायदा पूर्वलक्षी प्रभावाने लागू केला जाईल, असा अपप्रचार केला जात आहे, याकडे लक्ष वेधत शाह म्हणाले की, या विधेयकातील सुरुवातीच्या परिच्छेदातील काही ओळी वाचल्या असत्या, तर सरकार या कायद्याबाबतची अधिसूचना ज्या दिवशी जारी करेल, त्या दिवसापासूनच हा कायदा देशात लागू होणार आहे.



कोणतीही जमीन ताब्यात घेण्याचा, त्यावर दावा करण्याचा वक्फ मंडळाचा अधिकार आम्ही या विधेयकातून काढून घेतला आहे, असे स्पष्ट करत शाह म्हणाले की, यामुळे पुरातत्व विभागाची, आदिवासी बांधवांची तसेच सर्वसामान्य जनतेची जमीन सुरक्षित होणार आहे. आपली संपत्ती दान करता येते, गावाची संपत्ती यापुढे दान करता येणार नाही.

देशातील बहुतांश मुस्लिमांना वक्फ मंडळाचे नियंत्रण मान्य नाही, असे मुस्लिम यापुढे आपला न्यास नोंदणी करु शकतील. कोणती जमीन वक्फची आहे, वा नाही, हे प्रमाणित करण्याचा अधिकार आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे, असे ते म्हणाले. *(तभा वृत्तसेवा)*

### २०१३ नंतर जमिनीत २१ लाख एकरने वाढ

१९१३ ते २०१३ पर्यंत देशातील वक्फ मंडळाकडे १८ लाख एकर जमीन होती, मात्र २०१३ मध्ये एक अन्याय कायदा काँग्रेसने मुस्लिमांच्या तुष्टीकरणासाठी तसेच गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी पारित करण्यात आल्यानंतर वक्फ मंडळाकडील जमिनीत २१ लाख एकराने वाढ होत ती ३९ लाख एकर झाली आहे. २०१३ नंतर वक्फ मंडळाकडील जमीन २१ लाख एकराने वाढली, हे आपल्याला लक्षात घ्यावे लागेल.

### भ्रष्टाचार करणाऱ्यांना पकडण्याचे काम परिषद करेल

वक्फ मंडळात एकही गैरमुस्लिम सदस्य राहणार नाही, असा निर्वाळा देत शाह म्हणाले की, वक्फच्या संपत्तीचा भ्रष्टाचार करणाऱ्यांना पकडण्याचे काम वक्फ मंडळ आणि वक्फ परिषद करणार आहे. २०१३ मध्ये वक्फ कायद्यात सुधारणा केली नसती, तर त्यात दुरुस्ती करण्याची वेळच आमच्यावर आली नसती, असे ते म्हणाले.



# भोपाळमध्ये मुस्लिम महिलांचे वक्फ दुरुस्तीला समर्थन

### 'धन्यवाद मोदीजी'चे फलक झळकावले

**भोपाळ, २ एप्रिल**

एकीकडे वक्फ दुरुस्ती विधेयकावर संसदेत चर्चा सुरू असताना मध्यप्रदेशातील भोपाळमध्ये मुस्लिम समुदायातील काही लोकांनी या विधेयकाच्या समर्थनार्थ फटाके फोडून आनंद व्यक्त केला.

आनंदपुरा आणि कोकटा भागात बुरखा घातलेल्या मुस्लिम महिलांनी हातात गुलाबाचे फूल धरले होते. त्यांनी धन्यवाद, मोदीजी आणि आम्ही मोदीजींना पाठिंबा देतो, असे लिहिलेले फलक हातात घेतले होते. भोपाळमधील हाताई खेडा धरणाजवळही उत्सव साजरा करण्यात आला.

दरम्यान, हुजूर येथील भाजप आमदार रामेश्वर शर्मा म्हणाले, भोपाळच्या लोकांना चांगलेच माहिती आहे की आरिफ नगरमधील वक्फच्या मालमत्तेत कोण व्यवहार करत आहे? हे पैसे कोण खात आहे? पूर्वी काँग्रेस खासदार या मालमत्तेचा गैरवापर करत होते आणि आता काँग्रेस आमदारही त्याचा गैरवापर करत आहेत. या मालमत्तेचा योग्य हिशेब कोणाकडे आहे? ही मालमत्ता योग्य हातात असावी जेणेकरून सरकार तिचा वापर गरिबांच्या उन्नतीसाठी करू शकेल. आमदार शर्मा म्हणालेआम्हाला गरिबीत जगणारा भारत नको आहे. जर एखादा मुस्लिम गरीब राहिला तर त्याचे संपूर्ण आयुष्य पंचर दुकानात जाईल. अशा परिस्थितीत, भारताची अर्थव्यवस्था प्रगती करत आहे असे आपण कसे म्हणू शकतो? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४० कोटी देशवासीयांचा विचार केला आहे, तर काँग्रेसने फक्त काही गुंड आणि गुन्हेगारांचा विचार केला आहे

# नवीन वीज दराच्या आदेशाला अखेर स्थगिती

### वीज नियामक आयोगाने मान्य केली महावितरणची विनंती

**मुंबई, २ एप्रिल**

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नवीन वीज दराच्या आदेशाला बुधवारी तात्पुरती स्थगिती दिली. महावितरणने छोट्या ग्राहकांना दिलासा देण्यासाठी वीजन नियामक आयोगाकडे प्रस्ताव सादर केला होता. मात्र, त्याउलट छोट्या ग्राहकांऐवजी आयोगाने उद्योजकांना दरकपातीत प्राधान्य दिले होते. यामुळे महावितरणचे मोठे नुकसान होणार होते.

**तभा इम्पॅक्ट**

महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी दै. तरुण भारतला दिलेल्या विशेष मुलाखतीत वीज नियामक आयोगाने महावितरणने सादर केलेल्या प्रस्तावाच्या उलट निर्णय घेतल्याची माहिती दिली होती. याबाबतचे वृत्त तरुण भारतमध्ये प्रकाशित झाल्यानंतर राज्यभरातील वृत्तपत्रांनी व वाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती. अखेर दै. तरुण भारतने दिलेल्या वृत्ताचा परिणाम होऊन आयोगाने ही दरवाढ मागे घेतली आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने केलेल्या विनंतीवरून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर केलेल्या वीज दराचा आदेश मागे घेतला. नवीन दरांबाबतचा निर्णय १ एप्रिलपासून लागू होणार होता. परंतु यातील त्रुटी महावितरणने निदर्शनास आणून दिल्यानंतर आयोगाने निर्णय जाहीर केला. आयोगाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले की, वीज दराबाबतच्या आदेशातील चुका आणि विसंगती वर्ष २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांच्या नियामक कालावधीतील वीज दराच्या मूळ स्वरूपावर परिणाम करीत आहेत. नवीन वीज दर लागू केल्यास विविध प्रकारच्या ग्राहकांना आणि वीज वितरण क्षेत्रातील इतर संबंधित घटकांना मोठे आणि अपरिवर्तनीय नुकसान होऊ शकते. त्यामुळे या आदेशावर तातडीने स्थगिती द्यावी अशी मागणी महावितरणने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे केली होती. महावितरणच्या वकिलांकडून यासंदर्भात सविस्तर पुनर्विचार याचिका सादर केली जाणार आहे. त्या पृष्ठभूमीवर आयोगाने २८ मार्च २०२५ रोजी जाहीर केलेल्या नवीन वीज दर आदेशाला तात्पुरती स्थगिती दिली. त्यामुळे महावितरणची पुनर्विचार याचिका दाखल होईपर्यंत ३१ मार्च २०२३ रोजी जाहीर झालेला आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लागू असलेला जुनाच वीजदर लागू राहणार आहे.

### दिलेल्या आदेशाचे स्वागत : विश्वास पाठक



महावितरणने स्वतःच टप्प्याटप्प्याने वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव ठेवला होता व त्यासोबत आर्थिकदृष्ट्या कंपनी टिकेल याची खबरदारी घेतली होती. परंतु, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने २८ मार्चच्या आदेशात वीजदरात भरमसाठ कपात केली. आयोगाच्या आदेशामुळे महावितरणच्या आर्थिक स्थैर्याला धोका निर्माण होईल आणि अंतिमतः ग्राहकांचे मोठे नुकसान होईल. आयोगाने २ एप्रिल रोजी त्यांच्या पूर्वीच्या वीजदर आदेशावर स्थगिती देण्यासाठी दिलेल्या आदेशाचे मी स्वागत करतो. महावितरण पुनर्विचार याचिका दाखल करेल आणि वीजदर वाजवी पद्धतीने कमी करतानाच ग्राहकांना सेवा देण्यासाठी कंपनी आर्थिकदृष्ट्या टिकून राहील याची खबरदारी घेईल.



# भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू, २४ जखमी

- शेगाव-खामगाव मार्गावर पहाटेची घटना

**खामगाव, २ एप्रिल**

खाजगी प्रवासी बस, एसटी बस आणि बोलेरो या तीन वाहनांमध्ये भीषण अपघात झाला. या तिहेरी अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून २४ जण जखमी झाले आहेत. काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. ही घटना खामगाव-शेगाव मार्गावर २ एप्रिलच्या पहाटे साडेचार ते पाचच्यादरम्यान घडली.

भरधाव बोलेरो कार एसटी बसवर धडकली. पाठीमागून येणारी लक्झरी प्रवासी बस अपघातग्रस्त वाहनांना धडकली. या तिहेरी अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला. २४ जण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना खामगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बोलेरो शेगावकडून खामगावकडे जात होती तर एस. टी. महामंडळाची बस पुण्याकडून परतवाड्याकडे जात होती. बोलेरो आणि एस. टी. महामंडळाच्या बसची समोरासमोर धडक झाली. त्यानंतर शेगावकडून येणारी लक्झरी बस या दोन वाहनांवर धडकली.

या भीषण अपघातात तीनही वाहनांचा चुराडा झाला आहे. खाजगी लक्झरी बसचा चालक आणि वाहक केबिनमध्ये तासभर अडकले होते. अखेर त्यांना बाहेर काढण्यात यश आले. सात प्रवासी ठार झाले आहेत.

### व्यापार शुल्काने अमेरिकेत महागाईचा भडका

**नवी दिल्ली, २ एप्रिल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या परस्पर व्यापार शुल्क लादण्याच्या प्रस्तावित निर्णयाची किंमत अमेरिकन नागरिकांना चुकवावी लागणार आहे. परस्पर व्यापार शुल्कामुळे अमेरिकेत महागाई वाढणार असून भारतीय वस्तूंचे दर पूर्वीपेक्षा चारपटीने वाढण्याची शक्यता आहे.

भारतीय उद्योगावरही नकारात्कमक परिणाम दिसून येणार असून यामुळे व्यापार युद्धाचा भडका उडण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते व्यापारी शुल्कामुळे अमेरिकेत भारतीय वस्तूंचा वापर कमी होऊ शकतो आणि भारताच्या निर्यातीत घसरणीची अधिक शक्यता आहे. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प त्या सर्व देशांवर व्यापारी शुल्क जाहीर करणार आहे, जे अमेरिकन उत्पादनांच्या आयातीवर शुल्क आकारतात. अमेरिकेचे आयात शुल्क प्रत्येक देशातील उत्पादनावर अवलंबून असेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### कासारवाडीत सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**बार्शी, दि. २ एप्रिल-**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थी दिवस अंतर्गत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट परिपाठ घेऊन केली. तद्नंतर सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली ते सहावी विद्यार्थ्यांना अध्यापन करुन आणि शाळेचे कामकाज यशस्वीरीत्या पार पाडले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षण विस्तार अधिकारी धनाजी जाधवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व आणि संस्कारबाबत विस्तृत विवेचन केले. वर्गशिक्षिका बिनादेवी दरेकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शाळेस शिलिंग फॅन भेट म्हणून दिला. कार्यक्रमाचे औचित्य साधत पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, अध्यक्षा प्रीती कांबळे, उपाध्यक्षा अंबिका खाडे, विठ्ठल लहाने, भूषण मंडलिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, बिनादेवी दरेकर, वीणा कदम, बाळासाहेब मुंढे, श्रीमती मनीषा भोसले, श्रीमती रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे, सोहम मंडलिक, व्यंकटेश रेडे, स्वराज गुंड, श्रावणी शिंदे, प्रियांका खाडे मयुरी गायकवाड यांनी परिश्रम घेतले.



### चंद्रकांत वेदपाठक यांना श्री संत शिरोमणी नरहरी राज्यस्तरीय पुरस्कार

**अक्कलकोट, दि. २ एप्रिल-**

अक्कलकोटचे सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत वेदपाठक यांना अखिल सोनार समाज प्रतिष्ठान अंबाजोगाईच्या वतीने श्री संत शिरोमणी नरहरी राज्यस्तरीय पुरस्कार प्रतिष्ठानचे संस्थापक राजेशभाऊ पंडित रेणापूरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पंढरपूर येथे सोनार समाजाच्या मेळाव्यात चंद्रकांत वेदपाठक यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान पत्र, सन्मान चिन्ह देऊन पुष्पहार घालून सत्कार करून सन्मानित करण्यात आले. गेल्या ४० वर्षांपासून वेदपाठक यांनी सोनार समाजातील गरजू लोकांकरिता विशेष असे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या पुरस्काराबद्दल आ. सचिन कल्याणशेट्टी, शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख महेश साठे, तालुका प्रमुख संजय देशमुख, तालुका संघटक सूर्यकांत कडबगांवकर, आंतरराष्ट्रीय लायन्स चे माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, लायन्स क्लबचे अध्यक्ष शिवानंद नंदर्गी, लायन्स प्राथमिक शाळेचे अध्यक्ष राजेंद्र हत्ते, प्रा. राजन दीक्षित, सुनील पंडित, धनश्री उत्पात, उमेश काशीकर, दिनेश काटकर, आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.



### सांगोल्यात उद्यम आधार कार्यशाळा आणि व्यवसाय प्रशिक्षण

**सांगोला, दि. २ एप्रिल-**

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान यांच्या वतीने उद्यम आधार असलेल्या महिलांसाठी सांगोला येथील उत्कर्ष कौशल्य विकसन केंद्रात एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. तसेच माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, महाराष्ट्र शासन आणि ऊखउउख यांच्या संयुक्त विद्यमाने ठचझ ढीरळपळपस झोीसीरा यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी प्रसाद तावसे, प्रदीप बागुल, गजेंद्र कुलकर्णी, अंजली कुलकर्णी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात 'इतनी शक्ति हमें देना दाता' या प्रार्थनेने झाली. प्रशिक्षणादरम्यान, तज्ज्ञांनी व्यवसायासाठी आवश्यक व्यवसाय कौशल्य, शासकीय योजना, आर्थिक नियोजन आणि मार्केटिंग या चार महत्त्वाची कौशल्ये यावर सखोल मार्गदर्शन केले. प्रदीप बागुल यांनी प्रधानमंत्री मुद्रा योजना, डींरपव णा खिपवळर योजना, झचएऱ्ख्र, झचऋ्वए आणि चडचए साठीच्या कर्ज योजना या शासकीय कर्ज योजनांची माहिती दिली. यावेळी सहभागी महिलांना महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र देण्यात आले. सूत्रसंचालन संस्थेच्या सचिव वसुंधरा कुलकर्णी यांनी तर धनश्री सोनंदकर यांनी आभार मानले.



### चांदापुरी येथील ओंकार कारखान्याकडून वनविभागाला दोन बोलेरो गाड्या भेट

**पिलीव, दि. २ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याने नेहमीच सामाजिक बांधीलकी जपत अनेक समाज उपयोगी कामे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील, संचालीका रेखा बोत्रे-पाटील, संचालक प्रशातराव बोत्रे-पाटील यांच्या मार्गदशनाखाली या परीसरात बिबट्या व तरस यांनी उच्छांद मांडला आहे. या ऊस बागायती टप्पयात बिबटे व तरसांचा वावर असल्यामुळे शेतकऱ्यांनमध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले आहे. या बिबट्यांचा व तरसांचा बंदोबस्त करणयासाठी वनविभागाकडे रात्रीच्या वेळी गस्त घालणयासाठी चार चाकी गाडया नव्हत्या ही गरज ओळखून ओंकार साखर कारखान्याने वनविभागाला महींद्रा कंपनीच्या दोन बोलेरो गाडया ओंकार साखर कारखान्याच्या वतीने चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या हस्ते मुख्य वनरक्षक तुषार चव्हाण, उपवनरक्षक पंकज गर्ग, सोलापूर वनविभाग राम धोत्रे, सामाजिक वनीकरणाच्या स्नेहल पाटील यांना भेट देणयात आल्या यावेळी ओंकार साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर वैभव काशीद उपस्थित होते.

# सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीत ३८९ अर्ज पात्र, ४० अपात्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

संपूर्ण सोलापूर शहर आणि जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक पदाच्या निवडणुकीत ४६९ जणांनी ४२९ अर्ज दाखल केले होते. त्या अर्जाची छाननी बुधवार (दि.२) रोजी निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या छाननी मध्ये ४० जणांचे अर्ज अपात्र ठरवण्यात झाले आहेत. तर ३८९ जणांचे अर्ज पात्र झाले आहेत.



दरम्यान, अपात्र अर्जांमध्ये बाजार समितीची थकबाकी असणे, शेतकरी दाखला नसणे, आर्थिक दुर्बल घटकाचा दाखला नसणे, जात प्रमाणपत्र सादर न करणे, बाजार समितीचा व्यापारी परवाना असणे या कारणास्तव उमेदवार अपात्र ठरवण्यात आले आहेत.

#### अपात्र उमेदवार असे

- **सहकारी संस्था : सर्वसाधारण :** केदारलिंग विभुते, बाळासाहेब पाटील, नागनाथ घेरडे, सतीश ईसापुरे, व्यंकटेश मेकाले.
- **महिला राखीव :** जैतून पिंजारी, भौराबाई पाटील, शिवलीला भरले, निलोफर हत्तुरकर, राजश्री तमशेट्टी.
- **इतर मागासवर्ग :** सतीश ईसापुरे
- **ग्रामपंचायत : सर्वसाधारण :** केदारलिंग विभुते, सिकंदरताज पाटील, सागर सलगर, युवराज पवार, रियाना शेख, श्रीशैल माळी, विजय राठोड, शिवराज जाधव, रमजान नदाफ, विक्रांत काकडे.
- **अनुसूचित जाती जमाती :** रामजी गायकवाड, स्वाती माने, सुनील रणखांबे, सुरेश देशमुख, मिलिंद मुळे, दिलीपकुमार गायकवाड.
- **आर्थिक दुर्बल घटक :** शिवराज जाधव, बसवराज माळगे, राम सुरवसे, सुनील तांबे, मिलिंद मुळे, संजय राठोड, प्रशांत साबळे, नागेश चांगले, गंगाधर सरवडे,
- **व्यापारी प्रतिनिधी :** मारुती बिराजदार, रईस बागवान.
- **हमाल तोलार प्रतिनिधी :** राहुल बनसोडे



## मध्य रेल्वेच्या समाधान प्रभू यांना महाव्यवस्थापक संरक्षा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

मध्य रेल्वेचे सोलापूर विभागातील कुर्डुवाडीचे इलेक्ट्रिक सिग्नल मेंटेनर, सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशनचे समाधान प्रभू यांचा मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरम वीर मीणा यांनी बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे संरक्षा पुरस्काराने सन्मानित केले.

यावेळी अतिरिक्त महा व्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद आदी उपस्थित होते. कर्तव्या दरम्यानच्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि मागील महिन्यांत रेल्वे ऑपरेशनमध्ये सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारात पदक, प्रशंसापत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्र आणि २ हजार रोख रक्कम समाविष्ट आहे. श्री प्रभू ७ मार्च रोजी ट्रॅक डाउन तपासत असताना त्यांना वेल्ड फ्रॅक्चर दिसले. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला. त्यांचे सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी पुरस्कार विजेत्या कर्मचाऱ्याचे कौतुक केले.



## देगाव मलनिस्सारण केंद्राला महापालिका आयुक्तांची भेट

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बुधवारी महापालिकेच्या देगाव येथील मलनिस्सारण केंद्रास भेट देऊन पाहणी केली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे,सहाय्यक अभियंता रामचंद्र पेंटर, राहुल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी २५ एमएलडी पंपपाऊस, ५० एम एलडी पंप हाऊस, प्रायमरी युनिट, सेकंडरी युनिट, क्लोरीन कॉन्टॅक्ट टँक, सोलार पावर प्लांट , बायोगॅस जनरेशन युनिट, सांडपाणी तपासणी प्रयोगशाळा यांची पाहणी केली तसेच मलनिसारण केंद्रामध्ये येणाऱ्या सांडपाण्यावर करण्यात येणाऱ्या प्राथमिक उपचार पद्धती व द्वितीय उपचार पद्धतीची माहिती जाणून घेतली. महानगरपालिकेच्या देगाव येथे ७५ एमएलडी क्षमतेचे मलनिस्सारण केंद्र असून या ठिकाणी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार या केंद्रामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून दररोज मलनिसारण केंद्रामधील लॅबमध्ये सांडपाण्याची तपासणी करण्यात येते. त्याचबरोबर शहरातून येणारा सांडपाण्याची प्रक्रिया केली जाते.

## 'द्राक्ष' दर स्थिर राहिल्याने बागायतदारांमध्ये समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

फेब्रुवारी महिन्याच्या आरंभात राज्यातील ज्या बागायतदारांची द्राक्ष मार्केटमध्ये गेली त्यांच्या मालाला चांगला दर मिळाला मात्र फेब्रुवारी अखेरला व्यापारी बांधवांनी एकी करुन शेतकरी बांधवांच्या द्राक्षाचे भाव पाडल्याची खंत काही द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना व्यक्त केली होती. मात्र फेब्रुवारीनंतरही द्राक्ष भाव टिकून राहिल्याने शेतकऱ्यांना केलेल्या कष्टाचा चांगला दाम मिळाल्याची माहिती राज्य द्राक्ष बागायतदार संघटनेचे संचालक हनुमंत गवळी यांनी आज (दि. २) दिली.

गेल्या ३ महिन्यापासून द्राक्ष बागायतदारांची द्राक्ष मार्केटमध्ये येथ आहेत. लोकल बाजारपेठेत द्राक्षास यंदा ४० ते ५५ रूपयांपर्यंत दर मिळाला आहे. तर निर्यातक्षम द्राक्षास यंदा ८५ ते १०० रूपयांपर्यंत दर मिळाला आहे. फेब्रुवारीच्या सुरूवातीला द्राक्ष उत्पादकांच्या द्राक्षास प्रती किलोस लोकल मार्केटमध्ये ७० ते ९० रूपयांपर्यंत दर मिळत होता तर निर्यातक्षम द्राक्षास १०० ते १२० रूपयांपर्यंत दर मिळत होता. मात्र राज्यातील नाशिक, सांगली, विटा, कोल्हापूर, सातारा आणि सोलापूर विभागातील काही भागातून मोठ्या प्रमाणातून द्राक्ष बाजार समित्यांकडे येत असल्याने त्याचे दर व्यापाऱ्यांनी ४५ ते ६० रूपये प्रतिकिलोंवर आणले होते. तर विदेशात जाणाऱ्या द्राक्ष निर्यातीचे दर ८० ते ८५ रूपयांवर आले आहेत. यावर्षी द्राक्ष बागायतदारांना निसर्गाचीही साथ लाभली असून, वादळी वारे, अवकाळी पाऊसाचा त्रासही झाला नाही. यामुळे शेतकऱ्यांना चांगला दाम मिळाल्याचाही आनंद त्यांनी द्विगुणीत केला. आता शेवटच्या टप्प्यातील द्राक्षही बाजारात येत असून, या पंधरवड्यात द्राक्ष बागा तोडणी पूर्ण होईल. दरवर्षी निसर्गाची अशी साथ राहिली तरच बागायतदारांना बागांचा खर्च जावून काहीतरी पदरात पडणार आहे. एप्रिल ते मे महिन्यातही सोलापूर विभागातील काही द्राक्ष आणि नगर जिल्ह्यातील उशिराने घेतलेली द्राक्ष येतात. आता किमान सध्या आहे तो दर स्थिर राहावा, इतकी बळीराजाची माफक अपेक्षा आहे.



#### यंदा निसर्गाची कृपा मात्र हमी भावाचीही तितकीच गरज

गतवर्षी अवकाळी पावसामुळे बागांचे काही प्रमाणात नुकसान झाले होते. यंदा वादळी वारे, अवकाळी पावसामुळे बागांचे नुकसान झाले नसल्याने शेतकरी बांधवांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. द्राक्ष बागांना जोपासण्यासाठी मजूरवर्ग, औषधे, अंतर्गत मशागतीसाठी मोठा आर्थिक खर्च असतो. यामुळे द्राक्ष उत्पादन झाल्यावर बाजारातून शेतकऱ्यांच्या मालास चांगला दर मिळणे गरजेचे आहे. बाजारात दर पडल्यास शासनाकडून द्राक्ष उत्पादनासही हमी भाव मिळावा, अशी अपेक्षा राज्यातील शेतकरी बांधवांची आहे.

**- हनुमंत गवळी, संचालक, राज्य द्राक्ष बागायतदार संघटना (पुणे विभाग)**

## ३ महिन्यांत चलन भरले नाही तर ड्रायव्हिंग लायसन रद्द करणार!

- **नवा नियम वाहन चालकांसाठी डोकेदुखी ठरणार**



**सोलापूर, दि. २ एप्रिल -**

वाहतुकीचे नियम मोडल्यामुळे तुम्हाला चलन आले असेल तर दुर्लक्ष करणे महागात पडणार आहे. जरी मेसेज आला नाही. तरी मोबाईलवर तुमच्या वाहनाला आलेली चलने पाहता येतात. यामुळे ती तपासत रहा, नाहीतर तीन महिन्यांनी तुमचे ड्रायव्हिंग लायसन रद्द केले जाणार आहे.

#### दंड न भरल्यास काय होईल

- ड्रायव्हिंग लायसन्स रद्द होऊ शकते.
- अपघात झाल्यास विमा मिळणार नाही.
- न्यायालयाची नोटीस येऊ शकते.
- दंडाची पावती न भरलेल्यांना कोर्टाची नोटीस पाठविली जाते. तिथे सेटलमेंट होते. परंतू, असेही अनेक नग असतात जे या नोटीसलाही जुमानत नाहीत. यामुळे आता मुळावरच घाव घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- जाणून घ्या गाडीवरील दंड ऑनलाइन कसा बघायचा -
- सर्वप्रथम तुमच्या मोबाईल मध्ये https://mahatrafficechallan.gov.in या वेबसाईटवर जा.
- यानंतर आपल्या वाहनाचा क्रमांक टाईप करा.
- वाहनाचा क्र. टाईप केल्यानंतर चेसिस क्र. किंवा इंजिन क्रमांक या दोघांपैकी कोणत्याही १ निवडून त्यांच्या क्रमांक चे शेवटचे चार क्रमांक टाईप करा.
- शेवटची स्टेप म्हणजे गुगल कॅप्चावर व्हेरिफाय करुन सबमिट करा.
- सबमिट केल्यानंतर तुम्ही तुमच्या वाहनाचे ई-चलान मध्ये डाऊनलोड ही करु शकता.
- अशाप्रकारे वाहनचालक वाहनाचे ई-चलान स्टेटस घरबसल्या सोप्या पद्धतीने पाहू शकता व आपल्या दंडाची रक्कम ऑनलाईनच भरुन आपली संभाव्य चिंता टाळू शकतात.



## आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी केली प्राणी संग्रहालयाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल**

महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथे पाहणी केली.

यावेळी सहायक आयुक्त गिरीष पंडित, नगर अभियंता सारिका आकुलवार, सहायक अभियंता किशोर सातपुते, पशु शल्य चिकित्सक डॉ. सतीश चौगुले, गोकुळ चितारे, अविनाश वाघमारे, मनोज जाधव डॉ.भरत शिंदे आदी मान्यवर उपस्थिती होते. यावेळी आयुक्त यांनी महात्मा गांधी प्राणी संग्रहालय संपूर्ण परिसरातील माहिती घेतली.तसेच प्राणी संग्रहालय सुरु करण्याबाबत आढावा घेऊन उपस्थित अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. दिल्या.

## नागपूर एम्समध्ये दुर्मीळ शस्त्रक्रिया यशस्वी

- **२३ वर्षीय तरुणाला मिळाले नवजीवन**
- **शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांच्या पथकाची प्रमुख डॉक्टर महिला सोलापूरची**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ एप्रिल -**

नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेने (एम्स) एक दुर्मिळ आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करून वैद्यकीय क्षेत्रात नवा विक्रम प्रस्थापित केला. या शस्त्रक्रियेमुळे एका २३ वर्षीय तरुणाला नवजीवन मिळाले. ही शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांच्या पथकात मुळच्या सोलापूरच्या असणाऱ्या डॉ. शुभदा खानापुरे यांचा समावेश आहे.

जून २०२४ पासून या तरुणाला पोटाच्या अवयवांमध्ये एक्स्ट्रा टेस्टिक्युलर नॉन-सेमिनोमॅटस जर्म सेल ट्यूमरचा त्रास होता. त्याला त्यासाठी केमोथेरपी देण्यात आली होती. परंतु केमोथेरपी दरम्यान रुग्ण हिमोप्टायसिसने (खोकल्यात रक्त) ग्रस्त झाला. सीटी स्कॅनमध्ये एक मोठा ट्यूमर आढळला जो यकृताच्या उजव्या लोबमधून डायफ्रामध्ये पसरला होता आणि तिथून उजव्या फुप्फुसाच्या खालच्या लोबमध्ये शिरला होता. यावर शस्त्रक्रिया हा एकमेव उपाय होता. ट्यूमरची व्याप्ती लक्षात घेता, रुग्णाचा डायाफ्रासह उजव्या फुप्फुसाच्या खालच्या भाग आणि यकृताचा उजवा अर्धा भाग काढून शस्त्रक्रियेने काढून टाकायचा होता. या शस्त्रक्रियेसाठी काही रुग्णालयांनी व डॉक्टरांनी नकार दिला होता.

त्यामुळे शेवटचा पर्याय म्हणून रुग्ण एम्सच्या सर्जिकल ऑन्कोलॉजी विभागात दाखल झाला. (कर्करोग) सर्जिकल ऑन्कोलॉजी विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. शुभदा खानापुरे यांनी रुग्णाचा सखोल अभ्यास केला आणि व्यवस्थापनाचे अचूक नियोजन केले. त्यांच्या नेतृत्वाखालील एम्स नागपूर येथील डॉक्टरांच्या पथकाने ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी डॉक्टरांच्या परिश्रमाचे कौतुक केले.

#### या डॉक्टरांच्या प्रयत्नांना आले यश...

शस्त्रक्रियेत डॉ. शुभदा खानापुरे खाना यांच्यासह डॉ. जयकुमार, डॉ. निर्झर राज, डॉ. हेमंत बोधनकर, डॉ. नीलेश श्रीवास्तव व डॉ. नीलेश नागदेवे आदींनी महत्त्वाची भूमिका बजावली. डॉ. गजानन चव्हाण, डॉ. रेवंत आणि क्रिटिकल केअर स्पेशालिस्ट डॉ. सुचिता मेश्राम यांनी रुग्णाचे प्रभावीपणे व्यवस्थापन केले. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचे नोडल अधिकारी डॉ. मनीष श्रीगिरीवार यांनी विशेष सहकार्य केले.

#### डॉ. शुभदा खानापुरे मूळच्या सोलापूरच्या

ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करून रुग्णाला नवजीवन देणाऱ्या डॉक्टरांच्या पथकाच्या प्रमुख डॉ. शुभदा खानापुरे या मुळच्या सोलापूरच्या आहेत. त्याचे शालेय शिक्षण हे सिध्देश्वर बालक मंदीर व सिध्देश्वर कन्या प्रशालेत झाले आहे. महाविद्यालयीन शिक्षण हे वालचंद कॉलेजमध्ये झाले असून वैद्यकीय पदवीचे शिक्षण हे नागपूर आणि एमएसचे तसेच सुरप स्पेशालिटीचे शिक्षण हे मुंबईमध्ये झालेले आहे.

## सहा महिन्यांपासून आशा स्वयंसेविका मानधनापासून वंचित

- **गुढीपाडवा, रमजान सण मानधनाविनाच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल**

आशा स्वयंसेविकांना मागील सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने महिला कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. लाडकी बहिण योजना, आयुष्यमान भारत यासह विविध योजनांमध्ये मोठी भूमिका बजावणाऱ्या आशा कर्मचाऱ्यांना मानधन नसल्याने गुढीपाडवा अन् रमजान सण साजरा करता आले नाही. शासन-प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आशा स्वयंसेविकांवर उपासमारीची वेळ आली आहे.

शहर व जिल्ह्यांमध्ये साडेतीन हजार आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक आहेत. ऑक्टोबर २०२४ पासून केंद्र शासनाकडील अनुदान अद्याप मिळाले नाही. तर, पाच महिन्यांपासून राज्यशासनाकडून मिळणारे अनुदानाचा टप्पा उपलब्ध झाला नाही. आभा कार्ड, आयुषमान भारत, मुख्यमंत्री लाकडी बहिण योजनांसह इतर वैद्यकीय सेवांमध्ये आशा स्वयंसेविकांनी ऑनलाईनद्वारे नोंदणी करीत अभियान यशस्वी केले. आयुषमान भारत कार्ड काढण्यासाठी दिवसरात्र शिबिरामध्ये आशा कर्मचारी सहभागी होते. त्यामुळे राज्यात सोलापूर जिल्ह्याचा लौकिक झाला. शासनाकडून त्या ऑनलाईन कामाचा मोबदला मिळाले नाही. म्हणून आशा स्वयंसेविकांना त्वरित मानधन देण्यात यावे, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आले आहे.

#### अन्यथा आंदोलन करणार

आशा कर्मचाऱ्यांना मागील पाच-सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नाही. वाढीव मानधनाचा पत्ता नसून केंद्राकडून अनुदान मिळाले नसल्याने तेही पैसे मिळाले नाहीत. ऑनलाईनच्या कामांसाठी आशा कर्मचाऱ्यांना कारवाईचा धाक दाखवत वेठीस धरण्याचा प्रकार चुकीचा असून प्रत्येक कामाचा मोबदला न दिल्यास आंदोलन करण्यात येईल.

**- पुष्पा पाटील,** जिल्हा प्रमुख, आशा कर्मचारी संघटना

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# परभणीतील उबाठा, शरद पवार गटाच्या नेत्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**परभणी, दि. २ एप्रिल-**

परभणी जिल्ह्यातील पूर्णा बाजार समितीचे सभापती बालाजी खैरे, पाथरी पंचायत समितीचे माजी सभापती अरुण कोल्हे, परभणी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक बालाजी देसाई यांच्यासह उबाठा आणि शरद पवार गटाच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी बुधवारी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, ज्येष्ठ नेते राम प्रसाद बोर्डीकर, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यावेळी उपस्थित होते.

विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी या कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला आहे, असे रवींद्र चव्हाण यांनी यावेळी सांगितले. उबाठा आणि शरद पवार गटातील प्रमुख नेत्यांच्या प्रवेशामुळे परभणी जिल्ह्यात भारतीय जनता पार्टी आणखी मजबूत होईल आणि संपूर्ण जिल्हा लवकरच भाजपामय होईल असा विश्वास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी यावेळी व्यक्त केला. प्रवेश केलेल्यांमध्ये पूर्णा बाजार समितीचे उपसभापती नारायणराव पिसाळ, माजी उपसभापती लक्ष्मण बोबडे, संतराम ढोणे, रमेशराव काळबांडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विश्वनाथ सोळके, पाथरी पंचायत समितीचे माजी सभापती माणिक घुंबरे, बालाजी डाखोरे यांचा समावेश आहे. यावेळी विविध सेवा सहकारी संस्थांच्या ६० अध्यक्षांनी तर जिल्ह्यातील ४० सरपंचांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

# राज्यात नव्या वाहन खरेदीवर मिळणार कर सवलत

## फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई, दि. २ एप्रिल-** राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. स्वेच्छेने आपलं वाहन स्क्रॅप अर्थात भंगार म्हणून घोषित करणाऱ्या वाहनधारकांना करात सवलत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. सरकारने मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत याला मान्यता दिली आहे. एखाद्याने स्वेच्छेने आपलं वाहन स्क्रॅप केल्यास त्याला नवीन वाहनावर १५ टक्के करमाफी करण्याची घोषणा करण्यात आली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर या मोठ्या शहरांमध्ये जुन्या वाहनांची संख्या कमी होऊ शकते. त्यामुळे प्रदूषणावर फरक पडून नवीन वाहनांमुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

### १५ टक्क्यांची वाढीव सवलत

ज्या परिवहन श्रेणीतील वाहनांवर वार्षिक कर लागू आहे, त्यांना नोंदणीच्या तारखेपासून पुढील ८ वर्षांसाठी वार्षिक करात १५ टक्के सवलत दिली जाईल. तर बिगर वाहतूक श्रेणीतील वाहनांना पुढील १५ वर्षांसाठी वार्षिक कर सवलत दिली जाईल, असं सरकारने आपल्या घोषणेत म्हटलं आहे.

### दोन वर्षांची व्हॅलिडिटी, नियम काय?

नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग सुविधेमध्ये वाहन स्क्रॅप केल्यानंतर वाहन मालकाने प्राप्त केलेले ठेव प्रमाणपत्र पुढील दोन वर्षांसाठी कर सवलतीसाठी वैध राहील. ही कर सवलत अशा प्रकारची वाहनं दुचाकी, तीन चाकी किंवा हलकी मोटार वाहनं, या वाहनांच्या खरेदी आणि नोंदणीच्या वेळी लागू होईल. या संदर्भात अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून तीन वर्षांच्या आत अशा वाहनांना स्वेच्छेने स्क्रॅप केलं तरच ही कर सवलत मिळेल, अशी माहिती आहे.

### ५ टक्क्यांची आणखी सवलत

आत्तापर्यंत राज्यात नोंदणीकृत वाहन स्क्रॅपेज सुविधेमध्ये (ठतडऋ) नोंदणीच्या ८ वर्षांच्या आत स्वेच्छेने स्क्रॅप केलेल्या वाहनांना आणि १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने स्क्रॅप केलेल्या बिगर वाहतूक वाहनांना १० टक्के कर सवलत दिली जात होती. मात्र सरकारच्या निर्णयानंतर आता परिवहन आणि बिगर वाहतूक वाहनांना एकरकमी कराच्या १५ टक्के कर सवलत दिली जाणार आहे.

# अजित पवारांच्या 'त्या' विधानाने पुन्हा संशयकल्लोळ!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२ एप्रिल-**

महाराष्ट्रातील राजकारणात पवार काका-पुतण्यांच्या राजकारणाचा अंदाज कोणालाही लावणे शक्य नाही, याचा प्रत्यय महाराष्ट्रातील राजकारण्यांना पुन्हा एकदा बुधवारी प्रत्ययास आला. पुतणे म्हणजेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपले काका शरद पवार यांच्यापासून फारकत घेत जवळपास दोन वर्षापासून महायुती सहभागी झाले असताना दस्तरखूद अजिदादांनीच बुधवारी बीडमधील कार्यक्रमात चुलत्याच्या कृपेमुळे आपले बरं चालले आहे, असे विधान केले, त्यामुळे या विधानावरून पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणात संशयकल्लोळ निर्माण झाला आहे.

त्यांच्या विधानाबाबत सत्ताधारी व विरोधी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी उलटसुलट प्रतिक्रिया दिल्याने त्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांनी आज तेथील एका कार्यक्रमात पक्षाच्या कार्यकर्त्यांना दम देताना चांगले वागण्याचा सल्ला दिला. यावेळी आई-वडील व चुलत्याच्या आशीर्वादामुळे आपले चांगले सुरू असल्याचे ते म्हणाले त्यामुळे हा विषय चर्चेचा बनला याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले की वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घेणे हे चांगलेच असते त्यांनी आता आपल्या काकांना केवळ आशीर्वाद देण्यापुरतेच ठेवले आहे असा टोला लगावला तर शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत पत्रकार परिषद घेत पक्षाची भूमिका स्पष्ट केली ते म्हणाले दोन्ही राष्ट्रवादी वेगवेगळ्या असून आमची विचारधारा ही शरद पवारांच्या विचारावर चालणारे असून जातीयवादी शक्तीला कधीही आम्ही सोबत जात नाही. त्यामुळे अजित पवार यांनी काहीही भाष्य करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मात्र यावरून अजित पवारांना टोला लगावला ते म्हणाले की,' बरे झाले एकदा त्यांनी एकदा मान्य तरी केले की आपल्या कर्तृत्व हे काकाच्या जीवावर आहे.'



# हॉर्न का वाजवला म्हणत दोघा भावांना गंभीर मारहाण

## ६ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी, दि. २ एप्रिल-**

ट्रॅक्टरचा हॉर्न का वाजविला असे म्हणत सहा जनांनी हाताने व लोखंडी टॉमीने हातावर, तोंडावर व सर्व शरीरावर केलेल्या जबर मारहाणीत दोन भाऊ नाका-तोंडातून रक्त येऊन गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेवरून सहा जणांच्या विरोधात टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि.०१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.१६ वा.सुमारास टेंभुर्णी शहरात इंदापूर रोडवर घडली आहे. ऋषीकेश आनंदराव देशमुख व गौरव आनंदराव देशमुख अशी जखमींची नावे आहेत.

यावाबत ऋषीकेश आनंदराव देशमुख (वय-२६ वर्ष) रा.जंजिरा हॉटेल जवळ टेंभुर्णी याने फिर्याद दाखल केली आहे. मंगळवारी सकाळी दि.१ एप्रिल रोजी) सकाळी १०.१६ वा. सुमारास तो टेंभुर्णी येथील दाजी टायर वर्क्स येथुन ट्रक्टर घेवुन माझे घराकडे जात असताना ट्रक्टरचा हॉर्न वाजवला. तेव्हा गावातील दिपक पवार हा युनिकार्न मोटार साकलवरुन जात होता. त्याने तु हॉर्न का वाजवला? असे विचारले, तेव्हा त्यास देशमुख याने तुम्हाला हॉर्न वाजवला नाही असे म्हणाला. नंतर दिपक पवार याने तु मला ओळखत नाही का? असे म्हणुन शिवीगाळी करुन हाताने जबर मारहाण केली. त्यानंतर त्या ठिकाणी राम पवार, बाबा पवार, विशाल पवार, मनोज पवार, विशाल धोत्रे हे त्यांचे युनिकार्न, बुलेट (नंबर माहीत नाही) मोटार सायकलवर तेथे आले. त्यांनी पुन्हा ऋषीकेश यास शिवीगाळ करुन दमदाटी सुरु केली. तेव्हा त्याने लहान भाऊ गौरव यास फोन करून त्या ठिकाणी बोलवुन घेतले. तेव्हा ऋषीकेश व त्याचा लहान भाऊ गौरव यास दिपक पवार, राम पवार, बाबा पवार, विशाल पवार, मनोज पवार, विशाल धोत्रे या सहा जणांनी शिवीगाळी दमदाटी केली. तर बाबा पवार याने मला तेथेच पडलेल्या लोखंडी टॉमीने मला उजवे हाताचे दंडावर, गालावर, पाठीवर मारहाण करुन जखमी केले. नंतर तीच लोखंडी टॉमी घेऊन राम पवार याने त्यास सर्व अंगावर मारहाण केली आहे. नंतर दिपक पवार, विशाल पवार यांनी त्याचा लहान भाऊ गौरव यास तोंडावर, पाठीवर हाताने व लाथाबुक्याने मारहाण केली. ता मारहाणीमुळे माझे लहान भाऊ गौरव याच्या नाका-तोंडातुन रक्त आले. त्यानंतर पुन्हा मनोज पवार, विशाल धोत्रे यांनी ट्रॅक्टरवर चढुन ऋषीकेश व भाऊ गौरव यास हाताने पाठीवर मारहाण करुन शिवीगाळी दम दाटी केली आहे. याबाबत ऋषीकेश आनंदराव देशमुख यांच्या फिर्यादीवरून १) दिपक पवार२) राम पवार, ३) बाबा पवार, ४) विशाल पवार, ५) मनोज पवार, ६) विशाल धोत्रे सर्व रा.टेंभुर्णी, ता.माढा यांच्या विरोधात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.



# उन्हाळ्यात वाड्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहचवा

## आ. अवताडे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पंढरपूर, दि.२ एप्रिल -**

पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी पंढरपूर पंचायत समिती सभागृहात आ. समाधान आवताडे यांनी बुधवारी पंढरपूर तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक व सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पाणी टंचाई आढावा बैठक घेतला.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, नायब तहसीलदार बालाजी पूदलवाड यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या आढावा बैठकीत अनेक सरपंच व सदस्यांनी पाणी टंचाईदूर करण्यासाठी गावागावातील ओढे, नाले, तलाव हे नीरा उजवा व उजनी मधून भरून घ्यावेत. पाणी मिळत नसूनही कर आकारणी केली जाते अशा तक्रारींचा पाढा लोकप्रतिनिधीसमोर वाचला. नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी गावागावातील ओढे, नाले, तलाव भरून घ्यावेत. हातपंप सुरू करून वाड्या वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचवा अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी घरकुल योजना यासह विविध विभागाचा आढावा घेतला. या आढावा बैठकीमुळे योग्य पाण्याचे नियोजन होणार असून नागरिकांना दिलासा मिळणार आहे.



# पंढरपूर एसटी बस आगारात पाच नवीन बस दाखल

## आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते नवीन बसचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ एप्रिल -**

उन्हाळ्यात प्रवाशांची गरज लक्षात घेऊन राज्य परिवहन महामंडळाच्या पंढरपुरात आगारात पाच नवीन एसटी बस दाखल झाल्या आहेत. या नवीन बसचे पूजन व लोकार्पण आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी विभाग नियंत्रक अमोल गोंजरी, विभागीय वाहतूक अधिकारी अजय पाटील, वरिष्ठ आगार व्यवस्थापक योगेश लिंगायत यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दक्षिण काशी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या पंढरपूरला श्री विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक दाखल होत असतात. त्या तुलनेत पंढरपूर आगारात बसची संख्या कमी होती, त्यात काही बस जुन्या झाल्यामुळे त्या वारंवार बंद पडत असून, काही बस स्क्रॅप करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

त्यामुळे एसटी प्रशासनाच्या बसच्या वेळा आणि संचलनाचे नियोजन करताना चांगलीच तारेवरची कसरत होते. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला पंढरपूर एसटीच्या ताफ्यात नवीन ५ बस दाखल झाल्या आहेत, तर पुढील काळात आणखीन ५ बस (लालपरी) दाखल होणार असल्याने प्रवाशांनी आणि एसटी प्रशासनाने समाधानाचा सुस्कारा सोडला आहे. तसेच मंगळवेढा आगारासाठी ही बसची मागणी केली आहे.

# अक्कलकोट तालुका मुख्याध्यापक संघाच्या सचिवपदी श्रीशैल पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि, २ एप्रिल-**

अक्कलकोट तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे वतीने सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या विद्या सचिवपदी श्रीशैल पाटील यांची निवड झाल्याबद्दल सत्कार प्रभाकर बंदीछोडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मण चलगेरी होते, यावेळी तालुका माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे नूतन कार्यकरणीचे लक्ष्मण चलगेरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले, याप्रसंगी अनिल देशमुख, शंकर व्हनमाने, अशोक कलशेट्टी, मलकापा भरमशेट्टी शिवराज किलजे आदी मुख्याध्यापकांनी चर्चा सत्रात भाग घेतला, स्वागत प्रस्तावना सचिव सिधय्या स्वामी यांनी केली, यावेळी व्यासपीठावर महादेव माने, सिद्रामप्पा हडपद, आशिफ मुजावर, व्यंकटेश बोकडे, आदी मान्यवर उपस्थित होते, सूत्रसंचालन सिधाय्या स्वामी यांनी केली, सर्व उपस्थितांचे आभार शिवराज किलजे यांनी मानले यावेळी विविध शासकीय जीआर, यांचे माहिती, वार्षिक निकाल याविषयी चर्चा करण्यात आले,

# शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमाची माहिती संकेतस्थळांवर द्या : मुख्यमंत्र्यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ एप्रिल :**

: राज्यात शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा ही संकल्पना व्यापक प्रमाणात यशस्वी ठरली असून या अंतर्गत विविध विभागांमार्फत आतापर्यंत ४११ कामांसंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाली आहे. तर कार्यवाही सुरू असलेली ३७२ कामे लवकरच पूर्ण होणार आहेत. सर्व विभागांनी येत्या १ मे पर्यंत सर्व कामे पूर्ण करावीत तसेच प्रत्येक विभागाने शंभर दिवस कार्यक्रमाची माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे शंभर दिवस कृती कार्यक्रमासंदर्भात आढावा बैठक मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागांचे मंत्री संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री श फडणवीस म्हणाले की, शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा कार्यक्रम विभागांनी गांभीर्याने यशस्वी केला आहे. अनेक विभागांनी यामध्ये उत्तम काम केले आहे. नागरिकांना या माध्यमातून उपयुक्त आणि तत्पर सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमांतर्गत ८५ टक्के कामे पूर्ण करण्याची कौतुकास्पद कामगिरी विविध विभागांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर शंभर दिवसांसाठी कार्यक्रमाचा कालावधी १५ दिवस वाढविण्यात आला आहे. येत्या १ मे रोजी सर्व विभागांनी आपल्या संकेतस्थळावर विभागांनी संकल्पित केलेली कामे व पूर्ण झालेली कामे याची माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यासोबतच काही कार्यवाही अपूर्ण राहिली असतील तर त्याची कारणे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही दिल्या. विभागांनी गतीमानतेने लोकोपयोगी कामे गुणवत्तेसह आणि कालमर्यादेत पूर्ण करावीत. लोकप्रतिनिधींच्या पत्रांवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी विभागांनी आपल्यास्तरावर यंत्रणा कार्यान्वित करावी. विभागांनी उपलब्ध निधीचा सुयोग्य वापर करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश फडणवीस यांनी यावेळी दिले.

बैठकीत एकूण २६ विभागांच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. विभागांचे ९३८ मुद्द्यांपैकी ४११ मुद्द्यांवर (४४) पूर्णतः काम झाले आहे. तसेच, ३७२ मुद्दे (४०%) अंतिम टप्प्यात असून ते निश्चित वेळेत पूर्ण होतील. १५५ मुद्दे प्रगतीपथावर आहेत. या कामांच्या पूर्ततेबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित विभागांनी दिली. त्यासाठी त्यांना १५ दिवसांचा अतिरिक्त कालावधी देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री .शिंदे म्हणाले, शंभर दिवस कार्यक्रम ही संकल्पना अंत्यत उपयुक्त असून जिल्हास्तरावरही चांगला बदल होत आहे. अनेक प्रकल्प, मोठी कामे या कालावधीत साकारली आहेत. त्यासोबत अनेक विभागांच्या सेवा ऑनलाईन झाल्या आहेत, त्याचा जनतेला विशेष लाभ होत आहे.

## ॥ उसंतवाणी ॥

१४६८

वक्फ विधेयक । गोंधळाचा पूर ।
जाळाआधी धूर । विरोधींचा ॥१॥

कशाला इतकी । बडविती छाती ।
कोणती ही नीती । विरोधाची? ॥२॥

लाखो हेक्टराच्या । लाटल्या जमिनी ।
तयाची मोजणी । होईल ती ॥३॥




न्याय दरवाजा । उघडेल आता ।
अन्यायाच्या बाता । जिरतील ॥४॥

महिला इतर । कुणा ना प्रवेश ।
धर्माचा आवेश । आंधळा जो ॥५॥

लांगुलचालन । चाले मतांसाठी ।
त्याच्या माथी काठी । बसणार ॥६॥

कांत संसदेची । कसोटी ही आज ।
लोकशाही लाज । राखा खरी ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०२ एप्रिल २०२५

# चैत्रवारी निमित्त जड वाहनांच्या वाहतुक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल -**

चैत्र शुध्द एकादशी मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५ रोजी असून, यात्रा कालावधीत पंढरपूर शहर बाहयमार्गावरून जाणा-या जड वाहतुकीमुळे पंढरपूर शहरात दाखल होणा-या भाविकांच्या जिवितेला धोका व वाहतुक नियमनास अडथळा होवु नये. यासाठी जड वाहनांच्या वाहतुक मार्गात बदल करण्यात आला. हा बदल ५ ते ९ एप्रिल २०२५ या कालावधीपर्यंत राहणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

जड वाहतुकीस बंद ठिकाण - शिवाजी चौक (मोहोळ), पर्यायी मार्ग- मोहोळ-कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा मोहोळ-शेटफळ-टेंभुर्णी- इंदापूर, जड वाहतुकीस बंद ठिकाण - शेटफळ चौक (मोहोळ), पर्यायी मार्ग - शेटफळ-टेंभुर्णी- इंदापूर किंवा शेटफळ-मोहोळ-कामती- मंगळवेढा-सांगोला. जड वाहतुकीस बंद ठिकाण - टाकळी सिंकदर (मोहोळ), पर्यायी मार्ग - टाकळी सिंकदर-कुरूल-मोहोळ-शेटफळ- टेंभुर्णी मार्गे किंवा टाकळी सिंकदर-कुरूल-कामती- मंगळवेढा-सांगोला मार्गे इच्छित स्थळी जातील.

जड वाहतुकीस बंद ठिकाण - कुरुल चौक (कामती), पर्यायी मार्ग - कुरूल-कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा कुरुल- मोहोळ-शेटफळ- टेभुर्णी, जड वाहतुकीस बंद ठिकाण - वेणेगांव फाटा (टेंभुर्णी), पर्यायी मार्ग - वेणेगाव- टेंभुर्णी- इंदापूर किंवा वेणेगाव-शेटफळ- मोहोळ, कामती- मंगळवेढा-सांगोला मार्गे इच्छित स्थळी जातील.

जड वाहतुकीस बंद ठिकाण - श्री ज्ञानेश्वर चौक (वेळापूर), पर्यायी मार्ग - वेळापूर ते साळमुख- महुद- सांगोला-मंगळवेढा-कामती, किंवा वेळापूर ते अकलूज मार्गे किंवा वेळापूर ते नातेपुते मार्गे इच्छित स्थळी जातील. जड वाहतुकीस बंद ठिकाण - साळमुख चौक, पर्यायी मार्ग - साळमुख ते महुद-सांगोला-मंगळवेढा- कामती मार्गे इच्छित स्थळी जातील. जड वाहतुकीस बंद ठिकाण - महुद चौक (सांगोला), पर्यायी मार्ग - महुद- सांगोला-मंगळवेढा-कामती मार्गे इच्छित स्थळी जातील. जड वाहतुकीस बंद ठिकाण - मंगळवेढा-कोल्हापूर बायपास पुलाखाली (सांगोला), पर्यायी मार्ग - सांगोला-मंगळवेढा-कामती मोहोळ- शेटफळ- टेंभुर्णी मार्गे इच्छितस्थळी जातील. जड वाहतुकीस बंद ठिकाण मंगळवेढा नाका बायपास (मंगळवेढा), पर्यायी मार्ग - मंगळवेढा- कामती- मोहोळ- शेटफळ- टेंभुर्णी किंवा मंगळवेढा- सांगोला मार्गे इच्छित स्थळी जातील. जड वाहतुकीस बंद ठिकाण - भोसे पाटी (करकंब), पर्यायी मार्ग करकंब-वेणेगाव-टेंभुर्णी-इंदापूर किंवा करकंब वेणेगाव- शेटफळ-मोहोळ- कामती- मंगळवेढा- सांगोला मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी रात्री १२ वाजेपासून वेळापूर ते महूद ते सांगोला जाणारी जड वाहतुक दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ च्या आदेशा प्रमाणे बंद राहील. सदरचा आदेश हा दिनांक ५ एप्रिल २०२५ ते दिनांक ९ एप्रिल २०२५ पर्यंत राहील.

# उबाठा गट म्हणजे काँग्रेसच्या पाठिंब्यावरचे बांडगुळ : रवींद्र चव्हाण

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२ एप्रिल-**

उबाठा गट म्हणजे काँग्रेसच्या पाठिंब्यावरचे बांडगुळ आहे, अशी टीका भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण

यांनी लगावला आहे. ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना आपल्या भावना मांडले आहेत त्यात म्हटले आहे की,

संजयजी, हिरवी कावीळ झालेल्या ज्या नव्या दिव्य दृष्टीतून तुम्ही बघता, त्यातून तुम्हाला वक्फ बोर्ड आणि हिंदुत्वाचा संबंध नाही, असं वाटणे साहजिकच आहे. पण वक्फ बोर्डाची हिंदूंच्या विरोधातील मनमानी खरंच जाणून घ्यायची इच्छा असेल, तर देशभरातील हिंदू मंदिरं आणि ज्या सर्वसामान्य हिंदूंची घरं वक्फ बोर्डाने बळकावली आहेत, त्यांना विचारा. ते वक्फग्रस्त हिंदू ज्या शोकांतिका सांगतील, त्या ऐकून तरी तुमच्या मनाला पाझर फुटेल अशी आशा आहे. बाकी काँग्रेसच्या पाठिंब्यावरचं बांडगुळ झालाय तुमचा पक्ष. तेव्हा मालकीणबाईंच्या सासूबाईंचं कोडकौतुक सुरू राहू दे, असा टोलाही लगावला आहे.



## अग्रलेख...

# युनूस यांना आता चीन-प्रेमाचे भरते

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी त्यांच्या चीन दौऱ्यात भारताच्या पूर्वोत्तर राज्यांचा उल्लेख करून एक नवा वाद निर्माण केला आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडल्यानंतर शेख युनूस निरंतर भारताच्या मार्गात काटे पेरण्याचे काम करीत आहेत. युनूस कधी पाकिस्तानसोबत रासलीला खेळतात, तर कधी चीनच्या कडेवर बसून भारतविरोधी कारस्थाने करतात. त्यांनी हातात भिकेचा कटोरा घेऊन चीनपुढे हात पसरवण्यात भारताला आक्षेप असण्याचे कारणच नाही. मात्र त्यांनी पूर्वोत्तर राज्यांचा उल्लेख करून भारतविरोधी वातावरणाची निर्मिती केली आहे, ज्यावर आक्षेप घेतल्याशिवाय पर्याय नाही. युनूस म्हणाले, भारताच्या पूर्वोत्तर भागातील सात राज्यांजवळ समुद्री सीमा नाहीत. चीन बांगलादेशात गुंतवणूक करून मोठा नफा कमवू शकतो त्यामुळे त्याने बांगलादेशातील आपली आर्थिक उपस्थिती अधिक मजबूत करावी. पूर्वोत्तर भागात समुद्रापर्यंत पोहोचण्यासाठी भारताला बांगलादेशशिवाय पर्याय नाही, अशी भूमिका घेऊन त्यांनी या दौऱ्यात चीनकडून २.१ बिलियन डॉलर्सची गुंतवणूक प्राप्त करण्यात यश मिळविले असले तरी भारताच्या पूर्वोत्तर राज्यांचा उल्लेख करून, आपला खुजेपणा दाखवला आहे. त्यांच्या या भूमिकेचा खरपूस समाचार घेतला जायला हवा. तसा तो घेतलाही गेला. त्यांच्या या टिप्पणीवर भारतातील नेत्यांनी तीव्र आक्षेप नोंदविला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, जे अतिशय तिखट प्रतिक्रियांसाठी ओळखले जातात, त्यांनी बांगलादेश तोडून भारत समुद्रापर्यंत रस्ता बांधू शकतो, असा परखड इशारा दिला आहे. युनूस यांची टिप्पणी चिथावणीखोर आणि अस्वीकारार्हच म्हणावी लागेल. भारताने तर अशी टिप्पणी खपवूनच घेऊ नये. ईशान्य भारताला मुख्य भूभागाला जोडण्यासाठी रस्त्यांचे जाळे उभारले जाण्याची गरज कुणीच नाकारू शकत नाही. त्यादृष्टीने भारताने पावलेदेखील उचलली आहेत. भारतातील काही देशविरोधी घटक ईशान्य भारताला मुख्य भागापासून वेगळे करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र आता त्या शक्ती ठेचून काढल्या जायला हव्यात. चिकन नेक कॉरिडॉर आणि आजूबाजूला रस्त्यांचे जाळे उभारले गेल्यास मुख्य भागासोबतचा ईशान्य राज्यांचा संपर्क खंडित होणार नाही. युनूस यांच्या या विधानाची दखल टिपरा मोथा पक्षाचे प्रमुख प्रद्योत माणिक्य यांनी घेतली आहे. ते म्हणाले, अभियांत्रिकी आव्हानांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्याऐवजी बांगलादेशचे तुकडे करून, सागरी प्रवेश निश्चित केला जायला हवा. चितगाव येथील आदिवासी समुदायांना १९४७ पासूनच भारतासोबत राहायचे होते. बांगलादेशातील लाखो त्रिपुरी, गारो, खासी आणि चकमा समुदायाचे लोक अजूनही अन्याय सहन करीत आहेत. त्यामुळे ते राहात असलेला भाग भारतात विलीन करणेच सोयीस्कर होईल. काँग्रेस पक्षाचे नेते पवन खेडा यांनीही युनूस केवळ भारताला डिवचण्यासाठी चीनचा वापर करीत असल्याचे स्पष्ट करून, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बांगलादेश सरकारची ईशान्येकडील राज्यांबद्दलची भूमिका अतिशय धोकादायक असल्याचे म्हटले आहे. पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार संजीव सन्याल यांनीही या वक्तव्याबाबत आक्षेप घेतला आहे. चीनने बांगलादेशात गुंतवणूक करावी, आम्हाला त्यात कुठलीही अडचण नाही. मात्र सात राज्यांच्या केलेल्या उल्लेखाचा आम्ही कोणता अर्थ काढावा?

अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मिझोरम, नागालॅण्ड, मणिपूर आणि त्रिपुरा ही भारताची सेव्हन सिस्टर्स म्हणून ओळखली जाणारी पूर्वेकडील राज्ये आहेत. या सातही राज्यांचे भारताच्या दृष्टीने भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामरिक महत्त्व आहे. या राज्यांच्या सीमा म्यानमार, बांगलादेश, भूतान आणि चीनला लागून असल्याने त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही राज्ये चिकन नेकद्वारे (सिलिगुडी कॉरिडॉर) भारताच्या मुख्य भूमीशी जोडलेली आहेत, त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातूनही ती महत्त्वाची ठरतात. ईशान्य भारत हा जगातील सर्वांत समृद्ध जैवविविधता असलेल्या प्रदेशांपैकी एक आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये असलेले काझीरंगा आणि मानस राष्ट्रीय उद्यान (आसाम) याय प्रदेशात आहे. येथे एकशिंगी गेंड्यासारख्या अनेक दुर्मिळ प्रजाती आढळतात. या राज्यांच्या स्वतःच्या वेगळ्या भाषा, परंपरा आणि जीवनशैली आहेत. हा प्रदेश अनेक बोलीभाषांसाठी ओळखला जातो. चहाचे उत्पादन, नैसर्गिक वायू, तेल आणि बांबू यासारख्या संसाधनांनी ही सात राज्ये समृद्ध आहेत. येथे पर्यटनाच्या भरपूर संधी आहेत. ब्रह्मपुत्रा नदी आणि तिच्या उपनद्या या प्रदेशाला जलविद्युत निर्मितीचे एक प्रमुख केंद्र बनवतात, जी भारताच्या ऊर्जा सुरक्षेत योगदान देऊ शकतात. बांगलादेश आणि आग्नेय आशियाशी जवळीक असल्यामुळे, हा प्रदेश ''अॅक्ट ईस्ट पॉलिसी'' अंतर्गत भारतासाठी व्यापार आणि कनेक्टिव्हिटी प्रवेशद्वार म्हणून उदयास येत आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर तेथील व्यवसायाच्या संधींशी चीनचा संपर्क जोडण्याचे प्रयत्न करणे म्हणजे भारताला डिवचण्यासारखेच आहे. या मुद्यावर आरडाओरड झाल्यावर आणि भारताने युनूस यांनी आपले वक्तव्य मागे घ्यावे, अशी मागणी केल्यावर, बांगलादेशने हे वक्तव्य चीनच्या दबावाखाली दिल्याचा दावा केला आहे. पण त्यातून पूर्वोत्तर राज्यात तणाव निर्माण करण्याचे बांगलादेशचे मनसुबे उघड झालेच. युनूस यांचे हे वक्तव्य केवळ भारताचा अपमान करणारे नाही तर भारत आणि बांगलादेश यांच्यातील व्यापार आणि रस्त्यांच्या संदर्भात झालेल्या करारांचे उल्लंघन करणारे असल्याची बाब ध्यानात घेतली जायला हवी. भारताजवळ खूप मोठी समुद्री सीमा आणि देशाची आर्थिक गरज पूर्ण करू शकणारी कितीतरी बंदरं आहेत. त्यामुळे या देशाने भारताला कमी लेखण्याची कृती केव्हाही त्याच्या अंगलट येऊ शकते.

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचार अजूनही पूर्णतः थांबलेले नाहीत. युनूस यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये हिंदूंना न्याय कठीण झालेला आहे. भारताचे बांगलादेशला वठणीवर आणण्याचे पूर्ण प्रयत्न सुरू आहेत. पण अजून त्यात पुरते यश आलेले नाही. भारताच्याच पुढाकारामुळे बांगलादेशला स्वातंत्र्य मिळाले होते. त्यामुळे या देशाचे पाकिस्तान, चीन आणि अमेरिकेच्या आडून होणारे हल्ले भारतासाठी तापदायक ठरत आहेत. नदीच्या पाण्यावरूनही दोन्ही देशात वाद आहे. गंगा, फरक्का आणि तिस्ता आदी छोट्या-मोठ्या नद्यांच्या पाण्याच्या मुद्यावरून उभय देशांत वारंवार खटके उडत असतात. तथापि, गंगेच्या पाण्याबाबत उभय देशांनी समझोता करून सहमती मिळविली आहे. तिस्ता आणि फेनीसारख्या अनेक नद्यांबाबत अद्याप वाटाघाटी सुरू आहेत. बांगलादेशातून भारतात होणारे बेकायदेशीर स्थलांतर, ज्यामध्ये निर्वासितांचा समावेश आहे, हा एक गंभीर मुद्दा आहे. या घुसखोरीमुळे भारतीय सीमावर्ती राज्यांवर दबाव येतो, ज्यामुळे संसाधने आणि सुरक्षेवर परिणाम होतो. बांगलादेशमार्गे रोहिंग्या निर्वासित भारतात प्रवेश करीत असल्याने ही समस्या आणखी वाढली आहे. असे स्थलांतर रोखण्यासाठी बनवण्यात आलेल्या राष्ट्रीय नागरिक नोंदणीमुळे (एनआरसी) बांगलादेशची चिंता वाढली आहे. एका आकडेवारीनुसार बांगलादेशातून सुमारे ३ कोटी लोकांनी भारतात अवैध घुसखोरी केलेली आहे. या घुसखोरीमुळे सीमावर्ती राज्यांमधील लोकसंख्येत बदल झालेला आहे. अनेक मतदारसंघ मुस्लिमबहुल झाले असून, त्यातून राष्ट्रीय समस्या निर्माण झाली आहे. भारतात ठिकठिकाणी झालेल्या दंगलींमध्ये रोहिंग्या मुस्लिमांचा सहभाग शोधून काढला जात आहे. कारण अशा मुस्लिमांनी देशाच्या सर्वच भागांत आश्रय घेण्यास सुरुवात केली आहे. या सर्व बाबी भारत सरकार बांगलादेशकडे उपस्थित करीत असला तरी युनूस सरकार त्याकडे फारसे लक्ष देण्यास तयार नाही. यातून गुन्हेगारी, अपहरण, खंडणी आणि लव्ह जिहादची प्रकरणे वाढीस लागली आहेत. सीमेपलीकडून अमली पदार्थांच्या तस्करीच्या अनेक घटना घडत आहेत. या सीमांमधून मानवांची (विशेषतः मुले आणि महिलांची) तस्करी केली जाते आणि विविध प्राणी आणि पक्ष्यांच्या प्रजातींची शिकार केली जाते. या बाबी भारताला सतावत असतानाच युनूस यांना चीन-प्रेमाचे भरते आले असून, सात राज्यांचा मुद्दा उपस्थित करून त्यांनी भारतासोबत शत्रुत्व विकत घेतले आहे.

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआयचा वापर पर्यावरण रक्षणासाठी

एव्हाना आपण एका मोठ्या डिजिटल युगात जगू लागलो असून चौथी औद्योगिक क्रांती अनुभवत आहोत. ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील झेप पर्यावरणासह अनेक क्षेत्रांमध्ये प्रभावी मदत करू शकते. एआय मोठ्या प्रमाणावर डेटाचे विश्लेषण करून पर्यावरणीय बदलांची भविष्यवाणी करण्यास सक्षम आहे. यामुळे आपण आपत्तींच्या पूर्वतयारीसाठी अधिक चांगले नियोजन करू शकतो आणि दुष्परिणाम मर्यादित ठेवू शकतो. उदाहरणार्थ, एआयचा वापर करून आपण वादळे, दुष्काळ आणि पूर यांची भविष्यवाणी करू शकतो. उपग्रह आणि ड्रोनमध्ये एआयचा वापर करून आज आपण मोठ्या भौगोलिक क्षेत्रांचे निरीक्षण करू शकतो आणि पर्यावरणीय बदलांचा मागोवा घेऊ शकतो. उदाहरणार्थ, वन कटाई, प्रदूषण आणि जलवायू परिवर्तन यांचा मागोवा घेण्यासाठी एआयचा वापर केला जातो. एआयचा वापर करून आपण ऊर्जावापराचे प्रमाण कमी करू शकतो. उदाहरणार्थ, इमारतींमध्ये एआय-आधारित सिस्टिम्सचा वापर करून आपण तापमान आणि प्रकाश व्यवस्थापन करू शकतो. एआयचा वापर करून आपण जलवायू परिवर्तनाशी संबंधित समस्यांवर काम करू शकतो. कार्बन उत्सर्जनाचे मॉडेलिंग करण्यासाठी, नवीन ऊर्जा स्रोत शोधण्यासाठी आणि जलवायू परिवर्तनाचे परिणाम कमी करण्यासाठी एआयचा वापर केला जातो. एआयचा वापर करून आपण दुर्मिळ प्रजातींचे निरीक्षण करू शकतो आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी योजना आखू शकतो.

थोडे पुढे जाऊन पाहायचे झाल्यास एआयचा वापर करून आपण अधिक टिकाऊ कृषी पद्धती विकसित करू शकतो, हेही लक्षात घ्यायला हवे. उदाहरणार्थ, पाणी आणि खतांचा वापर कमी करण्यासाठी, कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आणि पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी एआयचा वापर केला जातो. एआयचा वापर करून आपण प्रदूषणाचा स्तर मोजून प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना आखू शकतो. आपण जे मोजत नाही ते व्यवस्थापित करू शकत नाही, ही जुनी व्यावसायिक म्हण आहे. जगाला हवामानबदल, निसर्ग आणि जैवविविधता हानी, प्रदूषण आणि कचरा या तिहेरी ग्रहांच्या संकटाचा सामना करावा लागत असल्याने हे आज पूर्वीपेक्षा अधिक खरे आहे. पर्यावरणाचा डेटा पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध आहे, परंतु या संकटांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्याचा अर्थ लावला जातो आणि त्यावर कार्य केले जाते हे महत्त्वाचे आहे. यासाठी केंद्रस्थानी असलेले एक तंत्रज्ञान म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. कार्यक्षम इमारतींची रचना करण्यापासून, जंगलतोडीचे निरीक्षण करण्यापासून अक्षय ऊर्जा योजना राबवण्यापर्यंत पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्याकामी भूमिका बजावू शकते. संवर्धित शेतीमध्ये पिकांचे रोग आणि समस्या लवकर ओळखणे, पशुधनाला वेळेवर पोषण देणे आणि पुरवठा आणि मागणीवर आधारित कृषी निविष्ठा आणि परतावा इष्टतम करण्यासाठी रोबोटिक्सद्वारे स्वयंचलित डेटा संकलन, निर्णय घेणे आणि सुधारात्मक कृती यांचा समावेश आहे. हे उपाय कृषी उद्योगाची संसाधन कार्यक्षमता वाढवून पाणी, खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करतात.

हवामान माहितीशास्त्राचे एक नवीन उपक्षेत्र हवामान अंदाजांमध्ये मूलभूत बदल करण्यासाठी आणि हवामान बदलाच्या परिणामांबद्दलची समज सुधारण्यासाठी एआयचा वापर करते. पारंपरिकपणे उच्च कार्यक्षमतेचे ऊर्जकेंद्रित संगणक आवश्यक असते, परंतु सखोल-शिक्षण नेटवर्क संगणक अधिक जलद चालवण्यास आणि गणनामध्ये वास्तविक-जागतिक प्रणालीची अधिक जटिलता समाविष्ट करू देते. अवघ्या एका दशकात संगणकीय शक्ती आणि एआयमधील प्रगती घरातील संगणकांना आजच्या सुपरकॉम्प्युटरइतकी शक्ती सक्षम करेल, संशोधनाची किंमत कमी करेल, वैज्ञानिक उत्पादकता वाढवेल आणि शोधांना गती देईल. तंत्रे मॉडेल्समधील पूर्वाग्रह सुधारण्यास, डेटाचा ऱ्हास टाळण्यासाठी अचूक डेटा निर्माण करण्यास, घटनांचा अंदाज लावण्यास आणि प्रभाव मॉडेलिंगसाठी वापरण्यात मदत करू शकतात. एआय कचरा व्यवस्थापनातही मदत करू शकते. एआय-आधारित इमेज प्रोसेसिंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कचऱ्याचे स्वयंचलित वर्गीकरण शक्य होते. यामुळे कचऱ्याचे पुनर्वापर आणि पुनर्चक्रण (रिसायकलिंग) अधिक कार्यक्षम बनते. एआयच्या मदतीने कचरा संग्रहण वाहनांचे मार्ग अधिक प्रभावीपणे नियोजित करता येतात. यामुळे कचरा संग्रहण खर्च कमी होतो आणि कचरा संग्रहण प्रक्रिया अधिक जलद होते. एआयचा वापर करून भविष्यात किती कचरा निर्माण होईल याचा अंदाज लावणे शक्य होते. यामुळे कचरा व्यवस्थापन व्यवस्थेचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करता येते. एआय-आधारित सेन्सर आणि कॅमेरे वापरून कचरा टाकण्याच्या ठिकाणांचे निरीक्षण केल्यामुळे कचरा भरून जाण्याची समस्या टाळता येते.

एआय-आधारित चॅटबॉट्स आणि मोबाईल ॲप्सच्या साह्याने नागरिकांना कचरा व्यवस्थापनविषयी जागरूक करणे शक्य होते. या प्रक्रियेमध्ये स्मार्ट कचरा पेट्या स्वतःच कचऱ्याचे वर्गीकरण करतात आणि कचरा वेगवेगळ्या कंटेनरमध्ये टाकतात. कचरा ट्रॅकिंग सिस्टिमच्या मदतीने कचरा संग्रहण वाहनांचे वास्तविक वेळेतील स्थान आणि मार्ग तपासता येतात. एआयचा वापर करून कचरा पुनर्वापर केंद्रांमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण आणि पुनर्वापर अधिक कार्यक्षम बनवले जाते. एआयचा वापर करून कचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनवता येते.

एआयच्या मदतीने ऊर्जेचा अधिक प्रभावीपणे वापर करणे शक्य होत आहे. एआय ऊर्जा व्यवस्थापनात उत्तम मदत करू शकते. एआयच्या मदतीने इमारती, कारखाने आणि इतर सुविधांमध्ये ऊर्जेचा वापर कसा होतो याचे सखोल विश्लेषण करता येते. यामुळे ऊर्जेचा अपव्यय कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात हे ओळखता येते. एआयचा वापर करून भविष्यात किती ऊर्जा लागेल याचा अंदाज लावणे शक्य होते. यामुळे ऊर्जेचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करता येते. एआयच्या मदतीने ऊर्जा उत्पादनाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते. यामुळे ऊर्जा उत्पादन आणि मागणीमध्ये समतोल साधणे शक्य होते. एआयच्या मदतीने ऊर्जा ग्रिड अधिक कार्यक्षम बनवता येते. यामुळे ऊर्जा वितरण अधिक प्रभावीपणे होते. एआयच्या मदतीने सौर, पवन आणि जलविद्युत ऊर्जा स्रोतांना ऊर्जा ग्रिडमध्ये अधिक प्रभावीपणे जोडता येते. आणखी काही मुद्दे तपासून पाहिले असता एआयच्या मदतीने ऊर्जाबचतीचे काही नवीन उपाय शोधणे शक्य होत असल्याचे लक्षात येते. उदाहरणार्थ स्मार्ट मीटरचा वापर. स्मार्ट मीटर्स ऊर्जेचा वापर वास्तविक वेळेत मोजतात आणि ही माहिती एआय सिस्टिमला पाठवतात. या माहितीच्या आधारे ऊर्जा वापराचे विश्लेषण केले जाते. स्मार्ट ग्रिड ऊर्जा उत्पादन आणि वितरण अधिक कार्यक्षम बनवतात. मोबाईल ॲप्स वापरकर्त्यांना त्यांच्या ऊर्जेच्या वापराची माहिती देतात आणि ऊर्जाबचत करण्यासाठी सूचना देतात. एआय हे ऊर्जा व्यवस्थापनातील एक महत्त्वपूर्ण साधन आहे. याच्या मदतीने ऊर्जेचा अधिक प्रभावीपणे वापर करणे, पर्यावरण संरक्षण आणि ऊर्जा खर्च कमी करणे शक्य आहे. त्या दृष्टीने तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात करणे आणि त्या दृष्टीने नानाविध शक्यतांचा विचार करणे शक्य आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**नीलेश जोशी**

# जीवघेणे प्लॅस्टिक प्रदूषण थांबवा

आपली संस्कृती निसर्गपूजक आहे. म्हणून स्वाभाविकच येथे पर्यावरण संवर्धनाला देखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. विविध सण, उत्सवाची परंपरा असणाऱ्या आमच्या संस्कृतीतील रूढी, परंपरा आपसूकच पर्यावरण संवर्धनाला पूरक ठरतात. पूर्वापार भक्तिभावाने, श्रद्धेने साजरे करीत असलेले पर्यावरणपूरक सण एकीकडे तर दुसरीकडे दैनंदिन जीवनात कळत-नकळत पर्यावरणावर आघात होणाऱ्या सवयी अशी विसंगती सद्य:स्थितीत आहे. नियमित व्यवहार काही अंशी सोपे आणि सुखकर व्हावे म्हणून प्लॅस्टिक पिशव्यांसह प्लॅस्टिक वस्तूंचा वापर दिवसेंदिवस वाढतोच आहे. कळते पण वळत नाही अशी आपल्या समाजाची स्थिती आहे. व्यक्तिशः आपण सर्वच जण सर्रास प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करतो. खरचं आपल्याला पर्यावरणाची चिंता आहे का? असेल तर आपण प्लॅस्टिकचा वापर थांबविणार आहोत का? याचे उत्तर स्वतःला देण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. कारण प्लॅस्टिकमुळे केवळ माणसाचाच नव्हे तर पशू, पक्ष्यांचा जीव धोक्यात आला आहे. एवढेच नव्हे तर नष्ट न होणाऱ्या प्लॅस्टिकमुळे शेतजमिनीची पोत दिवसेंदिवस खालावत असून त्यामुळे भविष्यात कृषी उत्पादनाची समस्या गंभीर होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

खरं म्हणजे याच विविध समस्यांमुळे शासनाने सिंगल युज प्लॅस्टिकवर बंदी घातली. पण बंदीची कुठलीही भीड, भीती दिसून येत नाही. राज्यातील कुठल्याही गावातील बाजारात फेरफटका मारला असता शासनाच्या या बंदीचा पुरता फज्जा उडाल्याचे चित्र आहे. मुळात शासनाने बंदी घातली म्हणून नव्हे तर पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व्हावे यासाठी प्लॅस्टिकचा वापर बंद करणे अत्यावश्यक आहे. हा भाव प्रत्येकाच्या आचरणातून दिसायला हवा. प्लॅस्टिक वापराचे भयावह दुष्परिणाम वेळोवेळी दिसून पडतात. अगदी ५ जुलै २००५ किंवा २९ ऑगस्ट २०१७ या दिवशी राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची 'तुंबई' झाल्याचे आपल्या स्मरणात असेलच. नेहमीपेक्षा काही प्रमाणात अधिक झालेल्या पावसामुळे मुंबईत हाहाकार झाला होता. पण त्याचे मूळ कारण शहरातील पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांमध्ये साचलेले, अडकलेले प्लॅस्टिक होते. आपल्या संस्कृतीत गाईला मातेचा दर्जा दिला आहे. आता तर गाय ही आमची 'राज्यमाता' देखील आहे. पण हीच गोमाता गावात फिरताना प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधील अन्नपदार्थ खाते आणि पोटात प्लॅस्टिक साचून तिचा जीव जातो. ज्या गाईला आपण माता म्हणून पूजतो ती गाय आपल्याच चुकीच्या कृतीमुळे हकनाक बळी जाते. मानवाला देखील प्लॅस्टिकमुळे अनेक समस्या व आजार होत असल्याचा निष्कर्ष तज्ज्ञांनी वेळोवेळी दिला आहे. प्लॅस्टिक उत्पादनात वापरल्या जाणारे विविध रासायनिक घटक कर्करोगाला कारणीभूत ठरतात. तर याच रासायनिक घटकांमुळे स्त्री-पुरूषांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो. एवढेच नव्हे तर हृदयविकाराचा धोका देखील प्लॅस्टिकमुळे वाढत असल्याचे म्हटले जाते. अनेकदा प्लॅस्टिक जाळले जाते. त्यातून निघणाऱ्या विषारी वायूमुळे देखील कर्करोग होण्याची शक्यता असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

कोरोना काळापासून आपण सर्वच आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत सतर्क झालो आहोत. त्यातही पिण्याच्या पाण्यातून होणाऱ्या संसर्गाबाबत तर अधिकच जागरूक आहोत. घराबाहेर असल्यास कुठलेही पाणी कसे प्यावे असा विचार करून आता पाण्याची बाटली विकत घेणे हे सहज झाले आहे. पण ज्या आरोग्याची काळजी म्हणून आपण पाण्याची प्लॅस्टिक बाटली विकत घेतो ती कितपत सुरक्षित आहे. याचा कधी विचार केला का? मध्यंतरी झालेल्या एका संशोधनात समोर आलेल्या माहितीनुसार पूर्णपणे बंद बाटलीच्या सरासरी एक लिटर पाण्यात सुमारे १ ते ४ लाख नॅनोप्लॅस्टिक्सचे अदृश्य तुकडे असू शकतात. कोलंबिया युनिव्हर्सिटी आणि रटजर्स युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात ही निरीक्षणे नोंदवली आहेत. मुळात ज्या शुद्धतेसाठी बाटलीबंद पाणी आपण विकत घेतो त्या बाटलीतून आणि जेथे हे पाणी शुद्ध अर्थात फिल्टर केले जाते तेथूनच प्लॅस्टिकचे कण पाण्यात मिसळत आहेत. असे निरीक्षण संशोधकांचे आहे. माणसासह, पशू, पक्षी, गोमाता यांना जीवघेणे तर नदी, नाले, जलसाठ्यांसह पर्यावरणाला घातक ठरत आहे. तरीही प्लॅस्टिकची सतत वाढती मागणी चिंताजनकच म्हटली पाहिजे. शासनाने त्यावर बंदी आणली पण जोपर्यंत जनमनात याबाबत जागरूकता निर्माण होणार नाही तोपर्यंत प्लॅस्टिक प्रदूषण होतच राहील. या प्रदूषण निर्मूलनाकरिता समाजातील प्रत्येकाला पुढाकार घ्यावा लागेल.


९४२२८६२४८४

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राहुल गांधी अकार्यक्षम विरोधी पक्षनेता



मागील आठवड्यात लोकसभेत एक घटना घडली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची चांगलीच कानउघाडणी करीत त्यांच्या सभागृहातील पोरकट वागणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्यांनी विशेषत: विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात वागताना मर्यादा आणि शालीनता यांना अनुसरून आपली वागणूक ठेवली पाहिजे, सदस्यांची वागणूक अनेक वेळा सभागृहातील उच्च परंपरा आणि मापदंड यांना अनुसरून नसते, हे अनेक उदाहरणांवरून माझ्या लक्षात आले आहे. सभागृहात पिता-पुत्री, आई-मुलगी, पती-पत्नी सदस्य राहिले आहेत. त्यामुळे सदस्यांनी सभागृहातील आपले आचरण संसदीय कामकाज नियमांच्या ३४९ नुसार राहील याचीही काळजी घ्यावी, असे ते म्हणाले.

यावर सभागृहात उपस्थित राहुल गांधी बोलायला उभे होताच ओम बिर्ला कामकाज स्थगित करीत आपल्या आसनावरून उठले. सुरुवातीला काय झाले, बिर्ला कोणाला उद्देशून हे बोलत आहे, हे कोणाच्या लक्षात आले नाही. बिर्ला यांचे रौद्ररूप पाहून काँग्रेसचे सदस्यही चकित झाले. राहुल गांधींच्या सभागृहातील नेमक्या कोणत्या वागणुकीवर बिर्ला नाराज झाले, ते सुरुवातीला कोणाला समजले नाही. कारण सभागृहात काही अनुचित घडल्याचे कोणालाच दिसले नव्हते.

सभागृहात बोलण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर राहुल गांधी यांनी सभागृहाबाहेर म्हणजे संसद भवन परिसरात अकांडतांडव केले. विरोधी पक्षनेते म्हणून मला सभागृहात बोलू दिले जात नाही, मी बोलायला उभा होताच माझ्यासमोरचा माईक बंद केला जातो, माझे म्हणणे ऐकले जात नाही, मी बोलायला उभा होताच सभागृहाचे कामकाज स्थगित करून अध्यक्ष निघून जातात, असे बरेच काही राहुल गांधी बोलले. त्यावर त्यांच्या आजूबाजूला उपस्थित काँग्रेसच्या खासदारांनी माना डोलावल्या. काही वेळातच भाजपा आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी समाज माध्यमावर एक व्हिडीओ जारी करत नेमके काय झाले, राहुल गांधींच्या सभागृहातील कोणत्या वागणुकीवर बिर्ला नाराज झाले, हे उघड केले. सभागृहाचे कामकाज सुरू असताना पाठीमागून येणाऱ्या राहुल गांधींनी वायनाडच्या काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांच्या गालावरून हात फिरवला. विशेष म्हणजे असा प्रकार सभागृहात पहिल्यांदा झाला नाही. याआधी अनेक वेळा झाला आहे. राहुल गांधींनी आपल्या लहान बहिणीचा लाड करण्यात गैर काही नाही; मात्र त्यांची बहिणीचा लाड करण्याची जागा चुकली. राहुल आणि प्रियांका हे बहीण-भाऊ आहेत, दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे, हेही सर्वांना माहीत आहे. तरीसुद्धा राहुल गांधी यांची सभागृहातील ही वागणूक सभापतीच नव्हे तर सर्वांना खटकणारी होती. तुम्ही आपल्या घरी वागता तसे सभागृहात वागू शकत नाही.

संसदेच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेत्याचे खूप महत्त्व असते. आतापर्यंत अनेक नेत्यांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवले, आपली छाप पाडली. सभागृहात अनेक वेळा विरोधी पक्षनेता सरकारवर हल्ला चढवतो, सभागृहातील कामकाजावरून अनेक वेळा त्याची सभापतींशीही वादावादी होते, पण यावेळी सभागृहात जे झाले ते अभूतपूर्व होते. विरोधी पक्षनेता बोलायला उभा होताच सत्ताधारी पक्ष अस्वस्थ होतो. आता आपल्यावर कोणत्या मुद्यावरून सरबत्ती होणार, असा प्रश्न त्यांना पडतो. पण राहुल गांधी बोलायला उभे होताच सत्ताधारी सदस्य रिलॅक्स होतात. कारण आपल्या हाताने आपले हसे करून घेण्यात राहुल गांधींचा हात कोणी धरू शकत नाही. जवळपास १० वर्षांच्या अंतराने काँग्रेसला लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळाले. २०१४ ते १९ या काळात लोकसभेत विरोधी पक्षनेता नव्हता, मल्लिकार्जुन खडगे काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. २०१९ ते २४ याही काळात काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळू शकले नाही. त्यावेळी अधीररंजन चौधरी काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. लोकसभेत विरोधी पक्षनेतेपद मिळविण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के जागा जिंकणे आवश्यक असते. काँग्रेस पक्षाला एवढ्याही जागा तेव्हा जिंकता आल्या नव्हत्या. यावेळी काँग्रेस पक्षाला ९९ जागा जिंकता आल्या. त्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळाले आणि काँग्रेसने विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांची निवड करीत हात दाखवून अवलक्षण करून घेतले.

लोकसभेत १९६९ पर्यंत विरोधी पक्षनेतेपद नव्हते. रामसुभगसिंह लोकसभेत पहिले विरोधी पक्षनेते होते. १९७० ते १९७७ या काळातही लोकसभेत विरोधी पक्षनेता नव्हता. जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर यशवंतराव चव्हाण विरोधी पक्षनेते झाले. काही काळासाठी काँग्रेसचे सी. एम. स्टिफन विरोधी पक्षनेते झाले. त्यानंतर पुन्हा यशवंतराव चव्हाण विरोधी पक्षनेते बनले. चौधरी चरणसिंह पंतप्रधान असताना जगजीवनराम अल्पकाळासाठी म्हणजे फक्त २४ दिवसांसाठी विरोधी पक्षनेते होते. विश्वनाथ प्रताप सिंह पंतप्रधान असताना राजीव गांधी वर्षभरासाठी विरोधी पक्षनेते होते. भाजपाचे लालकृष्ण अडवाणी, अटलबिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज यांनीही लोकभेतील विरोधी पक्षनेतेपद भूषविले. अडवाणी तर सर्वांत जास्त काळ लोकसभेचे विरोधी पक्षनेते होते. पी. व्ही. नरसिंहराव तसेच शरद पवार यांनीही विरोधी पक्षनेतेपद भूषविले. राजीव गांधी आणि पी. व्ही. नरसिंहराव आधी पंतप्रधान झाले, नंतर त्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारीही सांभाळली. नरसिंहराव लोकसभेत सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त १५ दिवस विरोधी पक्षनेते होते. अटलबिहारी वाजपेयी आधी विरोधी पक्षनेते होते, नंतर ते पंतप्रधान झाले. इंदिरा गांधी दीर्घकाळ पंतप्रधान होत्या, पण त्यांना विरोधी पक्षनेतेपदाची संधी कधी मिळाली नाही. यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम, स्टिफन, सोनिया गांधी, लालकृष्ण अडवाणी, शरद पवार, सुषमा स्वराज यांना विरोधी पक्षनेतेपदावरच समाधान मानावे लागले. पंतप्रधानपद त्यांना कधी मिळालेच नाही. नाही म्हणायला यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम आणि लालकृष्ण अडवाणी उपपंतप्रधानपदापर्यंत पोहोचले होते, पण त्यांनाही पंतप्रधानपदाने हुलकावणी दिली. खरं म्हणजे विरोधी पक्षनेते म्हणून झालेली निवड ही राहुल गांधी यांच्यासाठी मोठी संधी आहे, पण या संधीचे सोने करण्याची त्यांची क्षमता नाही. मिळालेल्या प्रत्येक संधीची माती करण्याचे अफलातून कौशल्य राहुल गांधी यांनी आत्मसात केले आहे. त्यामुळेच काँग्रेस पक्षाच्या इतिहासातील सर्वांत अपयशी नेता, काँग्रेसचा राष्ट्रीय अध्यक्ष आणि आता विरोधी पक्षनेता अशी त्यांची नोंद इतिहासात होणार आहे आणि यासाठी भाजपा नाही तर ते स्वत:च जबाबदार ठरत आहे.

९८८१७१७८१७

---

## वाचक पत्रे

### संघ म्हणजे चैतन्य



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे जीवनातील एक महान चैतन्यच आहे. संघजीवन म्हणजे एकप्रकारे साक्षात परमानंदच आहे. संघ म्हणजे 'हे माझे नाही, तुझे आहे' असे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजींनी म्हटले आहे. खरेच जगात जे आहे ते दुसऱ्यांना देण्यासाठीच निर्माण झाले आहे. संघजीवनात चैतन्य आहे म्हणूनच जीवनात नैराश्य नाही. माझे जीवन दुसऱ्याच्या कामी पडावे असे वाटते. दुसऱ्याच्या सुख-दुःखात मी आहे हे संघजीवनातून शिकायला मिळते. एकटा मनुष्य म्हणून जीवन जगताना उदासपणा वाटेला येतो, पण चारचौघात मिसळून राहण्यात जो आनंद असतो त्याचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही. संघजीवन म्हणजे संघटित जीवन. एकमेकांच्या हातात हात घालून सत्कर्म करण्यात जो आनंद आहे तोच खरा आनंद. रोज एकत्र येऊन प्रार्थना म्हणायची, विचारांचे आदानप्रदान करणे यातच खरा आनंद. तो आनंद संघाच्या नित्य शाखेतूनच मिळतो. म्हणून नित्य एक तास शाखेत गेले पाहिजे. समाज म्हणजेच राष्ट्र , भारत भूमीत हिंदू समाज एकाच संस्कारात वाढलेला आहे असा हा आपला भारत म्हणजेच हिंदू राष्ट्र आहे. हे हिंदू राष्ट्र आपले दैवत आहे. म्हणून हिंदू शक्तिशाली झाला पाहिजे. पर्यायाने संघ शक्तिशाली झाला पाहिजे. सर्वदूर हे ईश्वरी कार्य वाढले पाहिजे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### मानवनिर्मित समस्यांवर उपाय आवश्यक

काही दिवसांपूर्वी थायलंड आणि म्यानमारमध्ये भयानक भूकंप झाला. त्यात कित्येक लोकांना आपले प्राण गमवावे लागले, हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले, कित्येक इमारती पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळल्या. काही देशात ज्वालामुखी, जंगलातील वणवे, पाऊस, पूर, रोगराई, भयानक थंडी, बर्फवृष्टी, कडक उन्हाळा अशा अनेक प्रकारच्या समस्या सातत्याने येत असतात. अशा नैसर्गिक आपत्तींमुळे त्या देशाचे अतोनात नुकसान होते. त्या नुकसानाची भरपाई करून पुन्हा पूर्वीची परिस्थिती आणण्यासाठी कित्येक वर्षे लागतात. एका संकटातून बाहेर यावे तर दुसरे संकट आ वासून उभे असते.

या पृष्ठभूमीवर भारतीय उपखंडातील देश नशीबवान आहेत. या देशात अशा नैसर्गिक समस्या अपवादानेच येतात. महापुरासारख्या संकटांमधून कायमस्वरूपी मुक्ती मिळवण्यासाठी केंद्र सरकारने नदी जोड प्रकल्पाला गती दिली आहे. वृक्षलागवडीसाठीही सरकार प्रयत्नशील आहे. अर्थात या देशांमध्ये नैसर्गिक समस्यांमुळे होणारे नुकसान नगण्य आहे. मात्र या देशांना मानवनिर्मित समस्यांनी ग्रासले आहे. भारत, पाकिस्तान, बांगलादेशांमध्ये, कोणीतरी स्वार्थासाठी सातत्याने कोणत्या ना कोणत्या तरी समस्यांना जन्म देऊन समाजात अशांतता, अस्थिरता निर्माण करतात. सत्तेसाठी धर्म, जातपात, पंथ, भाषा, प्रांत अशा मुद्यांवरून समाजात फूट पाडतात. देशात याच मुद्यांवरून तणाव निर्माण होतो. त्यातून हिंसक आंदोलने जन्म घेतात. सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले जाते. भारतासारख्या देशातही नैसर्गिक साधनसंपत्तीचा कोणताही तुटवडा नाही. येथील जनता कष्टकरी आहे, बुद्धिमान आहे, जागरूक आहे तरीही काही घटक आपापले स्वार्थ साधण्यासाठी समाजात अशांतता पसरवण्याचे महापाप करत असतात. प्रसारमाध्यमांकडून अशा मुद्यांना अवाजवी प्रसिद्धी दिली जाते. तेव्हा कोणीही कोणत्याही फुटकळ मुद्यांना महत्त्व देऊन स्वार्थासाठी समाजात अशांतता पसरवण्याच उपद्व्याप करू नये.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### पंतप्रधानांचे आगमन एक सुखद क्षण

गुढीपाडवाच्या शुभमुहूर्तावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नागपूरची अविस्मरणीय भेट ही आमच्याकरिता आनंदाचीच पर्वणी असून भाजपाच्या सामान्य कार्यकर्त्यांचा सर्वोच्च सन्मान आहे. भाजपाचे ब्रीदवाक्य आमच्यासाठी प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष व त्यानंतर स्वत: अशाप्रकारे कार्य अविरत सुरू असते. १९८० पासून भाजपाचे कार्य अविरत सुरू आहे. हे कार्य प्रामाणिकपणे करीत असताना रोज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाऊन चांगले संस्कार मिळाले, या संस्कारातूनच आम्ही घडलो. भारतीय जनता पक्षात शिस्त, मानसन्मान, दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे करीत असताना त्या दिलेल्या पदाला न्याय दिला जातो आणि त्यामुळेच भाजपात कार्यकर्ता ते पदाधिकारी सर्वांचाच मानसन्मान होत असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यातर्फे साधारण कार्यकर्त्यांचा आदर केला जातो, हीच आमच्यासाठी आनंदाची बाब आहे.

**आनंदबाबू कदम**/९८६०२०८७३७..

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

## संक्षिप्त वृत्त



### चांदीची नेमप्लेट देऊन सिंहगड पब्लिक स्कूलच्या शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**


सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूलच्या शिक्षकांवर वर्षभर चांगले काम आणि शंभर टक्के उपस्थिती लावणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शंभर टक्के उपस्थिती लावणाऱ्या शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप म्हणून सपना शेलार आणि जुवेरिया शेख या दोन महिला शिक्षिकांचा चांदीची नेमप्लेट देऊन सन्मानित केले. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते, प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले यांच्या उपस्थितीत सन्मान केला. दरवर्षी असा शिक्षकांचा सन्मान केला जातो. यामुळे शाळेतील वातावरण निकोप आणि सकारात्मक राहत आहे. शैक्षणिक वर्षाची सुरुवातीनिमित्त सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पुष्प, भेटवस्तू देऊन सन्मानित केले. सर्वांनीच शैक्षणिक वर्षात चांगले काम केले असून त्यातील काही प्रातिनिधिक स्वरूपात दोघांचा चांदीची नेमप्लेट देऊन सत्कार केल्याचे सांगत कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी सर्वांचे कौतुक केले. सिंहगड पब्लिक स्कूलने १ एप्रिल रोजी शिक्षकांचे आभार मानले.



### मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिले मागणीचे निवेदन

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

शासनाने दहावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा केला आहे. शासनाच्या अध्यादेशात म्हटल्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासूनच इयत्ता ११ वी. आणि १२ वी.या स्तरावर सुद्धा प्रत्यक्ष शाळा व महाविद्यालयात मराठी विषय अनिवार्य करण्यात यावा या मागणीसाठी राज्यभरातून महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने देऊन मागणी करण्यात येत आहे. मराठी ही मातृभाषा तर आहेच, मराठी भाषा ही आत्म्याची भाषा असल्याने शासन स्तरावरून सुद्धा प्रतिसाद मिळत आहे. त्या अनुषंगाने इयत्ता दहावी पर्यंत मराठी भाषा अनिवार्य केल्याचा आनंद असतानाच; इयत्ता अकरावी व बारावी अर्थात उच्च माध्यमिक स्तरावर सुद्धा मराठी हा विषय अनिवार्य करून विद्यार्थी शिक्षक आणि समाज व्यवस्थेला न्याय द्यावा या मागणीसाठी मराठी विषय शिक्षक महासंघाच्या सोलापूर शाखेच्या वतीने आज निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांना निवेदन देण्यात आले याप्रसंगी सोलापूर जिल्हाध्यक्ष प्रा.ज्योतिबा काटे,सचिव प्रा. शिवाजी पाटील,उपाध्यक्ष प्रा.भीमराव चव्हाण,सह-सेक्रेटरी प्रा.माधुरी जाधव,खजिनदार प्रा.अजित देवसाळे, प्रा.जगन्नाथ जाधव आधी पदाधिकारी उपस्थित होते.



### महालक्ष्मी नगरात मूलभूत सुविधांची पूर्तता करा : संभाजी आरमारची मागणी

**सोलापूर, दि. ३ एप्रिल-**

हद्दवाढ भागातील हैद्राबाद रोड येथील महालक्ष्मी नगर (प्रभाग क्र. ११) येथे पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईनसह मूलभूत सुविधांची पूर्तता करावी या मागणीचे निवेदन संभाजी आरमारच्या वतीने अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांना देण्यात आले. अनेक वर्षांपासून कुटुंबे याठिकाणी वास्तव्यास आहेत. नियमितपणे कर भरणा देखील करतात. या ठिकाणी जलवाहिनी नाही. आठवड्यातून एकदा महापालिकेच्या टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. तो देखील अपुरा पडतो. या नगरच्या अलीकडे विक्रम नगर असून तिथपर्यंत पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पोहोचली आहे. तिथून साधारण ५०० फूट अंतरावर असलेल्या महालक्ष्मी नगर येथे मात्र पाईपलाईन नसल्यामुळे नळ जोडणी झालेली नाही. तसेच ड्रेनेज लाईन झालेली आहे मात्र अंतर्गत रस्ते अद्याप झालेले नाहीत. विद्युत पोलवर लाईट नाहीत. महालक्ष्मी नगर येथे नवीन पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकून नळ जोडणी करून मिळावी. तसेच अंतर्गत रस्ते देखील व्हावेत. विद्युत पोलची संख्या वाढवून सर्व पोलवरील लाईट सुरु करावीत आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदन देतेवेळी अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, शहरप्रमुख सागर ढगे , विभागप्रमुख द्वारकेश बबलादीकर आदी उपस्थित होते.

# प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा करणार

**रिझर्व्ह बँकेच्या प्रगतशील धोरणाचे सहकार भारतीकडून स्वागत**

**नागरी सहकारी बँकिंगचे सशक्तीकरण करणारे उपयुक्त धोरण**

**प्रायॉरिटी क्षेत्राला कर्ज देण्याने सबलीकरणाला चालना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

भारतीय रिझर्व्ह बँकेने प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा करण्याच्या धोरणात केलेल्या प्रगतिशील बदलांचे सहकार भारतीने स्वागत केले आहे. रिझर्व्ह बँकेचे हे धोरण नागरी सहकारी बँकांना मोठा दिलासा देणारे आहे. या धोरणान्वये प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा (प्रायॉरिटी सेक्टर लेंडिंग अर्थात पीएसएल) करण्याची मर्यादा ७५ टक्क्यांवरून ६० टक्के करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नागरी सहकारी बँका अधिक सक्षम होणार असून व्यापक आर्थिक सहभागीतासुद्धा वाढणार आहे, असे मत सहकार भारतीने व्यक्त केले आहे.

पीएसएल मर्यादेत घट करून रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांना दैनंदिन कामकाजात येणार्या अडचणी लक्षात घेतल्या असून या बँकांना कर्चवितरणात अधिक लवचिक कारभाराचे स्वातंत्र्य दिले आहे. या निर्णयामुळे नागरी सहकारी बँकांना प्राधान्य क्षेत्रांना कर्जपुरवठा करण्याबरोबरच स्थायी प्रगतीवरही लक्ष केंद्रित करता येणार आहे. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रनिहाय अंतर्गत अर्हता निकषांमध्येही सुधारणा करण्यात आल्याने प्राधान्य क्षेत्रांतील कर्जवितरणाचे उद्दिष्ट गाठणेही नागरी सहकारी बँकांना सोपे होणार आहे. आपल्या निधीचा अधिक नेमका व प्रभावी उपयोग करणे त्यांना शक्य होणार आहे.

प्राधान्य क्षेत्रातील कर्जवितरण धोरणांतील सुधारणांमध्ये गृहकर्ज धोरणातील सुधारणा महत्वपूर्ण ठरणार आहे. यासाठी आणलेल्या नवीन मार्गदर्शक तत्वामुळे नागरी सहकारी बँकांना गृहकर्ज देण्यावरील निर्बंध कमी होणार आहेत. यामुळे परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प, वैयक्तिक गृहकर्ज यात नागरी सहकारी बँकांना आता अधिक पुढाकार घेता येणार आहे. यामुळे शहरी आणि निमशहरी विकासात वित्तीय भागीदार म्हणूनही या बँकांचा सहभाग वाढणार असल्याचे सहकार भारतीने म्हटले आहे.

दीर्घकाळ प्रतीक्षेत आणि अत्यावश्यक असलेल्या या सुधारणांमुळे आर्थिक विकासात नागरी सहकारी बँकांची भूमिका अधिक महत्त्वाची होणार आहे. रिझर्व्ह बँकेने लागू केलेले हे सुधारित धोरण प्रभावीपणे अमलात आणण्यासाठी सहकार भारती कटिबद्ध आहे. या धोरणाचे लाभार्थी ठरणाऱ्या सर्व घटकांसोबत राहून नागरी सहकारी बँका आणि विशिष्ट समूह यांना उपयोग व्हावा यासाठी पुढाकार घेणे सहकार भारती आपली जबाबदारी मानते. नागरी सहकारी बँकांची बाजू प्रभावीपणे मांडून एकूणच सहकार क्षेत्र मजबूत व्हावे यासाठी सहकार भारती सतत प्रयत्नशील आहे.

## महिलेच्या तोंडावर ॲसिड फेकणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ एप्रिल -**




महिलेच्या तोंडावर ॲसिड फेकणाऱ्या तरूणाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रूपाली अभिजित चंदनशिवे (वय ३५, रा. स्लॉटर हाऊस, जय भारत शाळेजवळ, बापूजी नगर, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन रवि ताकतोडे (वय २१, रा. स्लॉटर हाऊस, बापूजी नगर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ एप्रिल रोजी सकाळी सातच्या सुमारास रूपाली चंदनशिवे व त्यांचा मुलगा, लहान भाऊ विशाल हे सर्वजण घरी होते. त्यावेळी त्यांच्या ओळखीचा मधु ताकतोडै हिचा मुलगा रवि हा चंदनशिवे यांच्या घरी आला व त्याने रूपाली यांच्या आईला सुन आली का असे का विचारले असे म्हणून रागाने, थांब तुझ्या अंगावर आता ॲसिडच टाकतो म्हणून हातामध्ये असलेल्या बाटलीचे झाकणाला बिळ पाडून त्यातील ॲसिडचा फवारा रूपाली यांच्या तोंडावर मारला. त्यामुळे रूपाली यांचा चेहरा चुरचुर करू लागला आहे. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

## डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव अध्यक्षपदी पृथ्वीजीत सरवदे, कार्याध्यक्ष डॉ. सायली शेंडगे

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव व विश्वस्त समितीच्या झालेल्या बैठकीत उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पृथ्वीजीत सरवदे यांची तर कार्याध्यक्षपदी डॉ. सायली शेंडगे यांची निवड झाली. सचिवपदी प्रबुद्धकुमार दोड्यानुर, खजिनदारपदी प्रमिला तुपलवंडे तर ऑडिटर म्हणून कपिल बनसोडे हे निवडले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीची बैठक फॉरेस्ट येथील डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल येथे पार पडली. यावेळी विश्वस्त राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, सुभानजी बनसोडे, ॲड. संजीव




सदाफुले, के. डी. कांबळे, माजी नगरसेवक अरुण भालेराव, बबलू गायकवाड, रवी गायकवाड, सुग्रीव जेटीथोर, राजेंद्र रणदिवे, अतुल नागटिळक, राजा कदम, शशी कांबळे, राजरत्न फडतरे, श्रीशैल गायकवाड, विश्वास तळभंडारे, राजा दावणे, अजित गायकवाड, उमेश सुरते, शिवम सोनकांबळे, राहुल शंखे, बाबू बनसोडे, प्रा. मिलिंद गजधने, आनंद सावंत यांच्यासह विविध मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोलापूर जिल्ह्यात वाढणार ५ हजार शिधापत्रिकाधारक!

**२४ हजार ८८१ वाढले युनीट; कोटाही मिळणार आता वाढीव**

**जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यातून वाढीव युनीटबाबत आणि नवीन राशन कार्डधारकांबाबतची मागणी वाढली होती. तब्बल दीड लाख वाढीव युनीटला मंजुरी मिळावी, अशी जिल्ह्यातील राशन दुकानदारांची मागणी होती मात्र त्यातील २४ हजार ८८१ युनीटची मागणी वरिष्ठ पातळीवरून मंजूर करण्यात आली आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यात आता तब्बल ५ हजार राशन कार्डधारक वाढण्याची शक्यता आहे आणि त्यांचा वाढीव कोटाही मिळणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २) दिली.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून नुकत्याच निघालेल्या जीआर नुसार दि. १ एप्रिल २५ रोजी सुधारीत इष्टांक आले प्रत्येक जिल्ह्याला आले आहेत. आपल्या सोलापूर जिल्ह्याकरिता आज अखेर १६ लाख १९ हजार ०८८ लोक संख्येला धान्य मिळत आहे. सोलापूर करिता सुधारीत इष्टांक आता १६ लाख ४३ हजार ९६९ इतके ठेवले आहे. म्हणजे सोलापूर जिल्ह्याकरिता नव्याने फक्त २४८८१ इतके लोक संख्या वाढीव मंजुरी आहे. यामुळे आता नव्याने राशनकार्ड मिळतील आणि कोटाही वाढीव येणार आहे.



आपल्या जिल्ह्यातील ११ तालुक्यामध्ये १ हजार ५५७ दुकाने आहेत.

कोणत्या तालुक्याला किती मंजूर इष्टांक द्यायचा आता ते कार्यालयीन मागणी विचारात घेऊन वरिष्ठ कार्यालयाप्रमाणे मंजुरी देणार आहोत. तशी तर सोलापूर जिल्ह्यासाठी दीड लाख वाढीव युनीट मंजुरी मिळण्याची मागणी होती. मात्र दि.०१.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय सुधारित इष्टांक वितरीत करण्यात आलेला आहे. यात सोलापूर जिल्ह्यासाठी २४८८१ इतके वाढीव युनीटला मंजुरी मिळाली आहे. तालुकानिहाय कॅपिंगसाठी सद्यस्थितीत वेळ लागणार आहे. त्यामुळे संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करून दिलेल्या इष्टांकाचे तालुकानिहाय पुनर्वाटप करण्याचे आदेश तात्काळ निर्गमित करावे, त्यानुसार इष्टांकाचे वाटप होत असल्याबाबत खातरजमा करावी. असेही आदेश या जीआर नुसार काढले असल्याचे सरडे यांनी शेवटी सांगितले.

## राज्यात शिक्षक अभियोग्यता परीक्षा मे-जूनमध्ये होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ मार्च-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने येत्या मे आणि जून महिन्यात शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टीएआयटी) आयोजित करण्यात आली आहे. पवित्र पोर्टलवर सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत उमेदवारांची निवड टीएआयटी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे करण्यात येते. त्यामुळे शिक्षक होण्याची इच्छा असलेल्या पात्रताधारकांनी या परीक्षेची तयारी सुरू करावी, असे आवाहन परीक्षा परिषदेने केले आहे.

राज्यातील शासकीय तथा स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या रिक्त जागा पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरल्या जातात.

सन २०१७ नंतर २०२२ साली शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी घेण्यात आली होती. त्यानंतर आता मे आणि जून महिन्यात टीएआयटी परीक्षा घेण्याची घोषणा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने केली आहे. शिक्षक पात्रता परीक्षेचा पहिला आणि दुसरा पेपर उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवीसाठी निवड केली जाते.

### भावी शिक्षकांना न्याय द्या

सात-आठ वर्षांमध्ये शिक्षक अभियोग्यता परीक्षा तिसऱ्यांदा आयोजित करण्याचा विचार शासन विचारधीन आहे. मंजूर पदांची संख्या जास्त आहे. त्याप्रमाणे उर्वरित रिक्त पदांची भरती पूर्ण व्हावी. यावेळी उर्वरित सर्व जागा भरून भावी शिक्षकांना न्याय द्यावे. परीक्षा नोटिफिकेशन नंतर लगेच ४०-४५ दिवसाच्या आत सर्व प्रक्रिया पूर्ण करून त्याप्रमाणे निवड व नियुक्ती यादी लावण्यात यावे.

**-प्रशांत शिरगूर, राज्य उपाध्यक्ष,**
**डी.एड बी.एड असो.तथा पवित्र पोर्टल संघटना महाराष्ट्र राज्य.**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे राजुरी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांा ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ बी.ए. एलएल.बी. रा. सांगोला, यांचेमार्फत कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन -** तुकडी सोलापूर, पोटतुकडी व तालुके सांगोला पैकी मौजे राजुरी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत गट नंबर ७१२/३/१ क्षेत्र ० हे ०० आर, पो.ख १३२ हेक्टर २८ आर, आकार ० रु. ०० पैसे, पैकी पो.ख. १४ हे ०० आर, तसेच गट नंबर ७११/२/इ/२ क्षेत्र ४ हे ०० आर, आकार ४ रु. ६० पैसे पैकी २ हे ०० आर, आकार २ रू. ३० पैसे या सर्व मिळकती अजय रमेश मुंदडा यांच्या मालकीहक्क प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या मिळकती असून वर नमूद गट नंबर ७१२/३/१ पैकी अजय रमेश मुंदडा यांचे मालकीचे क्षेत्र १४ हे ०० आर यापैकी क्षेत्र पो.ख २ हे ८० आर तसेच गट नंबर गट नंबर ७११/२/इ/२ पैकी अजय रमेश मुंदडा यांचे मालकीचे क्षेत्र क्षेत्र २ हे ०० आर, आकार २ रु ३० पैसे यापैकी ० हे ४२ आर, या मिळकतीसंबंधी अजय रमेश मुंदडा व आमचे अशिलांचे दरम्यान कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकती निर्वेध, निजोखमी, असलेबाबत आमचे अशिलांना अजय रमेश मुंदडा यांनी खात्री व हमी दिलेली आहे.

२) सबब सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी विक्री, तारण, गहाण, लीज, दान, पोटगी, बक्षीसपत्र, बँकेचा बोजा, वहीवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमूद पत्यावर संपर्क करून कागदपत्रांसह शहानिशा करून द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणाची कसलीही तक्रार नाही असे समजून कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कोणाची कसलीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ०२/०४/२०२५

**सही/-**
**(अशिलातर्फे ॲड.)**
**ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ**
**बी.ए.एल.एल.बी. (स्पे.)र.नं.महा.१८४४/२००७**
**रा. रेणुका निवास, कुंभारगल्ली, सांगोला**
**ता. सांगोला जि. सोलापूर**
**मो.७८७५७१९९०९**

### जाहीर समन्स/कारणे दाखवा

रेमुनं. ५८३/२०१२
पु.ने.ता. ०२/०५/२०२५
नि.नं.२८०

**बार्शी येथील मा.सि.ज.सि.डि. यांचे कोर्टात**

**विजयकुमार बिभिषण ननवरे वगैरे - वादी**
**विरुध्द**
**ज्ञानदेव विठ्ठल गाढवे वगैरे - प्रतिवादी**

ज्याअर्थी सदर दावा रे.मु.नं.५८३/२०१२ मधील मयत प्रतिवादी नं. २(अ) याचे वारस खालील सामील प्रपोजल प्रतिवादी

**२(अ)(I) सखाराम भानुदास ननवरे -** वय ५५ वर्षे, धंदा - नोकरी
रा. बोरगांव (खुर्द), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२(अ)(III) कौशल्या भानुदास ननवरे -** वय ७२ वर्षे, धंदा - घरकाम
रा. बोरगांव (खुर्द), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२(अ)(IV) संगिता भानुदास ननवरे -** वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा. बोरगांव (खुर्द), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२(अ)(V) अलका भानुदास ननवरे -** वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा. बोरगांव (खुर्द), ता. बार्शी, जि. सोलापूर

यास दाव्याचे समन्स/कारणे दाखवा नोटीसा न बजावता परत आलेल्या आहेत. त्याची बजावणी सदर प्रपोजड प्रतिवादीवर करण्यात आलेली नाही.

त्याअर्थी या जाहीर/समन्स/कारणे दाखवा नोटीसने कळविण्यात येते की, सदर दाव्यात हजर होण्यासाठी नेमलेली तारीख ०२/०५/२०२५ रोजी अथवा त्यापूर्वी स्वःता अथवा प्रतिनिधी, विधीज्ञ मार्फत दाव्यात हजर होवून आपले म्हणणे दाखल करावेत जर आपण या कोर्टात उपरोक्त प्रमाणे हजर न झालेस सदर दाव्यात आपले कोणतेही म्हणणे/तक्रारी नाहीत व असल्यास त्यास सोडून दिल्या आहेत असे समजून तुमचे गैरहजेरीत तुमचे विरुध्द एकतर्फा सुनवणी होवून एकतर्फा निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स/कारणे दाखवा नोटीस मा. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. २९/०३/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,**
**बार्शी, जि. सोलापूर**

### नावात बदल

माझे जुने नाव **राजेशकुमार तुळशीदास इरकल (Rajeshkumar Tulsidas Irkal)** असे आहे. तरी नवीन नाव **राजेशकुमार तुळशीदास इरकल (Rajeshkumar Tulshidas Irkal)** असे वाचनांत यावे.

### मध्य रेल्वे
**सोलापूर मंडळ**

**यात्री तिकीट सुविधा केंद्राचे संचालन**

**सूचना क्रमांक : SUR/C/COG/YTSK/I/2025.** वरिष्ठ विभागीय कमर्शियल मॅनेजर, सोलापूर विभाग, सेंट्रल रेलवे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने कुर्डुवाडी, पंढरपूर, बार्शी टाउन, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, कलबुर्गी, शहाबाद, वाडी, गाणगापूर रोड, माढा, मोहोळ, दुधनी, अक्कलकोट रोड, भिगवण, जेऊर, सांगोला आणि मोडनिंब येथे यात्री तिकीट सुविधा केंद्राच्या संचालनासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. **(http://www.cr.indianrailways.gov.in)** या वेबसाइटवर तपशील उपलब्ध आहेत अधिक माहितीसाठी **Sr.DCM** कार्यालय सोलापूर **413001** वर संपर्क साधा. **अर्ज करण्याची शेवटची तारीख 30 एप्रिल 2025, 15.00 वाजेपर्यंत आहे.**

**Sr. DCM / सोलापूर**

Sai/SUR/44

**अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे राजुरी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील व परिसरातील लोकांा ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ बी.ए. एलएल.बी. रा. सांगोला, यांचेमार्फत कळविणेत येते की,

**१) मिळकतीचे वर्णन -** तुकडी सोलापूर, पोटतुकडी व तालुके सांगोला पैकी मौजे राजुरी ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत गट नंबर ७१२/३/१ क्षेत्र ० हे ०० आर, पो.ख १३२ हेक्टर २८ आर, आकार ० रु. ०० पैसे, पैकी पो.ख. १४ हे ०० आर, तसेच गट नंबर ७११/२/इ/२ क्षेत्र ४ हे ०० आर, आकार ४ रु. ६० पैसे पैकी २ हे ०० आर, आकार २ रू. ३० पैसे या सर्व मिळकती अजय रमेश मुंदडा यांच्या मालकीहक्क प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या मिळकती असून वर नमूद गट नंबर ७१२/३/१ पैकी अजय रमेश मुंदडा यांचे मालकीचे क्षेत्र १४ हे ०० आर यापैकी क्षेत्र पो.ख २ हे ८० आर तसेच गट नंबर गट नंबर ७११/२/इ/२ पैकी अजय रमेश मुंदडा यांचे मालकीचे क्षेत्र क्षेत्र २ हे ०० आर, आकार २ रु ३० पैसे यापैकी ० हे ४२ आर, या मिळकतीसंबंधी अजय रमेश मुंदडा व आमचे अशिलांचे दरम्यान कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार ठरला असून सदर मिळकती निर्वेध, निजोखमी, असलेबाबत आमचे अशिलांना अजय रमेश मुंदडा यांनी खात्री व हमी दिलेली आहे.

२) सबब सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी विक्री, तारण, गहाण, लीज, दान, पोटगी, बक्षीसपत्र, बँकेचा बोजा, वहीवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील नमूद पत्यावर संपर्क करून कागदपत्रांसह शहानिशा करून द्यावी. अन्यथा आमचे अशिल सदर मिळकतीबाबत कोणाची कसलीही तक्रार नाही असे समजून कायमखुष खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही कोणाची कसलीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे. ता. ०२/०४/२०२५

**सही/-**
**(अशिलातर्फे ॲड.)**
**ॲड. श्री. सुधीर नंदकुमार वाघ**
**बी.ए.एल.एल.बी. (स्पे.)र.नं.महा.१८४४/२००७**
**रा. रेणुका निवास, कुंभारगल्ली, सांगोला**
**ता. सांगोला जि. सोलापूर**
**मो.७८७५७१९९०९**

### अक्कलकोट नगर परिषद, जि. सोलापूर

फोन नं. ०२१८१-२२०२५३ इ-मेल आयडी comcakkalkot123@gmail.com
जा.क्र./अनप/काव/विवि/२०२५/७ दि.०२/०४/२०२५

**- निविदा सूचना -**

अक्कलकोट नगर परिषद न. प. निधी व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून/निविदाधारकाकडून निविदा मागवीत आहे. कोरे निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून दि. १०/०३/२०२५ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालीलप्रमाणे निश्चित किमत जमा केल्यानंतर न. प. कार्यालयात विद्युत विभागाकडे विकत मिळतील.
१) कंत्राटदाराने मोहरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी नगर परिषद अक्कलकोट यांच्याकडे दिनांक १०/०३/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदासोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) जमा केलेल्या बयाना रकमेचा पावती क्रमांक सीलबंद लिफाफ्यावर नमूद करावा ४) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ०५.०० वाजता मा. मुख्याधिकारी तथा प्रशासक यांच्या दालनात समक्ष उघडण्यात येतील. ५) पात्र निविदा धारकाच्या बिलातून अनामत रक्कम, आयकर, GST, कामगार उपकर इ. बाबींची रक्कम नियमानुसार कपात करण्यात येईल. ६) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून विद्युत विभागात पहावयास मिळतील. ७) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न. प. ने राखून ठेवला आहे. ८) निधी उपलब्धतेनुसार कामाचे देयक प्रदान करण्यात येईल याची नोंद घेऊन निविदा प्रक्रियेत सहभाग घ्यावा.

| अ. क्र. | कामाचे तपशील | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म फीस | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी निवास स्थानाचे इलेक्ट्रीकल फिटींक करणे. | १,५०,५२६/- | ३,०२०/- | १२,०५०/- | ५९०/- | ३० दिवस |
| २ | अक्कलकोट शहरातील विविध ठिकाणाचे कारंजासाठीचे विद्युत काम करणे. | - | ४,०००/- | १६,०००/- | ५९०/- | ३० दिवस |
| ३ | नगर परिषद कार्यालयातील १० केव्हीए जनरेटरची दुरुस्ती करणे. | - | २,०००/- | ८०००/- | ५९०/- | ३० दिवस |
| ४ | नगर परिषद कार्यालयातील सोलर इनव्हर्टरची दुरुस्ती करणे. | - | २,०००/- | ८०००/- | ५९०/- | ३० दिवस |

**सही/-**
**डी.एस. शेळके**
**विद्युत अभियंता**
**अक्कलकोट नगर परिषद**

**सही/-**
**आर.डी.डाके**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**अक्कलकोट नगर परिषद**

Classifieds

**पाहिजेत**

जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात सकाळी काम करण्यासाठी २५ ते ३० वयोगटातील मुलगा पाहिजे.
संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### जागतिक मुष्टियुद्ध चषक, जदुमणी सिंग उपांत्य फेरीत



**नवी दिल्ली** : दबावाखाली दृढ प्रदर्शन करत राष्ट्रीय विजेता जदुमणी सिंग मंडेंगबॅमने बुधवारी ग्रेट ब्रिटनच्या एलिस ट्रॉब्रिजवर मात करून ब्राझील २०२५ च्या जागतिक मुष्टियुद्ध चषक स्पर्धेमध्ये ५० किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. २०२४ च्या जागतिक मुष्टियुद्ध चषकाच्या अंतिम फेरीत रौप्यपदक विजेत्या ट्रॉब्रिजने आपल्या नेहमीच्या आक्रमक शैलीत लढाई सुरू केली, परंतु भारतीय खेळाडू दबाव सहन करण्यास व त्याचे पंच मारण्याचे मार्ग शोधण्यास सज्ज होता. अखेर जदुमणीने ३-२ च्या विभाजित निर्णयाने आपल्या बाजूने विजय मिळवला. जदुमणी आता अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी माजी आशियाई २२ वर्षांखालील विजेता असिलबेक जालिलोव्हशी सामना करेल. तथापि, तिन्ही खेळाडूंना त्यांच्या संबंधित लढतींमध्ये संघर्ष करावा लागल्यामुळे ७५ किलो, ८५ किलो आणि ९०+ किलो वजनी गटातील भारताचे आव्हान संपुष्टात आले. निखिल दुबे काउ बेलिनीविरुद्ध ०-५ अशा फरकाने हरला, तर जुग्नू फ्रान्सच्या अब्दुलाये त्राओरविरुद्ध १-४ अशा फरकाने चुकीच्या पद्धतीने खेळला. नरेंदरला कझाकस्तानच्या डॅनियल सपरबेलाकडून पराभव पत्करावा लागला. मनीष राठोड (५५ किलो) ऑस्ट्रेलियाच्या पॅरिस ऑलिंपियन युसुल्फ चोथियाविरुद्ध, हितेश (७० किलो) इटलीच्या गॅब्रिएल गुइडी रोंतानीशी, तर अभिनाश जामवाल (६५ किलो) जर्मनीच्या डेनिस ब्रिलविरुद्ध खेळेल.

### कर्णधार नसलो तरी मानसिकता तशीच : रोहित

**नवी दिल्ली** : मी मुंबई इंडियन्सचा कर्णधार होतो, आता मी नाही, पण मानसिकता पुन्हा तशीच आहे. मी सुरुवात केल्यापासून बरेच काही बदलले आहे, परंतु फ्रॅन्चायझीसाठी सामने आणि ट्रॉफी जिंकण्याची त्याची आवड आणि इच्छा कधीही बदललेली नाही, असे रोहित शर्मा म्हणाला. आयपीएलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी खेळाडूंपैकी एक असलेल्या रोहित शर्माने मुंबई इंडियन्समध्ये गत काही वर्षांत नवीन भूमिकांशी जुळवून घेण्यापासून ते संघाला वैभवापर्यंत नेण्यापर्यंतची त्याची भूमिका कशी विकसित झाली आहे यावर तो बोलत होता. मी आधी मधल्या फळीत फलंदाजी करायचो; आता, मी डावाची सुरुवात करतो. मी कर्णधार होतो; आता, मी नाही. आमच्या चॅम्पियनशिप जिंकणाऱ्या हंगामातील माझे काही सहकारी आता प्रशिक्षकाच्या भूमिकेत आहेत. म्हणून, भूमिका बदलल्या आहेत, बरेच काही बदलले आहे, परंतु मानसिकता तशीच आहे. या संघासाठी मी जे करू इच्छितो ते बदललेले नाही, असे तो म्हणाला. रोहितने २०२० नंतरची त्याची सर्वात वाईट आयपीएल सुरुवात केली आहे. तो चालू आयपीएल २०२५ च्या पहिल्या दोन-तीन सामन्यांमध्ये सर्वोत्तम कामगिरी करण्यात अपयशी ठरला आहे, चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या मोहिमेच्या सलामीच्या सामन्यात तो शून्यावर बाद झाला. तो गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात पुन्हा अपयशी ठरला, त्याने केवळ ८ धावा केल्या व मुंबई इंडियन्सने शनिवारी ३६ धावांनी सामना गमावला, त्यानंतर त्याने केकेआरविरुद्धच्या सामन्यात १३ धावा केल्या.

### हॉकी विश्वचषकासाठी ५०० दिवस शिल्लक

**लॉसाने** : एफआयएच हॉकी विश्वचषक स्पर्धेला आतापासून ५०० दिवस शिल्लक आहे. १५ ते ३० ऑगस्ट २०२६ दरम्यान बेल्जियम आणि नेदरलॅण्ड्समध्ये होणाऱ्या हॉकी विश्वचषकांत जगभरातील १६ पुरुष व महिला संघ सहभागी होणार आहे. महिला व पुरुष हॉकी विश्वचषक एकत्रित करण्याची ही पहिलीच वेळ असेल. बेल्जियम व नेदरलॅण्ड सह-यजमान असतील. यजमान देशांशिवाय जर्मनी (महिला) व ऑस्ट्रेलिया (पुरुष) या संघांनी गत हंगामात हॉकी प्रो-लीगद्वारे विश्वचषकासाठी तिकिटे जिंकली होती. पुढील दोन संघ (एक महिला संघ व एक पुरुष संघ) सुद्धा एफआयएच प्रो-लीगद्वारे पात्र ठरतील. जुलै ते सप्टेंबर २०२६ दरम्यान होणाऱ्या पाच कॉन्टिनेंटल स्पर्धेमुळे प्रत्येक पुरुष व महिला विभागासाठी पाच इतर संघ पात्र ठरतील, असे आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने बुधवारी सांगितले. उर्वरित सात सहभागी संघ - प्रत्येक विभागासाठी एकूण १६ संघांपैकी - पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषक पात्रता फेरीतून येतील. ही पात्रता फेरी सध्या २८ फेब्रुवारी ते ८ मार्च २०२६ दरम्यान नियोजित आहे,असे म्हटले आहे. विश्वचषकाच्या गट टप्प्यासाठी प्रत्येक विभागासाठी चार पूल निश्चित करण्यासाठी ड्रॉ या पात्रता फेरीनंतर लवकरच होईल.

# गुजरातचा सलग दुसरा विजय, बंगळुरुला नमविले

## जॉस बटलरच्या नाबाद ७३ धावा, मोहम्मद सिराजचे १९ धावांत तीन बळी

**बंगळुरू, दि. २ एप्रिल**

गुजरात टायटन्सने आयपीएल २०२५मध्ये सलग दुसरा विजय नोंदवला. बुधवारी त्यांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा ८ गडी राखून पराभव केला.

एम चिन्नास्वामी स्टेडियमवर १७० धावांचे लक्ष्य त्यांनी १७.५ षटकांत २ गडी गमावून पूर्ण केले. जोस बटलरने ३९ चेंडूत नाबाद ७३ धावा आणि शेरफान रुदरफोर्डने १८ चेंडूत नाबाद ३० धावा केल्या. साई सुदर्शन ४९ धावा करून बाद झाला. जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. आरसीबीकडून लियाम लिव्हिंगस्टोनने (५४ धावा) अर्धशतक झळकावले. जितेश शर्माने ३३ आणि टीम डेव्हिडने ३२ धावा केल्या. मोहम्मद सिराजने ३ तर साई किशोरने २ विकेट घेतल्या. अर्शद खान, प्रसिध कृष्णा आणि इशांत शर्मा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. गुजरात टायटन्सकडून वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने शानदार कामगिरी केली. आरसीबी विरुद्धच्या या सामन्यात मोहम्मद सिराजने ४ षटकांत फक्त १९ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. सिराज गेल्या हंगामात फ्रँचायझीकडून खेळला होता. परंतु फ्रँचायझीने त्याला कायम ठेवले नाही किंवा मेगा लिलावात खरेदी केले नाही. अशा परिस्थितीत, सिराजने त्याच आरसीबीविरुद्ध कहर केला.



# कोलकाता, हैदराबाद विजयाच्या मार्गावर परतण्यास उत्सुक

**कोलकाता, २ एप्रिल**

गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स व गत हंगामातील अंतिम फेरीतील संघ- सनरायझर्स हैदराबाद या दोन संघांना गत तीनपैकी दोन सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला, त्यामुळे ते आयपीएलमध्ये अडचणीत सापडले आहेत. गुरुवारी ईडन गार्डन्स स्टेडियमवर हे दोन्ही संघ आमने-सामने उभे ठाकतील, तेव्हा ते आपल्या मोहिमांना पुन्हा जिवंत करण्यासाठी उत्सुक असतील.

या हंगामाच्या प्रारंभी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या दारुण पराभवानंतर केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणेने आपल्या संघाच्या अडचणींकडे दुर्लक्ष केले व घाबरण्याची गरज नाही असे त्याने सवंगड्यांना सूचित केले.

तथापि, गत आयपीएल २०२४ मध्ये आपल्या विजयी मोहिमेत केकेआरने घरच्या मैदानावर व बाहेरच्या मैदानावर केवळ तीन सामने गमावले होते.

आता लक्ष ईडन गार्डन्सच्या खेळपट्टीवर केंद्रित झाले आहे. आरसीबीविरुद्ध केकेआरच्या सात



अजिंक्य रहाणे



पॅट कमिन्स

गड्यांनी पराभव केला. केकेआरचे माजी सलामीवीर फिल साल्ट व विराट कोहलीने घरच्या संघाचा पराभव केला व १७५ धावांचा पाठलाग करताना अवघ्या ५१ चेंडूत ९५ धावांची भागीदारी केली.

बंगाल क्रिकेट संघटनेवर सुनील नरेन, मोईन अली व वरुण चक्रवर्तीचा केकेआरच्या फिरकी गोलंदाजांना मदत करणारी खेळपट्टी तयार करण्याचा दबाव आहे.

गत महिन्यात चॅम्पियन्स चषकाच्या विजयात केलेल्या कामगिरीनंतर ताजेतवाने झालेल्या चक्रवर्तीला आरसीबीविरुद्ध पाटा खेळपट्टीवर संघर्ष करावा लागला.

पंजाब किंग्जने एकाना स्टेडियमवर त्यांना हरवल्यानंतर भारतीय महान आणि लखनऊ सुपर जायंट्सचे मार्गदर्शक झहीर खान यांनीही घरच्या संघाचा फायदा घेण्याचे आवाहन केल होते.

ईडन गार्डन्सचे पिच क्युरेटर सुजन मुखर्जी यांनी केकेआरच्या पहिल्या सामन्यात फिरकीला अनुकूल खेळपट्टी तयार करण्याची विनंती नाकारली होती, परंतु हा निर्णय उलटाच ठरला असे दिसून येते. त्यांच्या प्रमुख फिरकीपटूंपैकी एक असलेल्या चक्रवर्तीने त्या सामन्यात ४५ धावा दिल्या. सुजन मुखर्जीने आपल्या भूमिकेचे समर्थन केले, तर सीएबीचे अध्यक्ष स्नेहाशिष गांगुली क्युरेटरसोबत खेळपट्टीचे बारकाईने निरीक्षण केले व केकेआरच्या आगामी घरच्या सामन्यांसाठी दृष्टिकोनात बदल होण्याची शक्यता दर्शवत आहेत.

### संघाची रणनीती

लिलावानंतर केकेआरच्या संघ रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. त्यांच्या फलंदाजी व गोलंदाजी विभागासमध्ये समन्वय नसल्याचे दिसून आले आहे. प्रमुख खेळाडू कामगिरी करण्यात अपयशी ठरले आहेत. केकेआरचे चार खेळाडू- माजी कर्णधार श्रेयस अय्यर (पीबीकेएस), त्याचा उपकर्णधार नितीश राणा (आरआर), फिल साल्ट (आरसीबी) आणि वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क (दिल्ली कॅपिटल्स) - या सर्वांनी आयपीएलच्या पहिल्या १० दिवसांत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

दरम्यान, केकेआरचा व्यंकटेश अय्यर दोन डावांत केवळ ९ धावा करू शकला आहे, त्यामुळे संघाच्या अडचणीत भर पडली आहे.

राखून ठेवलेल्या खेळाडूंमध्ये, रिंकू सिंग, आंद्रे रसेल, सुनील नरेन, हर्षित राणा व रमणदीप सिंगला संघर्ष करावा लागत आहे.

### हैदराबादचे नुकसान

सनरायझर्स हैदराबादने आपल्या हंगामाच्या पहिल्या सामन्यात विक्रमी ६ बाद २८६ धावा केल्यानंतर, गत दोन सामन्यात २०० धावांचा टप्पा ओलांडण्यास संघर्ष केला आहे. त्यांच्या अति-आक्रमक फलंदाजीबाबत फाजील आत्मविश्वासामुळे लखनौ सुपर जायण्ट्स (९ बाद १९०) व दिल्ली कॅपिटल्स (सर्वबाद १६३) विरुद्ध पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे त्यांना सलग दोन पराभव स्विकारावे लागले.

गत हंगामातील आयपीएल अंतिम सामन्यातील पराभवाचा बदला घेण्यासाठी पॅट कमिन्सच्या संघाला रणनीतीचा पुनर्विचार करावा लागेल. कमिन्स व मोहम्मद शमी ही वेगवान जोडी ईडन गार्डन्सवर एक महत्त्वाचा धोका निर्माण करू शकते. स्थानिक पातळीवर बंगालचे प्रतिनिधित्व करणारा भारताचा वरिष्ठ वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी घरच्या परिस्थितीत प्रभाव पाडण्यास उत्सुक असेल. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**कोलकाता नाईट रायडर्स वि. सनरायझर्स हैदराबाद**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# यशस्वी जयस्वाल मुंबई सोडून गोव्यात जाणार

**मुंबई, २ एप्रिल**

भारताचा सलामीवीर यशस्वी जयस्वालने वैयक्तिक कारणांमुळे मुंबई सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

यस्वालने मुंबई क्रिकेट संघटनेला पत्र लिहून गोव्यात जाण्याची इच्छा व्यक्त केली व प्रशासकीय मंडळाने त्याची विनंती मान्य केली आहे. जयस्वालच्या या धक्कादायक निर्णयामुळे २३ वर्षीय डावखुरा खेळाडू २०२५-२६ हंगामापासून गोव्यासाठी खेळणार आहे.

हो, हे आश्चर्यकारक आहे. यशस्वी जयस्वालने असा निर्णय घेण्यासाठी काहीतरी विचार केला असेल. त्याने आम्हाला त्याला मुक्त करण्याची विनंती केली आहे आणि आम्ही त्याची विनंती मान्य केली आहे,'' असे मुंबई क्रिकेट संघटनेच्या एका अधिकाऱ्याने बुधवारी वृत्तसंस्थेला सांगितले.

सर्व भारतीय खेळाडूंनी राष्ट्रीय कर्तव्यावर नसल्यास देशांतर्गत क्रिकेट खेळावे या बीसीसीआयच्या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यानंतर जयस्वालने २३-२५ जानेवारी दरम्यान जम्मू-काश्मीरविरुद्ध रणजी करंडक गट एच्या साखळी फेरीत मुंबईसाठी शेवटचा सामना खेळला होता.

(वृत्तसंस्था)



### क्रिकेट खेळाडूंची नोंदणी करण्याठी रविवारी बैठक

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

जिल्हा क्रिकेट संघटना १ मे पासून खेळाडू रजिस्टर योजना सुरू करणार आहे. त्यामध्ये सर्व क्रिकेट खेळाडूंना स्मार्ट कार्ड देण्यात येणार आहे त्यासाठी रविवारी ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा क्रिकेट संघटनेच्या कार्यालयात शहर व जिल्ह्यातील सर्व क्रिकेट क्लब, शाळा, कॉलेज प्रतिनिधींची बैठक आयोजित केली आहे. तरी शहर व जिल्ह्यातील प्रत्येक क्लब, शाळा, महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे.


# जयहिंद कुर्डुवाडी, अभिसद्ध क्लबचे विजय

## रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : शुभंकर निकम व शशी ओहोळ सामन्याचे मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत अभिसिद्ध क्रिकेट क्लबने भंडारी स्पोर्टस् क्लबचा ३ गडी राखून पराभव केला. दुसऱ्या सामन्यात कुर्डुवाडीच्या जयहिंद क्लबने चंद्रकांत किल्लेदार क्रिकेट क्लबवर ४७ धावांनी मात केली.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत बुधवारच्या सामन्याचे मानकरी शुभंकर निकम व शशी ओहोळ हे ठरले. प्रत्येक सामनावीरचे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत



**सोलापूर : सामनावीर पुरस्कार शुभांकर निकम यांस अंबादास तोरा यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी इन्स्टिटयूटचे खजिनदार विक्रांत पवार, अतुल बांडीवाडीकर व सचिन गायकवाड. दुसऱ्या सामन्यातील सामनावीर पुरस्कार शशी ओहोळ यास इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी राजा पटेल व लियाकत शेख.**

आहेत. बुधवारच्या सामन्यासाठी पंच म्हणून अशोक डोंबाळे, मजहर मंगोली, नंदकुमार टेळे व सुहेल शेख तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक : भंडारी स्पोर्ट्स क्लब (ब)** : १३.३ षटकांत सर्व बाद ७२ (ओंकार राठोड १४, रोहन चव्हाण १२, विश्वनाथ १२ , ओंकार राठोड १२, शुभंकर निकम ५ बळी, मंजित नवले २ बळी) पराभूत विरुद्ध **अभिसिद्ध क्लब** : १२.४ षटकांत ७ बाद ७६ (लखन गावडे १६, प्रित्विराज गवळी १२, अभिषेक तंबाखे ३ बळी, ओंकार राठोड २ बळी, **जय हिंद कुर्डूवाडी:** २० षटकांत ९ बाद १३६ (मकरंद जाधव २३, साई गायकवाड २१, शशी ओहोळ १४, सचिन घोडसे १४, अमोल अलमेलकर ३ बळी, आकाश सुतार व ओंकार कोरे २ बळी) वि.वि. **चंद्रकांत किल्लेदार क्लब** : १८.२ षटकांत सर्व बाद ८९ ( श्रेयस जहागिरदार २५, प्रिन्स पटेल २०, शशी ओहोळ ४ बळी, अभिजित म ुळे ३ बळी, सचिन सुरवसे, प्रद्युम्न साटव व मकरंद जाधव प्रत्येकी एक बळी.

**आजचे सामने**

सिटी टायटन्स विरुद्ध जी.के.सी.ए. बिजापूर क्लब विरुद्ध उस्मानाबाद क्लब

# महाराष्ट्र, कोल्हापूर व विदर्भचे पुरुष, महिला संघ उपउपात्यंपूर्व फेरीत

## ५७वी वरिष्ठ गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**पुरी (ओडिशा), दि. २ एप्रिल-**

महाराष्ट्राबरोबर कोल्हापूर व विदर्भच्या पुरुष व महिला संघाने ५७व्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेच्या उपउपात्यंपूर्व फेरीत प्रवेश केला.

पुरी येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने साखळी स्पर्धेतील सर्व सामने जिंकत गटातून अव्वल स्थान पटकाविले.

साखळीतील सामन्यात महाराष्ट्राच्या पुरुषांनी दादरा आणि नगर हवेली संघावर ५४-२० असा एक डाव राखून ३४ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. यात दादरा हवेलीला बाद करून एकही गुण मिळविता आला नाही. महाराष्ट्राचे सर्व खेळाडू संरक्षण करून निवृत्त झाले. यात प्रतिक वाईकरने (१.२० मि. संरक्षण व ४ गुण), अनिकेत चेंडवणकर (१.३० मि. व ४ गुण) व ऋषिकेश मुर्चावडे (१.३० मि. व ४गुण) यांनी अष्टपैलू खेळ केला. निहार दुबळे व रविकिरण केंचे यांनी आपल्या आक्रमणात प्रत्येकी ६ गडी बाद केले. शेवटच्या साखळी सामन्यात





### असे होणार उपउपांत्यपूर्व फेरीचे सामने

- **पुरुष** : महाराष्ट्र विरुद्ध महाराष्ट्र पोलिस, कोल्हापूर विरुद्ध दिल्ली, विदर्भ विरुद्ध केरळ
- **महिला** : महाराष्ट्र विरुद्ध केरळ, कोल्हापूर विरुद्ध राजस्थान, विदर्भ विरुद्ध दिल्ली.

महाराष्ट्राने तामिळनाडूस ३३-२४ असे ९ गुण व ४.५९ मिनिटे राखून नमविले. यात मिलींद चवरेकरने आपल्या धारदार आक्रमणात ८ गडी टिपले. शुभम थोरात (२.३० मि.व २ गुण) व प्रतिक वाईकर (१.२०, १.३० व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळ केला. तामिळनाडूकडून व्ही. शुभ्रम णी (१.00 मि.व ६ गुण) याची एकाकी लढत अपुरी पडली.

महिला गटात महाराष्ट्राने जम्मू काश्मिरचा ५३-१० असा एक डाव राखून ४३ गुणांनी धुव्वा उडविला. महाराष्ट्राचे सर्व खेळाडू संरक्षण करून निवृत्त झाले. जम्मू काश्मीरला बाद करून एकही गुण मिळविता आला नाही. यात सुहानी धोत्रे हिने (२.३० मि. व ६गुण), संपदा मोरे (२.५० मि. व ३ गुण) मनीष पेडेर (१.४०मि. व ६गुण) व पायल मोरे (१.४० मि. नाबाद व २ गुण) यांनी अष्टपैलू कामगिरी केली. दुसऱ्या सामन्यात त्यांनी पंजाबवर ३२-११ असा २१ गुणांनी पराभव केला. प्रियांका इंगळे (१.३० मि. ८गुण), संध्या सुरवसे (३.१५ मि. व ४गुण) व रेश्मा राठोड (१.२०मि. व ४ गुण) यांनी संघाच्या विजयात अष्टपैलू खेळी केली. पंजाबकडून राणी (१.३५ मि संरक्षण) व नीता देवी (४गुण) यांची लढत अपुरी ठरली.

महिलांच्या अन्य एका सामन्यात विदर्भाने मध्य भारतचा ३७-२० असा पराभव केला.

**अन्य निकाल : पुरुष:** महाराष्ट्र पोलिस विजयी विरुद्ध मणीपूर ३५-२३, पश्चिम बंगाल वि.वि. अखिल भारतीय पोलिस ३०-१८, आंध्र वि.वि. मेघालय ४५-८, केरळ वि.वि. कर्नाटका पोलिस ४५-१२, दिल्ली वि.वि. मध्य भारत २८-१९.

**महिला** : पंजाब वि. वि. तेलंगणा २२-१४, केरळ वि. वि. महाराष्ट्र पोलिस २६-९.

# तनुजा माळी व समृद्धी चट्टेची क्रिकेट स्पर्धेत दमदार कामगिरी

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

पुणे येथे झालेल्या अकरा वर्षाखालील २२ षटकाच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत आलेगाव (दक्षिण सोलापूर) येथील तनुजा माळी आणि देगाव नाका थोबडे मळा येथील समृद्धी चट्टे या दोन मुलींनी उत्कृष्ट कामगिरी केली.

समृध्दीने सामन्यात ७ विकेट घेऊन उत्कृष्ट गोलंदाजी केली. तिने पहिल्या सामन्यात तीन षटकांमध्ये एक ओव्हर मेडन टाकत ११ धावांत तीन गडी बाद केले. दुसऱ्या साम न्यात चार षटकांमध्ये एक ओव्हर मेडन टाकत २० धावांत एक गडी बाद केला. तनुजाने मालिकावीर व तीन उत्कृष्ट फलंदाज पुरस्कार मिळवले. तनुजा ही केंद्रीय विद्यालय सदन कमांड इयत्ता ६ मध्ये शिकत असून तिने तीन सामन्यांत एका शतकासह २४४ धावा फटकावल्या. ती टीम सचिन संघाकडून खेळून अंतिम सामन्यात तिने टीम रोहित संघाविरुद्ध ३४ चेंडूमध्ये नाबाद ४६ धावा काढल्या पहिल्या लीग सामन्यात तनुजाने टीम रोहित संघाविरुद्ध ५८ चेंडूमध्ये ११८ धावा काढल्या व सामनावीराचा पुरस्कार मिळवला. दुसऱ्या लीग सामन्यामध्ये तनुजाने टीम विराट संघाविरुद्ध ४0 चेंडूमध्ये ८0 धावा काढल्या व सामनावीराचा पुरस्कार मिळवला. समृध्दी व भार्गव पुसेगावकर यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. हर्षवर्धन गिरी यांनी उत्कृष्ट क्षेत्ररक्षण केले. कोच विठ्ठल वाघमोडे बी ए स्पोर्ट्स दापोडी सेंटर व कोच अभिषेक, सुधांशू, आश्विन शुक्ला, सिद्धेश यांच्या मार्गदर्शनाखाली हे सामने खेळवण्यात आले. तनुजाला माजी फर्स्ट क्लास महिला क्रिकेटर शिवानी गुप्ता यांचे प्रशिक्षण लाभले. ९ मार्च झालेल्या सामन्यात क्रिक ९ संघाविरुद्ध ६८ चेंडूमध्ये १२० धावा काढून तनुजाने पहिलं शतक केले होते.



## महत्त्वाचे वृत्त...



### वळसंग येथे पटेल प्रतिष्ठानच्या वतीन ईद मिलन कार्यक्रम

**वळसंग, दि. २ एप्रिल-**

वळसंग येथील पटेल प्रतिष्ठानच्या वतीने यंदाच्या वर्षी ही गावातील हिंदु मुस्लिम बांधवाना सोबत घेऊन ईद मिलनचा सामाजिक सलोखा राखणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी वळसंग पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मा.अनिलजी सनगल्ले यांच्या देखरेखिखाली पोलीस स्टेशन हद्दित विविध धार्मिक उत्सव,सण,ईद,जत्रा या शांततेत आणि कायदा व सुव्यवस्थेत पार पाडल्या बद्दल प्रतिष्ठानचे सचिव सादिक पटेल यांच्या हस्ते सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कारा करण्यात आला. याप्रसंगी सरपंच जगदीश आंटद, माजी सरपंच श्रीशैल दुधगी, माजी सरपंच सिद्धाराम कोडले, माजी सरपंच महादेव होटकर, पत्रकार अल्ताफ टेल, आचेगांवचे उपसरपंच रफिक मुल्ला, दत्ता पाटील, सागर कोळी, जैद पटेल, अशरफ पटेल, मुआज़ पटेल, अवैस पटेल, असद पटेल, स्वामीनाथ कोडले, संगण्णा खैराटे, बसवेश्वर कलशेट्टी, सिद्धारूढ़ काळे, दाऊद अमलिचुंगे, चनबसप्पा खैराटे, सुभाष खैराटे, लक्ष्मण हंजगे, सिद्धेश्वरर मोरे, सिद्धाराम सुतार, दीपक गायकवाड़, अनिल बर्वे, मल्लिनाथ ढब्बे, रिटायर्ड खंडेराव शिंदे, शिवानंद चिंचोळी, गुरु काका माणकोजी, बालाजी परसवार, सिद्धाराम तिपरादी, सिद्धाराम चौगुले, महेश खैराटे, अनिल म्हेत्रे, चन्नप्पा यळवार, मल्लिनाथ कोरे यांच्यासह पत्रकार कल्लय्या स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.



### नवनाथ महामुनी यांना युवा समाजभूषण पुरस्कार प्रदान

**मंगळवेढा, दि. २ एप्रिल-**

सतीश उर्फ राजेश पंडित स्थापित अखिल सोनार समाज प्रतिष्ठान,अंबेजोगाई व सर्व शाखीय सोनार हक्क परिषद,महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने मंगळवेढयाचे सामाजिक कार्यकर्ते नवनाथ बापूराव महामुनी यांना युवा समाजभूषण पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार कोल्हापूरचे सुवर्णकार अविनाश पंडित यांच्या हस्ते इंदापूर सराफ असोसिएशनचे श्रीनिवास बानकर,श्रीगोंदयाचे माजी नगराध्यक्ष अनिलशेठ धर्माधिकारी आदींच्या प्रमुख उपस्थितीत पंढरपूर येथील सन्मान सुवर्णरत्नांचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळयामध्ये देण्यात आला.नवनाथ महामुनी हे सुवर्णकार समाजाच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये अग्रक्रमाने सहभागी होत असतात. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### शिरवळवाडी जि.प. शाळेत सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**वळसंग, दि. २ एप्रिल-**

अक्कलकोट येथील शिरवळवाडी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून म्हेत्रे कन्नड प्रशालेचे शिक्षक असलेले एन.एस.बिरादार उपस्थित होते. यावेळी इब्रामपूरचे कन्नड शाळेचे शिक्षक भीमा भजे, दयानंद वरनाळे, मुख्याध्यापक अशोक कोगनुरे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवराज हत्तरकी, शिक्षण तज्ञ मारुती कोटगे, शरणम्मा चलूवादी, प्रशांत हत्तरकी, मारुती हन्नुरे, अंगणवाडी सेविका लिंबाबई सुतार, वर्षा हन्नुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षकी शरणम्मा चलूवादी यांनी केले.

## निधन वृत्त...

### काशिनाथ शेटे



**अणदूर, दि. २ एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष काशिनाथ शंकर शेटे (७१) यांचे दिनांक १ एप्रिल रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना निधन झाले गावातील तंटे गावातच मिटावेत यासाठी त्यांनी मोठे कार्य केले. संपूर्ण गाव, बाजारपेठ बंद ठेऊन त्यांना ग्रामस्थानी श्रद्धांजली अर्पण केली. २ एप्रिल रोजी दुपारी अणदूर (ता. तुळजापूर) येथील नारंग बुडी मळा येथे त्यांच्या पार्थिवावर अंतीम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. अणदूर येथील माजी सरपंच शशिकला शेटे यांचे ते पती तर प्रगतशील शेतकरी नागनाथ शेटे, उद्योजक सोमनाथ शेटे यांचे वडील होत

### मुनिरअहमद शेख



**विजयपूर, दि. २ एप्रिल-**

दैनिक गुम्मटनगरी वृत्तपत्राचे संपादक इरफान शेख यांचे वडिल मुनिरअहमद मन्सूर अली शेख (वय ७१) यांचे निधन झाले आहे. त्यांचा पश्चात पत्नी, दोन मुले आणि दोन मुली असा परिवार आहे.

# शेतकरी, गरीब जनतेसाठी संघर्ष करणार

## माजी आमदार राम सातपुते; दहिगांव येथे भाजपाच्या शाखेचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २ एप्रिल-**

माळशिरस तालूक्यात एम आयडीसीची गरज असून आपल्या भागातील तरुण टेंभुर्णी, बारामती याठिकाणी कामासाठी जातात. त्यांना याच भागात काम मिळावे म्हणून एमआयडीसीचे स्वप्न पूर्ण तर करणारच त्याचप्रमाणे शेतकरी सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी सतत संघर्ष करणार आहे. या भागात कोट्यावधीची कामे सुरू असून भारतीय जनता पार्टी गोरगरीब जनतेसाठी सतत प्रयत्नशील आहे. तालुक्यात अनेकांचे आरोग्याचे ऑपरेशन मोफत केली आहेत. आगामी जि.प.पं.स. निवडणूकीत आपण सघर्ष करण्यासाठी तयार रहावे, अशी अपेक्षा भारतीय जनता पार्टीचे राष्टीय उपाध्यक्ष तथा माळशिरसचे माजी आमदार राम सातपूते यांनी दहिगांव येथील भारतीय जनता पार्टीच्या शाखा उद्घाटनाप्रसंगी व्यक्त केले. प्रास्ताविक सागर पाटील यांनी केले. यावेळी शरद मोरे, काकासाहेब जाधव, ॲड. बी. वाय. राऊत, बाजीराव काटकर, हणमंत सुळ यांनी मनोगत व्यक्त मांडले. यावेळी शरद मोरे, आप्पासाहेब देशमूख, बाजीराव काटकर, ॲड बी.वाय. राऊत, संजय देशमूख, शरद मदने, वंदना पाटील, राजेंद्र पांढरे, राहुल पद्मन, नवनाथ जाधव, सत्यशील पाटील, वैभव शहा, सूधीर काळे, शाखाध्यक्ष अमर किर्दक, उपाध्यक्ष धनंजय फुले, कार्याध्यक्ष किरण गोडसे, उपकार्याध्यक्ष हर्षवर्धन खंडागळे, खजिनदार मारुती गटकुळ, मार्गदर्शक सचिन काटकर, उपमार्गदर्शक विशाल फुले, संघटक महादेव नाकुरे, सहसंघटक रोहित जाधव, भा जपाचे अनु. जाती जमाती तालुकाध्यक्ष बाबूराव खिलारे, सहखजिनदार अनिल गुळीक, संस्थापक सागर पाटील, सचिव राजेंद्र पाटील उपस्थित होते.




## वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचा ६ एप्रिल रोजी रामनवमी उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ एप्रिल-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात व देवस्थान संचालित स्टेशन रोडवरील श्री राम मंदिर येथे सालाबादाप्रमाणे श्री रामनवमी जन्मोत्सव यंदाही रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त वटवृक्ष मंदिर व श्रीराम मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी दिली.



रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी रामनवमी असल्यामुळे दिनांक ४ एप्रिल वार शुक्रवार व दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ६ व दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हभपश्री योगीराज महाराज प्रकाश गोंदीकर - रा.श्रीक्षेत्र गोंदी, ता. अंबड, जि.जालना यांची कीर्तनसेवा देवस्थानच्या ज्योतिबा मंडपात होणार आहे. दि.६ एप्रिल रोजी स्टेशन रोडवरील श्री राम मंदिर येथे सकाळी ८ ते १० या वेळेत मराठवाड्यातील भजनी मंडळांची भजनसेवा व सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तनसेवा होणार आहे.

दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव पाळणा कार्यक्रम होऊन श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानकडून स्टेशन रोडवरील राम मंदिर येथे दुपारी १२ ते २ या वेळेत भोजन महाप्रसाद दिला जाणार आहे.

## जैन कॉन्फरन्सच्या महाराष्ट्र प्रांत संघटनेच्या सदस्यपदी कुंकुलोळ

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २ एप्रिल**



श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सच्या (नवी दिल्ली) महाराष्ट्र प्रांत संघटनेच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी येथील सामाजिक कार्यकर्ते अजित सुरेशचंद्र कुंकूलोळ यांची सन २०२५ ते २०२७ या कालावधीसाठी निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र श्री ऑल इंडिया श्र्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सचे (नवी दिल्ली) अध्यक्ष मोहनलाल लोढा व सचिव शांतीलाल दुगड यांनी दिले आहे. कुंकुलोळ यांनी जैन समाजासाठी आजअखेर केलेले कार्य व मागील सुमारे तीस वर्षाचा सामजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव याची दखल घेत कुंकुलोळ यांची जैन कॉन्फरन्सच्या राज्य कार्यकारिणी सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

# नातेपुते येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाला सुरुवात

### पत्रकाराच्या सन्मानाने जयंती उत्सवाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २ एप्रिल-**

नातेपुते तालुका माळशिरस येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती महोत्सवाला दिनांक १ एप्रिल पासून पत्रकारांचा सन्मान करून प्रारंभ करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते विशाल साळवे व सर्व ज्येष्ठ पदाधिकारी व पत्रकार यांचे हस्ते महामानवांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात बौद्धाचार्य समीर सोरटे व प्रकाश साळवे यांनी बुद्धवंदनेने केली. यावेळी दैनिक तरुण भारतचे पत्रकार विलास भोसले, प्रमोद शिंदे तसेच किशोर आबा पलंगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी पत्रकार बापू बाविस्कर,आनंद जाधव,सुनील ढोबळे,विलास भोसले, प्रमोद शिंदे, समीर सोरटे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मधुकर वनसाळे,आप्पासाहेब सोनवणे, पोपट साळवे,श्रावण सोरटे,नगरसेवक सुरेंद्र सोरटे, बादल सोरटे,अभिषेक साळवे,वैभव सोरटे तसेच जयंती समिती खजिनदार युवराज वाघमारे,सचिव अजित पवार,कार्याध्यक्ष विनोद रणदिवे, सतीश जमदाडे, रणजीत कसबे उपस्थित होते. हा कार्यक्रम विशाल सोरटे,सौरभ साळवे,यश काकडे,अमर सावंत,चंदन सोरटे ,अनिकेत सोरटे यांनी यशस्वी केला. सूत्रसंचालन बुद्धभूषण साळवे यांनी तर आभार संघर्ष सोरटे यांनी केले.



१ ते १४ एप्रिलपर्यंत जयंती महोत्सव कार्यक्रम चालणारा असून यादरम्यान पत्रकारांचा सन्मान, भीम गीतांचा कार्यक्रम, प्रश्नमंजुषा, संविधान ७५ वा अमृत महोत्सव, निरागस लोककला मंच भारुड, माझा करिअर कट्टा, रक्तदान शिबिर, भीमा तुझ्या जन्मामुळे, जल्लोष भीम गीतांचा, होम मिनिस्टर, महात्मा फुले जयंती अभिवादन सभा, कॅन्सर तपासणी शिबिर, भीम जल्लोष, भव्य मोटरसायकल रॅली, पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण, अभिवादन सभा आधी सामाजिक सांस्कृतिक असे रोज भरगच्च असे कार्यक्रम होणार आहेत. नातेपुते येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मिरवणूक दरवर्षी खूप मोठी निघत असून डॉल्बीमुक्त पारंपारिक वाद्य लावून शिस्तीत आणि नियोजनबद्ध शांततेत निघत असते.

## सरकारी कामात अडथळा; आरोपीला शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ एप्रिल-**

दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी टेंभुर्णी येथील कुईवाडी चौक येथे टेंभुर्णी पोलीस ठाणेकडील पोलीस नाईक राजेंद्र ठोंबरे, बाळराजे घाडगे, सिध्देश्वर कोडलिंगे असे ट्रॅफीक केसेस करीत असताना दुपारी १-२० वा.चे सुमारास अशोक लेनन कंपनीचे पीकअप वाहन क.एम.एच.४५/ए.एफ.३२२२ चा. चालक मोबाईल फोन कानाला लावुन बोलत वाहन चालवित असताना दिसला. त्याला पो.ना. ठोंबरे यांनी थांबण्याचा इशारा केला असता त्याने त्याचे वाहन न थांबवता पुढे पुढे आणू लागला म्हणुन ठोंबरे यांनी पोलीस कोडलिंगे यांना आवाज देवून मदतीसाठी बोलावले. त्या दोघांनी सदर वाहन चालकास रोडचे कडेला वाहन उभा करणेस सांगुन त्याने वाहन थांबविलेनंतर वाहन चालविण्याचा परवाना व गाडीचे कागदपत्रे मागितले असता चालकाने देण्यास नकार दिला व वाहनातुन मोठमोठ्या आवाजात ठोंबरे यांना तु आम्हाला का विचारतो? तुझे जिवावर आम्ही वाहन घेतो का तुम्हास कागदपत्रे दाखवायचे काय कारण आम्ही पंचवीस वर्षे झाले हेच करतो आम्हाला पोलिसांना कुठे कसे गाठायचे हे चांगले माहीत आहे, असे म्हणुन पोलिसांना आरेरावीचा भाषा करुन म्हणाला की, माझा टेम्पो इथेच सोडुन जातो. तुम्हाला न्यायचे तिकडे न्या असे मोठमोठ्याने बोलून पोलिसांना आर्वाच्य भाषेत शिवीगाळी करु लागला. पो.ना. ठोंबरे हे चलन पावती लिहीत असताना त्यांना धक्का मारुन, ढकलून देऊन सरकारी कामात अडथळा केला.



आरोपी शंकर मच्छिंद्र नवगिरे, रा. माळेगाव, ता. माढा याचे विरुद्ध पोलीस नाईक राजेंद्र ठोंबरे यांनी टेंभुर्णी पोलीस ठाणेस गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भोसले यांनी करुन आरोपीविरुद्ध सबळ पुरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

सरकार पक्षाच्यावतीने सदर गुन्हा शाबितीसाठी ४ साक्षीदार तपासण्यात आले. यातील फिर्यादी व साक्षीदार यांची साक्ष, तसेच तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान गोळा केलेले पुरावे सरकारी वकिल श्रीमती राजश्री कदम यांनी न्यायालयासमोर मांडले.

सरकारी पक्षाचा पुरावा याचा विचार करता जिल्हा न्यायाधीश श्री. एल.एस. चव्हाण यांनी आरोपी शंकर मच्छिंद्र नवगिरे, रा. माळेगाव, ता. माढा यांना कोर्टाने दोषी ठरवून भा.दं.वि. कलम ३५३ अन्वये ८ दिवसाचा कारवास व ५,०००/- रुपये दंड, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११०, ११७ अन्वये १२००/- रुपये दंड, मोटार वाहन कायदा कलम २५०,१७७ अन्वये ५००/- रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. सरकार पक्षातर्फे श्रीमती राजश्री कदम यांनी काम पाहिले. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार अमृत खेडकर यांनी साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करुन वेळोवेळी कोर्टात हजर ठेवले.सदर केसमध्ये श्री अजित पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा व श्री. दिपक पाटील, पोलीस निरीक्षक टेंभुर्णी यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

## जमीनीच्या प्रकरणावरून मारहाण; परस्पर विरोधी तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी,दि.२ एप्रिल-**

जमीन वारसा हक्काच्या सुनावणीची तहसील कार्यालयाकडून आलेल्या नोटीसीचा राग मनात धरून तलवार ,लोखंडी गज व कोयत्याने दोघांना मारहाण केल्याची घटना शिदवडकर वस्ती कुर्डू (ता.माढा) येथे घडली. याबाबत समाधान नागनाथ शिदवडकर रा.शिदवडकरवस्ती कुर्डू (ता.माढा) यांनी कुर्डुवाडी पोलिसांत दि.२८ रोजी दाखल केलेल्या फिर्यादीवरुन गोरख गोपीनाथ शिदवडकर, संतोष मच्छिंद्र शिदवडकर,राहुल मच्छिंद्र शिदवडकर,बालाजी हनुमंत शिदवडकर,अतुल हनुमंत शिदवडकर,श्रीकांत गोरख शिदवडकर सर्व रा. शिदवडकरवस्ती कुर्डू ता.माढा जि.सोलापुर या सहाजणांवर कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे शेजारी असून फिर्यादीच्या शेतजमीनी लगतच त्यांचीही शेती आहे. फिर्यादीचे आजोबा विश्वनाथ अभिमान शिदवडकर यांच्या निधनानंतर फिर्यादीने वारसा नोंदीसाठी तहसील कार्यालयात अर्ज केला होता. त्यानुसार तहसील कार्यालयाने वरील सहा जणांना सुनावणीसाठी उपस्थित राहाण्यासाठी नोटीस पाठवली होती. या नोटीसीचा राग मनात धरून गोरख गोपीनाथ शिदवडकर,संतोष मच्छिंद्र शिदवडकर,राहुल मच्छिंद्र शिदवडकर,बालाजी हनुमंत शिदवडकर,अतुल हनुमंत शिदवडकर,श्रीकांत गोरख शिदवडकर हे हातात लोखंडी गज, तलवार ,कोयता घेऊन आले व तू जमीन वारसाबाबत नोटीस का काढतो म्हणून राहुल शिदवडकर याने फिर्यादीचा भाऊ शंकर शिदवडकर यांच्या डोक्यात तलवारीने वार करुन गंभीर जखमी केले. तसेच इतर जणांनी फिर्यादी व त्याच्या भावाला लोखंडी गजाने मारहाण केली. यातील श्रीकांत शिदवडकर याने फिर्यादीला लाथाबुक्क्याने मारहाण केली व आमच्या नादाला लागाल तर सगळ्याला संपवून टाकीन अशी धमकी दिली.याबाबत गोरख गोपीनाथ शिदवडकर यांनी परस्पर विरोधी तक्रार दि. २९ रोजी दाखल केली असून दि.२४ रोजी फिर्यादी हे त्यांच्या घरासमोरील अंगण झाडत असताना आरोपी समाधान नागनाथ शिदवडकर व शंकर नागनाथ शिदवडकर यांनी फिर्यादीच्या घरासमोर ट्रॅक्टर आणून उभा केला.माझे रान आहे मी ट्रॅक्टर इथेच उभा करणार असे सांगितले. फिर्यादी येथे ट्रॅक्टर लावू नका असे म्हणत असताना त्याला ट्रॅक्टरचा धक्का लागला आणि तो खाली पडला. त्यावेळी आरोपी समाधान शिदवडकर याने फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन डाव्या हाताच्या अंगठ्याजवळ चावून जखमी केले. तर शंकर शिदवडकर हा हातामध्ये गज घेऊन आला व फिर्यादीला पाठीत गजाने मारून जखमी केले .लाथाबुक्क्याने मारहाण करत शिवीगाळ केली व तुला जिवे मारतो अशी धमकी दिली. फिर्यादी गोरख गोपीनाथ शिदवडकर यांच्या फिर्यादीवरुन समाधान नागनाथ शिदवडकर व शंकर नागनाथ शिदवडकर यांच्यावर कुर्डुवाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

# एनएमएमएस परीक्षेत सांगोला विद्यामंदिर जिल्ह्यात अव्वल

## १०८ विद्यार्थ्यांना मिळणार ४७ लाख ५२ हजारांची शिष्यवृत्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडून डिसेंबर-२०२४ मध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (छ्चचड) परीक्षेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे एकूण १०८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून यापैकी ६३ विद्यार्थ्यांना NMMS शिष्यवृत्ती तर ४५ विद्यार्थ्यांना छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. या विद्यार्थ्यांना पुढील चार शैक्षणिक वर्षांमध्ये एकूण रु.४७ लाख ५२ हजार शिष्यवृत्ती मिळणार आहे.

NMMS शिष्यवृत्तीमध्ये इयत्ता आठवी मधील इंगोले वैष्णवी, आलदर कुमार, रणदिवे तेजश्री, गोडसे प्राप्ती, लिगाडे गायत्री, इंगोले गौरी, सावंत शुभम, लाडे तृष्णा, मदने रामजी, खुळे समृद्धी, ढोले योगीराज, देवकते संस्कृती, चव्हाण समर्थ, पांढरे संग्राम, माने परिणिती, मदने गौरी, जानकर पायल, लेंडवे विराज, पाटील पृथ्वीराज, इंगोले रिंकल, काशिद श्रेयश, दौंडे दुर्वा, कुरुलकर प्रज्वल, पठाण तहा, लिगाडे श्रीराम, भोरे श्रुती, निकम सहर्ष, पाटील विश्वजित, पाटील तन्वी, जाधव शर्वरी, पाटोळे अरविंद, मुलाणी गुलामअहमद, पाटील सोहम, पवार सायली, जाधव अथर्व, पाटील अर्णव, देशमुख श्रेया, दिघे यश, साळुंखे राजेश, शेजवळ श्रुती, कोरे जयश्री, घोंगडे सर्वज्ञ, इमडे वैभव, गायकवाड हर्षवर्धन, हजारे श्रीजा, पाटील सोहम, बिचुकले आरती, भंडारे समृद्धी, करंडे संस्कार, पाटणे रुद्र, ढोले शिवश्रुती, घोंगडे सृष्टी, गवळी ओम, कांबळे सारा, महाजन अनुश्री, पाटील राजनंदिनी, इंगोले वैष्णवी, बनसोडे प्राची, वाघमारे सिया, मोरे आदर्श, खडतरे सोहम, साठे आरती, शिर्के जीविका या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.




आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी ही शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक व आर्थिक दोन्ही दृष्ट्या लाभदायक ठरत असून यावर्षी सांगोला विद्यामंदिर प्रशालेतील NMMS मधील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी संख्येने शतक पार केले असून सोलापूर जिल्ह्यातील शिष्यवृत्ती मिळवण्यात प्रथम क्रमांकाची परंपरा सांगोला विद्यामंदिर प्रशालेने कायम राखली आहे. यामागे विद्यार्थ्यांच्या सातत्याने झालेल्या सराव चाचण्या, शिक्षकांचे कष्ट, प्रशासनाचे नियोजन याचबरोबर अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांची प्रेरणा व सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके यांचे मार्गदर्शन प्रभावी ठरले आहे.

छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीमध्ये इयत्ता आठवी मधील साळुंखे सिद्धी, मिसाळ सुजल, पवार नामदेवराव, मिसाळ विश्वजीत, बाबर साक्षी, सोंडकर संस्कृती, घाडगे कार्तिकी, शिंदे श्रुती, गायकवाड प्राची, देशमुख तन्वी, शिंदे परमिता, औताडे श्रेया, जाधव श्रीनंद, भोसले विश्वजित, इंगोले पार्थ, गायकवाड प्रांजल, नागणे प्रांजली, जगदाळे कृष्णा, पवार वृषाली, गायकवाड समिक्षा, दिघे श्रावणी, दिघे साक्षी, खंडागळे क्रांती, गायकवाड ऋतिका, पवार ऋतुजा, गायकवाड हर्षवर्धन, निंबाळकर श्रावणी, नलवडे सृष्टी, पाटील स्वराली, देशमुख श्रेया, महांकाळ पार्थ, साळुंखे मानस, जाधव अधिराज, सुरवसे आर्या, नलवडे संस्कार, इंगळे रोहित, दिघे युवराज, दिघे सुजित, माने सानिका, पवार प्रज्ञा, गुंगे ऋतुजा, साळुंखे सार्थक, गुरव योगेश्वरी, जगदाळे प्रेरणा, देशमुख विशद हे विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख निलेश जंगम, मंगेश म्हमाणे, राजेंद्र ढोले, अमोल महिमकर, मनीषा पांडे, शितल कांबळे, सिताराम राऊत, रोहिणी शिंदे, कविता राठोड, विनीत चिकमने, शिवानंद लोखंडे, दिग्विजय चव्हाण, भारती गयाळी, सविता गायकवाड, अजित मोरे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थाअध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, मच्छिंद्र इंगोले, प्रदीप धुकटे, नामदेव खंडागळे, वैभव कोठावळे यांनी अभिनंदन केले.

# महत्त्वाचे...




## व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत संगीता घोंगडे, अनिता सूर्यवंशी द्वितीय

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

शालेय शिक्षण व विद्या प्राधिकरण पुणे यांच्यामार्फत आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत द्वितीय क्रमांक आल्याबद्दल होटगी रोड येथील चतुरबाई श्राविका विद्यालयाच्या संगीता घोंगडे आणि अनिता सूर्यवंशी यांचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत शिक्षिका घोंगडे यांनी तालुक्यातून इयत्ता तिसरी ते पाचवी गटातून इंग्रजी या विषयात द्वितीय तसेच सूर्यवंशी यांनी पहिली ते दुसरी या गटातून मराठी या विषयात द्वितीय क्रमांक पटकावला. त्यांचे चतुरबाई श्राविका विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रूपाली चेंडके व म हावीर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका उज्वला शेटे तसेच सर्व शिक्षक वृंदांनी कौतुक केले. हा बक्षीस वितरण समारंभ शिवछत्रपती रंगभवन येथे झाला. यावेळी डायटचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे, प्रशासन अधिकारी आदर्श, अधिव्याख्यात्या तुकाराम राजे, गट विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार, अधिव्याख्याता शशिकांत शिंदे उपस्थित होते.

## मारहाण करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

रिक्षाचे भाडे जास्त का घेतले म्हणून विचारणा करणाऱ्यास मारहाण करणाऱ्या तिघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत दि नासिर महमंदखान पठाण (वय ५०, रा. कुमारस्वामी सोसायटी, मित्र नगर, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन साजीद शेख, आजिम शेख, जुबेर मुल्ला (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ एप्रिल रोजी रात्री पावणे आकराच्यासुमारास नासिर पठाण हे साजीद शेख यास आमच्या नातेवाईकांकडून रिक्षाचे भाडे जास्त का घेतले असे विचारले असता साजीद शेख व त्याच्या साथीदारांनी पठाण यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करून हाताने व काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच पठाण यांच्या घरात घुसून घरातील सामानाची नासधुस केली. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.



## बार्शी शहरातील उदय लॉजवर पोलिसांचा छापा, दोघांवर कारवाई

**बार्शी, दि. एप्रिल**

सोलापूर पोलिसांच्या विशेष पथकाने शहराच्या मध्य वस्तीत असलेल्या उदय लॉज येथे छापा टाकून सहा महिलांची सुटका करुन लॉज मालक व व्यवस्थापक या दोघांवर अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बार्शी शहरातील पांडे चौक येथील दत्त बोळ येथील उदय लॉजमध्ये वेश्याव्यवसाय सुरु असल्याची गुप्त माहिती सोलापूर ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. १ एप्रिल रोजी सायंकाळी ६.२९ वाजता पोलिसांनी उदय लॉजवर धाड टाकली. या कारवाईत लॉजचा मालक आनंद रमेश माने (वय ४२, रा. लोकमान्य चाळ, बार्शी) आणि व्यवस्थापक सुनिल ऊर्फ तात्या काशीनाथ माने (वय ६०, रा. लोकमान्य चाळ, बार्शी) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**सोलापूर ग्रामीण पोलिसांची कामगिरी**

### सहा पीडित महिलांची केली सुटका

पोलिसांनी या सदर लॉजमधून सहा महिलांची सुटका केली. लॉज मालक चालक या महिलांना पैशाचे आमिष दाखवून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करायला लावण्यात येत होते. या प्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींवर भारतीय न्याय संहिता तसेच अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रणजित माने हे करत आहेत.

# श्री सिध्देश्वर महाराज शिवयोग समाधीस फळांची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ मार्च**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या शिवयोग समाधीस आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती. द्राक्षे अननस ऊस असे विविध फळ आणि सुवासिक फुलांची आरास समाधी परिसरात करण्यात आली होती. यामुळे सर्वत्र नवचैतन्याचे आणि प्रसन्नतेचे वातावरण पसरले होते. श्री सिद्धेश्वर महाराजांच्या समाधी वर्षा निमित्त मंदिर परिसरात सजावट आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती मंदिराचे पुजारी शिवशंकर हब्बू यांनी यावेळी दिली.

दरम्यान, सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या समाधी वर्षानिमित्त पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. पुरोहितांच्या मंत्रघोषात सम ाधीस रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर दुपारी बारा वाजता तांदूळ पूजा करण्यात आली. तदनंतर श्रींच्या मूळ मूर्तीस देखील रूद्रभिषेक आणि म हाआरती करण्यात आली. सायंकाळी मंदिर परिसरात दीपोत्सव संपन्न झाला.






### समाधी वर्षानिमित्त धार्मिक कार्यक्रम उत्साहात

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षी तिथीनुसार समाधी वर्षानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या समाधीस आकर्षक अशी फळांची सजावट करण्यात आली होती. त्यानंतर दुपारी बारा वाजता तांदूळ पूजा करून श्रींची महाआरती करण्यात आली. त्याच पद्धतीने मूळ मूर्तीस देखील रुद्राभिषेक व महाआरती करण्यात आली. पहाटे सामूहिक रुद्र पठण तसेच सकाळी भजनी मंडळाच्या वतीने भजन गायन कीर्तन करण्यात आले. संध्याकाळी दीपोत्सवाने परिसर उजळून निघाला. भाविकांनी पहाटेपासूनच श्रीधर दर्शनासाठी मंदिर परिसरात गर्दी केली होती.



**-शिवशंकर हब्बू, मंदिराचे पुजारी**

# पालकमंत्री गोरे स्थानिक लोकप्रतिनिधी अन् अधिकाऱ्यांशी आज साधणार संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ एप्रिल-**

राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे दिनांक २ व ३ एप्रिल रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. बुधवारी त्यांनी विविध कार्यक्रमांना हजेरी लावली होती. तर आज पालकमंत्री गोरे हे स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनातील महत्वाच्या अधिकाऱ्यांबरोबर संवाद साधणार असल्याची माहिती अधिकृत सुत्रांकडून मिळाली.



गुरूवार, ३ एप्रिल रोजी पालकमंत्री गोरे हे सकाळी ९ वा. शासकीय विश्रामगृहात सोलापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींशी विविध विषयांवर चर्चा नंतर स. १० वाजता आयुक्त सोलापूर मनपा, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक यांचेशी शासकीय विश्रामगृहावर जिल्ह्यातील विविध विषयांवर चर्चा करणार आहेत. तर सकाळी.१०.५० वा. शासकी विश्रामगृह येथून लिंगशेट्टी कार्यालयाकडे (बाळीवेस) ते जाणार आहेत. सकाळी ११ वा. लिंगशेट्टी कार्यालय येथे आगमन व भारतीय जनता पार्टी जिल्हास्तरीय कार्यकर्ता संवाद मेळाव्यास उपस्थिती लावणार आहेत. दुपारी १ वा. लिंगशेट्टी कार्यालय येथून माजी आ. दिलीप माने (होटगी रोड) यांच्या निवासस्थानाकडे प्रयाण व राखीव. दुपारी १.५० वा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण व ०२.०० वा. नियोजन भवन, जिल्हाधिकारी येथे आगमन व विविध विभागाकडील आढावा बैठकीस उपस्थिती. नंतर सायं. ५ वा. सोलापूर येथून पंढरपूर कडे प्रयाण. सायं. ६ पंढरपूर, वैष्णवनगर येथे आगमन व समस्त वारकरी मंडळ गोंदवले बु. ता. माण यांचे नियोजित वास्तूचे भूमिपुजन समारंभास उपस्थिती. सायं.६.३० वा. पंढरपूर येथून सांगोल्याकडे प्रयाण . सायं.७.०० वा. सांगोला येथे आगमन व दिपक साळुंके पाटील, माजी आमदार यांचे वढेगाव नाका येथील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट. सायं ७.१५ वा. राजयोग अर्बन को-ऑफ क्रेडीट सोसा.लि. सांगोला उद्घाटन सम ारंभास उपस्थिती. सायं. ७.३० वा. सांगोला तालुका यांचे वतीने जाहीर सत्कार सकारंभास उपस्थिती. रात्री ८.३० वा. चेतनसिंह केदार-सावंत भाजप जिल्हाध्यक्ष सोलापूर ग्रामिण यांच्या निवास स्थानाकडे प्रयाण.व सदिच्छा भेट व राखीव. रात्री ८.५५ वा. बाळासाहेब एरंडे यांचे निवासस्थानाकडे प्रयाण व भेट व राखीव. रात्री ९.३० वा. सांगोला येथून बोराटवाडीकडे (सातारा) प्रयाण करतील.

# युवा स्पंदन भारतीय संस्कृतीच्या वैभवाचे प्रतिबिंब

**विजय साळुंखे यांचे प्रतिपादन**

**युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सव २०२५ चे उद्घाटन**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सव हा केवळ एक उत्सव नाही, तर तरुणाईच्या ऊर्जेचा, सर्जनशीलतेचा आणि भारतीय संस्कृतीच्या वैभवाचे प्रतिबिंब आहे. असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे सोलापूर उपनगरिय शाखेचे अध्यक्ष विजय साळुंखे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे विद्यार्थी कल्याण विभागाच्या यतीने युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी विजय साळुंखे बोलत होते.

यावेळी व्यापसपीठावर कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, युवा स्पंदनचे समन्वयक डॉ. विकास कदू उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पन आणि दिप प्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सवात विद्यापीठातील ११ संकुलातील विविध अधिविभागातील २५० विद्यार्थ्यांनी १४ कला प्रकारात सहभाग नोंदवला आहे.

यावेळी बोलताना साळुंखे म्हणाले, तरुणांनी नाटके, एकांकीका पाहिल्या पाहिजेत. ज्यामुळेन नाटक चळवळ जिवंत राहील. मराठी नाट्य चळवळीला मोठी परंपरा आहे. याच्या माध्यमातुन अनेक कलाकार निर्माण झाले आहेत. सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी असते. अभ्यासाच्या धावपळीतून थोडा विसावा मिळतो आणि आपल्यातील सुप्त गुणांना वाव मिळतो. नृत्य, संगीत, नाटक, चित्रकला अशा विविध कलांच्या माध्यमातून तुम्ही स्वतःला व्यक्त करता आणि तुमच्या भावनांना वाट मोकळी करून देता. या महोत्सवातून विविधरंगी कलांचे दर्शन होते. असेही साळुंखे यांनी स्पष्ट केले.

यावेळी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर म्हणाले, या महोत्सवात केवळ नृत्य, गायन किंवा नाटकांसारख्या पारंपरिक कलांचाच समावेश नाही, तर समकालीन कला, साहित्य आणि तंत्रज्ञानाचाही सुंदर संगम आपल्याला पाहायला मिळत आहे. हे आपल्या विद्यार्थ्यांची दूरदृष्टी आणि बदलत्या जगाला स्वीकारण्याची तयारी दर्शवते. आजच्या धावपळीच्या जीवनात, आपल्याला आपल्या संस्कृतीपासून दूर जाण्याची शक्यता असते. पण अशा सांस्कृतिक महोत्सवांच्या माध्यमातून आपण आपल्या परंपरा आणि मूल्यांशी जोडले राहतो. या महोत्सवातून आपण एकता, बंधुभाव आणि सांघिकतेचे महत्त्व शिकतो, जे आपल्या भावी आयुष्यात खूप उपयोगी ठरेल. असेही कुलगुरु डॉ. महानवर यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. केंदारनाथ काळवणे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. ममता बोल्ली, प्रा. श्रुती देवळे यांनी केले तर आभार डॉ. विकास कदू यांनी मानले.

# पंढरीत लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर लैंगिक अत्याचार

**८ महिन्यांपासून प्रकार होता सुरु**

**माजी नगराध्यक्षाचा नातेवाईक असल्याचे सांगत दिली धमकी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ एप्रिल-**

पंढरपूर शहरात एक धक्कादायक घटना घडली असून एका २७ वर्षीय महिलेला लग्नाची आमिष दाखवून जबरदस्ती लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. याबाबत पंढरपूर शहर पोलिसात आरोपी प्रितेश अण्णा पवार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यामध्ये हकीकत अशीकी आरोपी प्रितेश अण्णा पवार हा माघील जानेवारी २०२४ पासून पीडित महिलेच्या पाठीमागे लागला होता. त्यानंतर पीडित महिला ज्वेलर्स दुकान मध्ये काम करत असताना कारण काढून बोलण्याचा प्रयत्न करत होता. घरी जाताना पाठीमागे लागत होता. पीडित महिलेला बोलण्याचा प्रयत्न करत होता तसेच एके दिवशी इंस्टाग्रामवर आरोपी प्रितेश अण्णा पवार याने पीडित महिलेला तू मला आवडतेस तू माझ्याशी लग्न कर, मी तुला व तुझ्या मुलाला सांभाळतो असे खोटे आश्वासन देऊ लागला. यावेळी पीडित महिलेने माझे माझ्या नवऱ्यासोबत वाद सुरू आहे.तू माझ्याशी बोलू नकोस,असे सांगितले असता आरोपी प्रितेश अण्णा पवार तू तुझ्या पतीकडून घटस्फोट घे,मी तुझा संभाळ करतो तेव्हापासून पीडित महिला आणि आरोपी प्रितेश आणा पवार यांच्यामध्ये प्रेमसंबंध होते पण आरोपी प्रितेश याने लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार केला आणि पीडित महिलाने लग्नाचे विचारना केली असता लग्नाचा विषय काढतात तुझ्या मुलाला व तुला खल्लास करून टाकेल अशी धमकी देऊन वारंवार अत्याचार केला तसेच वारंवार पैसे वरून मारहाण करत होता अशी तक्रार पीडित महिलेने दिल्यानंतर आरोपी प्रितेशवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र काही राजकीय आजी-माजी नगरसेवक यांच्या दबावामुळे आठ दिवसापासून पीडित महिलेला गुन्हा दाखल करण्यासाठी संघर्ष करावा लागला अखेर काल सोलापूर ऑफिस येथे अर्ज दाखल केल्यानंतर पंढरपूर शहर पोलीस स्टेशनला जाग आली. आरोपी प्रितेश याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सोलापुरात कार, दुचाकींच्या खरेदीत वाढ

**गेल्या आर्थिक वर्षात ७० हजार वाहनांची भर**

**रस्ते झाले आणखी अरूंद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल -**

गेल्या आर्थिक वर्षात सोलापुरात वाहनखरेदीमध्ये वाढ झाली असून, ७० हजार वाहनांची नव्याने भर पडली आहेत. त्यात दुचाकी व चारचाकींचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे. सोलापुरात पहिल्यांदाच एका आर्थिक वर्षात ७० हजार वाहनांची खरेदी झाली आहे. त्यामुळे मार्च २०२५ अखेर सोलापूर प्रादेशीक परिवहन कार्यालयांतर्गत १३ लाख ५ वाहनांची नोंद झाली आहे.

करोनापूर्वी प्रत्येक वर्षी वाहन खरेदीमध्ये वाढ होत होती. मात्र, २०२० मध्ये करोनाचा संसर्ग सुरू झाल्यानंतर वाहनखरेदीला ब्रेक लागला होता. २०२२ मध्ये करोनाचे सर्व निर्बंध उठल्यानंतर वाहनखरेदीने पुन्हा वेग पकडल्याचे दिसले आहे. सोलापुरात यंदा वाहनविक्रीने नवा उच्चांक निर्माण केला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७० हजार ३२८ वाहनांची विक्री झाली आहे. सोलापूर आरटीओकडे २०२३-२४ मध्ये १२ लाख २९ हजार ६७७ वाहनांची नोंदणी झाली होती. ती वाढून मार्च २०२५ अखेर १३ लाख ५ झाली आहे.

तसेच सन २०२४-२५ मध्ये वाहन नोंदणीचा आकडा ७० हजारांच्या पुढे गेला आहे. या वर्षी शहरात नागरिकांनी ५४ हजार ५०४ दुचाकींची खरेदी केली आहे, तर ७ हजार १९७ जणांनी कार खरेदी केली आहे. गेल्या वर्षात कार खरेदीमध्ये चांगलीच वाढ नोंदवण्यात आली आहे. दुचाकी खरेदीमध्ये मोठी वाढ झाली आहे. रिक्षा व कॅब खरेदीचा वेग कायम असल्याचे दिसून आले आहे.



**वाहनांच्या नोंदी अश्या**

| प्रकार | वाहनांची संख्या |
|---|---|
| सर्व प्रकारच्या दुचाकी | १०,३४,०५० |
| मोटार कार | ९२,१५२ |
| जीप | १५,८६१ |
| ॲटो रिक्षा | १८,६२१ |
| ट्रक | १९,१४७ |
| डिलीव्हरी व्हॅन (चारचाकी) | २६,५८८ |
| डिलीव्हरी व्हॅन (तीनचाकी) | १२,९८१ |
| ट्रॅक्टर | ५५,८७९ |
| ट्रेलर | १६,५५१ |
| रुग्णवाहिका | ६२६ |
| स्कूल बस | ७०६ |
| स्टेज कॅरिअर | ९२४ |

# शिवसेनेतर्फे मोफत आरोग्य तपासणी

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवसानिमि त्त शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांच्या पुढाकाराने शिवसेना भवन सात रस्ता येथे एसीएस हॉस्पीटल आणि सोलापूर सिटी हॉस्पीटलच्या सहकार्याने आरोग्य शिबिर आयोजित केले होते. गिरणी कामगारांच्या हक्काच्या घरांचा प्रश्न अंतिम टप्प्यात आला असून, तो लवकरच मार्गी लागेल तसेच गिरणी कामगारांच्या घराबरोबरच त्यांचे आरोग्यही उत्तम राहिले पाहिजे, अशा सुचना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या होत्या. त्यानुसार श्रीकांत शिंदे फाऊंडेशन व उपमुख्यमंत्री शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत सर्वरोग निदान आरोग्य शिबिर झाले. या शिबिरात हृदयरोग तपासणी, डोळे तपासणी, ईसीजी, रक्त तपासणी यासह सर्वरोग निदान शिबिर पार पडले. या आरोग्य तपासणी शिबिरास प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.सिद्धांत गांधी, डॉ अक्षय शिवशरण, चेतन नागराशी, स्वाती दिवेकर, रवी दिवटे, सागर फुलारी, सौरभ लामतुरे, नागेश गावडे, ईरय्या स्वामी, जयवंत शेळके, आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समर्थ माशाळ, सुमित मनसावले,नितीन गायकवाड,अक्षय पकाले, योगेश काळजे,रोहित बिलोरीवाले, रितेश जाधव,चेतन दिक्षित यांनी परिश्रम घेतले



### दर आठवड्याला आरोग्य शिबिर

आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे ही तितकेच महत्त्वाचे आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.श्रीकांत शिंदे उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख आरोग्य दूत मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना भवन सात रस्ता येथे प्रत्येक आठवड्याला सोलापूर शहरातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

**- मनिष काळजे, शिवसेना जिल्हाप्रमुख**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## औद्योगिक शाळेत पाऊणे दोन लाखांच्या साहित्याची चोरी

### ९५ दिवसांनंतर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

औद्योगिक शाळेतील सुमारे पाऊणे दोन लाख रुपयांचं साहित्य चोरी गेले. ही घटना २३ ते २६ डिसेंबर २०२४ दरम्यान घडली. या प्रकरणी मुख्याध्यापकांनी ९५ दिवसांनंतर फिर्याद दाखल केल्यावर सदर बझार पोलिसांकडं अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, सोलापुरातील मध्यवर्ती ठिकाणी नॉर्थकोट प्रशाला प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला तथा औद्योगिक शाळेच्या विविध विभागामधील १ लाख ७५ हजार ९९८ रुपये किंमतीचे साहित्य अज्ञात चोरट्यानं चोरून नेले. त्यात लेथ मशीन, कुलेंट पंप, व्हाईस स्वीवेल बेस, वेल्डींग ट्रान्सफॉर्मर, जी.डी. वेलर लेथ मशिन, टुल किट, वेल्डीग टॉर्च, सिटीलीन रेग्युलेटर, ऑक्सीजन रेग्युलेटर, गॅस वेल्डीग ब्लो पाईप, कटर, टॉर्च प्रेशर रेग्युलेटर टेकॉमिटर, स्लिप रिंग इंडक्शन इलेक्ट्रीक इस्त्री वायर बंडल या साहित्याचा समावेश आहे. हे सर्व साहित्य केवळ तीन दिवसांदरम्यान चोरीस गेले, मात्र मुख्याध्यापक अमर किशोर जाधव यांनी ९५ दिवसांनंतर फिर्याद दाखल केली. याप्रकरणी सदर बझार पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.न्या. संहिता कलम ३०५ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीस उपनिरीक्षक साखरे या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.




## संक्षिप्त वृत्त...

### जावयाने मित्रासह केली सासूला मारहाण; चिवरी येथील प्रकार

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

जावयाने अज्ञात कारणातून मित्रासह सासूला मारहाण केली. हा प्रकार तुळजापूर तालुक्यातील चिवरी या गावी ३० मार्च रोजी ९ वाजता घडला. लक्ष्मी दिलीप मेढापुरे (वय ४१, रा. चिवरी ता. तुळजापूर) असे मारहाण झालेल्या सासूचे नाव आहे. घटनेच्या दिवशी म्हणजे ३० मार्च रोजी लक्ष्मी या त्यांच्या घराजवळ होत्या. त्यावेळी लक्ष्मी यांचा जावई अजय मिसाळ हा त्याच्या दोन मित्रासह तेथे आला. त्यांनी अज्ञात कारणातून लक्ष्मी यांना काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने नळदुर्ग येथील सरकारी रुग्णालयात उपचार केला. त्यानंतर २ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता पती दिलीप मेंढापुरे यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### पूर्ववैमनस्यातून नई जिंदगीतील तरुणाला तेरामैल येथे मारहाण

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

तेरा मैल येथील हॉटेल वैष्णवी येथे पूर्व वैमनस्यातून नई जिंदगी येथील तरुणाला लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. हा प्रकार बुधवारी मध्यरात्री २ वाजता घडला. नदिम अल्लाबक्ष सय्यद (वय २३, रा. मौलाना आझाद चौक, नई जिंदगी, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. नदिम आणि आर्यन राठोड व हॉटेल वैष्णवीचा मॅनेजर यांच्या तक्रार झाली होती. तेव्हापासून आर्यन राठोड व मॅनेजर नदिमवर चिडून होते. बुधवारी रात्री दोन वाजता त्यांनी नदिमला पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून त्यांनी लाकूड तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने पहाटे तीन वाजता मित्र जुनेद ननवाले याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### अपघातात जखमी झालेल्या तरुणाचा उपचारापूर्वी मृत्यू

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

सोलापूर हैद्राबाद रस्त्यावरील एस एन बावी पेट्रोल पंपासमोरील रस्त्यावर ट्रक अपघातात जखमी झालेल्या तरुणाचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. हा प्रकार मंगळवारी रात्री ८ वाजता उघडकीस आला. परमेश्वर अर्जुन सुरवसे (वय ३४, रा. बोळेगाव ता. तुळजापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री आठच्या सुमारास परमेश्वर हा सोलापूर हैद्राबाद रस्त्यावर ट्रक अपघातात जखमी झाला. त्यात तो बेशुध्द पडल्याने त्यास तालुका पोलीस ठाण्यातील हवालदार लोखंडे यांनी रात्री १०.५० वाजता शासकीय रुगणालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कुर्डूवाडीत पूर्ववैमनस्यातून तरुणाला रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

माढा तालुक्यातील कुर्डूवाडी येथील रेल्वे स्टेशनमागील वाल्मिकी मंदिराजवळ पूर्ववैमनस्यातून तरुणाला लोखंडी रॉडने मारहाण केली. हा प्रकार मंगळवारी दुपारी १२.३० वाजता घडला. विजय मल्लिकार्जुन कांबळे (वय २८, रा. कुर्डूवाडी ता. माढा) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे. गणेश लोखंडे व इतर दोघांबरोबर विजय याची मंगळवारच्या घटनेपूर्वी तक्रार झाली होती. तेव्हापासून ते विजयवर चिडून होते. दरम्यान मंगळवारी दुपारी १२.३० वाजता विजय हा रेल्वे स्टेशनमागील वाल्मिकी मंदिराजवळ थांबला असता, गणेश लोखंडे व इतर दोघांनी त्यास लाथाबुक्यांनी तसेच लोखंडी रॉडने मारहाण केल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली आहे. कुर्डूवाडी येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून डॉक्टराच्या सल्ल्यानुसार सायंकाळी ६.५० वाजता आषिश पिसे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तींना हैदराबादहून मागणी; श्रीराम नवमीचे वेध

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांचा उत्सव अवघ्या पाच दिवसात येऊन ठेपला आहे. रविवार दि.६ एप्रिल रोजी संपूर्ण भारत वर्षामध्ये श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. सोलापूर शहरात देखील याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील श्रीराम जन्मोत्सव सार्वजनिक मंडळाच्या मूर्ती रंगकाम करण्यासाठी मूर्तिकारांकडे दाखल झाल्या आहेत. त्याअनुषंगाने शहरातील अनिल मंजुळे हे मूर्तिकार प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्तींवर रंगाचा हात फिरवताना दिसत आहेत.

दरम्यान, हिंदू बांधवांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असणारे प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव मोठा उत्साहात संपन्न होत आहे. त्या निमित्ताने उत्सव प्रिय शहर म्हणून ख्याती असलेल्या सोलापुरात श्रीराम नवमीचा अभूतपूर्व उत्साह दिसून येणार आहे. यंदाच्या वर्षी नव्याने श्रीराम मध्यवर्ती महामंडळाची निर्मिती करण्यात आली असून, याद्वारे प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव मोठ्या स्वरूपात साकारला जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शहरात विविध सार्वजनिक मंडळांच्या वतीने देखील तयारी करण्यात येत आहे. यापूर्वी साकारलेले प्रभू श्री रामचंद्रांची मूर्ती रंगकामासाठी मूर्तिकारकांकडे नेण्यात येत आहे. येथे मूर्तिकार मूर्तीवर रंगकामाचे हात फिरवत आहेत. दोन दिवसांमध्ये रंग काम करून मूर्ती तयार होत आहे. त्यानंतर सदरची मूर्ती मंडळांना सुपूर्द केली जात आहे. रविवार पेठ जोशी गल्ली येथे मूर्तिकार अनिल मंजुळे गेल्या अनेक वर्षांपासून प्रभू श्री राम चंद्र आणि संकट मोचन हनुमान यांच्या मूर्ती साकारत आहेत. त्याच पद्धतीने श्रीगणेशाच्या आकर्षक मूर्ती देखील गणेशोत्सव काळात साकारतात. आकर्षक अशा रंगसंगतीमध्ये या मूर्ती रंगवल्या असल्याने, प्रत्येकांना त्या आकर्षित करत आहेत. त्याच पद्धतीने यंदा हनुमान जयंतीनिमित्त देखील नवीन चार ते पाच श्री हनुमान यांच्या मूर्ती साकारल्या जात आहेत. नवनवीन मुद्रेतील संकटमोचन श्री हनुमंतांच्या मूर्ती सार्वजनिक हनुमान जन्मोत्सव मंडळांसाठी आकर्षक ठरत आहेत.



**सोलापूर : श्रीराम नवमी निमित्त धनुर्धारी प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्तीवर हात फिरवताना मूर्तिकार अनिल मंजुळे.**

#### शहरात श्रीराम नवमीचा उत्साह

गेल्या काही वर्षांपासून श्रीराम नवमी निमित्त मिरवणूक काढण्याची गरज निर्माण झाली आहे. आयोध्या मधील श्री रामचंद्रांचे मंदिर स्थापित झाल्यानंतर देशात त्याच पद्धतीने सोलापूर शहरात देखील प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. गतवर्षी देखील श्रीराम नवमी निमित्त आकर्षक मिरवणूक काढण्यात आली होती. यंदाच्या वर्षी देखील नव्याने मध्यवर्ती स्थापन करून हा उत्सव मोठ्या स्वरूपात साजरा करण्याचे ठरवण्यात आले आहे. त्या अनुषंगाने शहरांमध्ये श्रीराम नवमीचा उत्साह दिसून येत आहे.

#### श्रीराम नवमीनिमित्त प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्ती रंगकामासाठी दाखल

गेल्या काही वर्षांपासून श्रीराम नवमीचा शहरात उत्साह आहे. मोठमोठ्या स्वरूपात मिरवणुका काढण्यात येत आहेत. त्यामुळे विविध सार्वजनिक मंडळाकडून प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीची मागणी वाढत आहे. गतवर्षी काही मूर्ती साकारण्यात आल्या होत्या. यंदा त्या मूर्तींना रंग देण्याचे काम करण्यात येत आहे. मूर्तीवर रंगकामाचा हात फिरवण्यात येत आहे. एक मूर्ती रंगवण्यासाठी दोन दिवसांचा कालावधी लागत असून, यासाठी सुमारे चार ते पाच हजार रुपये आकारले जातात. त्याच पद्धतीने हनुमान जयंतीसाठी देखील नवीन श्री हनुमंतांच्या मूर्ती साकारल्या जात आहेत. त्यासाठी सुमारे दहा ते पंचवीस रुपये पर्यंत दर आकारले जातात. हैदराबाद येथून मूर्तींसाठी विशेष मागणी असते.

— **अनिल मंजुळे, मूर्तिकार**




**महिलेला काटेरी चमच्याने मारून केले जखमी**

## महिला पोलिस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ एप्रिल -**

महिलेला काटेरी चमच्याने मारून जखमी केल्याप्रकरणी सोलापूर शहर पोलिस मुख्यालयातील श्रेणी महिला पोलिस उपनिरीक्षकावर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रेखा विजयकुमार काळे (वय ४४, रा. पारधी वस्ती, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरून जयदेवी मोहन काळे (रा. केशव नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ मार्च रोजी सायंकाळी पावणे सातच्या सुमारास केशव नगर रोडवर रेखा काळे या आल्या होत्या. त्यावेळी जयदेवी काळे यांनी रेखा काळे यांस तु केशव नगर मध्ये का आलीस असे म्हणून शिवीगाळ करून हातातील मॅगी खायच्या काटेरी चमच्याने रेखा काळे यांच्या डाव्या हातावर मारून जखमी केले. तसेच पायावर व डोक्यावर लाकडाने मारहाण केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक काटे पुढील तपास करीत आहेत.

## शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात पावसाचा शिडकावा

### उकाड्याची तीव्रता कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

फेब्रुवारी पूर्ण महिन्यात कडक उन्हामुळे म्हणजेच वाढत्या तापमानामुळे अंगाची लाहीलाही होत असलेल्या सोलापूर शहर-जिल्हा आणि मराठवाड्याच्या काही भागात मंगळवारी सायंकाळी अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला. पण अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे मात्र नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, गेल्या आठवड्यापासूनही आभाळी वातावरण असले तरी ४० अंशाच्या पुढेच सोलापूरचा तापमानाचा पारा असल्याने उकाड्याची तीव्रता मात्र कायम आहे. सोलापूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूरच्या काही भागात मंगळवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली. सातारा जिल्ह्यातील कराडला तर विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने दोन तास झोडपून काढल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी तर गारांचाही वर्षाव झाला. वादळी वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडली होती. वीजपुरवठा खंडित झाल्याने काही गावे अंधारात होती. बुधवारी व गुरुवारीही हवामानातील बदल कायम राहणार असल्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत गारपिटीसह पाऊस होणार असल्याचे पुणे हवामान खात्याने अंदाज वर्तविला आहे. यामुळे शेतकऱ्यांनी पिके सुरक्षित ठिकाणी ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.



**सोलापूर : सोलापूरकरानी बुधवारी सायंकाळी पावसाळी वातावरणात धर्मवीर सभांजी महाराज तलावात बोटींग करण्याचा आनंद लुटला. यावेळी टिपलेले हे छायाचित्र. (छायाचित्र केवल तिवारी)**

#### उशिराने पेरलेली पिके धोक्यात

रब्बी हंगामात उशिराने पेरणी केलेला गहू सध्या काढणीला आलेला आहे. याचबरोबर हरभरा, मका, ज्वारी व आंब्याचेही नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे ही पिके काढून पडली असली तरी शेतकऱ्यांनी आभाळी वातावरणाचा अंदाज घेवून ती पिके सुरक्षित स्थळी किंवा एका ठिकाणी गोळा करून झाकून ठेवावीत, असेही आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## उन्हाळी हंगाम; प्रवासी वाढल्याने एसटीची कसरत

- **लांब पल्ल्याच्या नियोजनाने स्थानिक बस नियोजनाचा बोजवारा उडणार?**
- **सोलापूर विभागाकडून ६२ बसेसमधून जादा वाहतूक; १५ एप्रिलपासून वाढीव बसेस**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य घेऊन राज्यमार्ग परिवहन महामंडळ (एस.टी.) कडून दरवर्षी उन्हाळ्यामध्ये जादा बस वाहतुकीचे नियोजन केले जाते. यावर्षीही १५ एप्रिलपासून राज्यातील विविध भागांत बस धावणार आहेत. एकीकडे बसची अपुरी संख्या असताना दुसरीकडे मात्र लांब पल्ल्याच्या बसेस पाठविण्याचे नियोजन केले जात आहे. त्यामुळे स्थानिक बस फेऱ्यांचा खोळंबा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीच अनेक बसेस स्क्रॅप केल्याने बसेसची संख्या कमी आणि प्रवासी जास्त अशा अवस्थेत स्थानिक परिवहन सेवेचा बोजवारा उडणार का? असा प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे

दरम्यान, सोलापूर विभागाकडून यंदा ६२ बसेसमधून वाहतुकीचे नियोजन आहे.महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून समाजातील विविध घटकांसाठी प्रवासात सवलती दिल्या जात आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस प्रवाशांची संख्या वाढत आहे. त्यातच महिला प्रवाशांच्या संख्येत भर पडत आहे. दुसरीकडे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ व्हावी, याकरिता जादा बस वाहतुकीचे नियोजन केले जात आहे. मात्र, हे नियोजन करीत असताना इतर बसफेऱ्यांवर परिणाम होणार नाही, याचाही विचार करणे आवश्यक झाले आहे.

सोलापूर विभागात सोलापूरसह आठ आगारांचा समावेश होतो. या सर्व आगारांतून ६५० पेक्षा अधिक बस राज्यातील कानाकोपऱ्यात धावतात. मात्र, यातील अनेक बस नादुरुस्त होत असल्याने अनेकदा बस फेऱ्यावर परिणाम होतो. दिवसभरात पाच ते १० बस दुरुस्तीच्या कारणाने आगारात दाखल होतात. त्यातच उन्हाळ्यात बस नादुरुस्तीचे प्रमाणही अधिक होते. परिणामी, बस फेऱ्या रद्द झाल्यामुळे प्रवाशांना ताटकळत इतर बसची वाट पाहावी लागते. मागील अनेक वर्षांपासून एसटी महामंडळाच्या ताफ्यात अपेक्षित बस दाखल झाल्या नाहीत. त्याच बसवर जिल्ह्यातील एसटीचा डोलारा सुरू आहे. यंदा महामंडळाकडून १५ एप्रिल ते १५ जूनपर्यंत जादा बसचे नियोजन केले आहे.

या बस पुणे, कोल्हापूर, धाराशिव, स्वारगेट यासह अन्य मार्गावर धावणार आहेत. या सर्व बस लांब पल्ल्याच्या राहणार आहेत. दुसरीकडे मात्र स्थानिक गावांना वेळेवर बस उपलब्ध होत नसल्याची ओरड होताना दिसत आहे. अनेक भागात बस फेऱ्यांची संख्या घटल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात बसची मागणी असूनही पुरवठा होत नसल्याने अनेक गावांना आजही बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे उत्पन्न वाढीबरोबरच स्थानिक प्रवाशांचा खोळंबा होणार नाही, याकडे देखील प्रशासनाने पाहणे आवश्यक बनले आहे.



#### ग्रामीण भागातील फेऱ्यांचे नियोजन आवश्यक

जिल्ह्यातील अनेक गावातून बस फेऱ्या सुरू करण्याची मागणी आहे. मात्र, अद्यापही अपुरी बस संख्या, नादुरूस्तीचे प्रमाण पाहाता ग्रामीण भागातील बसच्या अनेक फेऱ्या रद्द करण्याची वेळ येते. त्यामुळे लांब पल्लयांच्या बसचे नियोजन करताना स्थानिक फेऱ्यांवर परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

#### एसटीची अवस्था दयनीय

जिल्ह्यातील सोलापूरसह, आठ आगारातून ६५० पेक्षा अधिक बस धावतात. अनेकदा लांब पल्लयांच्या बस सुस्थितीत दिसून येतात. मात्र, ग्रामीण भागात धावणाऱ्या लालपरीची अवस्था बिकट झाली आहे. एसटीच्या टपावर तसेच विविध ठिकाणी पॅच लावलेले दिसून येतात. उखडलेले सीट, तुटलेल्या खिडक्या, खडखड आवाजात प्रवाशांना प्रवास करावा लागतो.

## झाडाच्या फांदीला गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २ एप्रिल -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील दिंडुर गावाच्या शिवारातील शेतातील झाडाच्या फांदीला दोरीने गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केली. हा प्रकार बुधवार दुपारी १२ च्या सुमारास उघडकीस आला.

अंकित भिमाशंकर बळगानुरे (वय २७, रा. दिंडुर ता. द.) असे तरुण बळगानुरे यांचे शेत आहे. त्याचा गट नंबर २०५ असा आहे. त्यांच्या शेतात चिंचेचे झाड आहे. बुधवारी दुपारी बाराच्या सुमारास अंकित हा त्या झाडाच्या फांदीला दोरीने गळफास घेतल्याच्या अवस्थेत दिसून आला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्याची गळफासातून सोडवून केली. बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

## वृध्दाने केला आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : माळशिरस तालुक्यातील अकलूज परिसरातील सवतगाव येथे ७० वर्षाच्या वृध्दाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार मंगळवारी दुपारी ५ वाजता उघडकीस आला. महादेव भिमराव मोरे (वय ७०, रा. सवतगाव ता. माळशिरस) असे आत्महत्येचा प्रयत्न करणा-या वृध्दाचे नाव आहे. महादेव हे सवतगाव शिवारातील त्यांच्या घरी असताना, अज्ञात कारणातून त्यांनी रोगर नावाचे विषारी औषध प्राशन केले. त्यात त्रास होऊ लागल्याने अकलूज येथील सरकारी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यानंतर पत्नी पार्वती यांनी बुधवारी दुपारी २.२० वाजता रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## ४५ हजारांची तांब्याची तार चोरीस

**सोलापूर** : होटगी रोडवरील इंडस्ट्रियल इस्टेटमधील स्टार ट्रेडिंग ॲन्ड फॅब्रिकेशन वर्क्स या कारखान्यातून चोरट्याने ४५ हजार रुपये किंमतीची तांब्याची तार चोरून नेली.

याबाबत रफिक लियाकत शेख (वय ५३, रा. आसरा कॉलनी, होटगी रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ मार्च ते ७ मार्च या कालावधीत रफिक शेख यांच्या स्टार ट्रेडिंग वर्क्स या कारखान्याच्या गोडावूनचे दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने ४५ हजार रुपये किंमतीचे ६० किलो वजनाचे तांब्याचे जळालेले तार चोरून नेले. हवालदार हार पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## ज्ञानामृत आनंदलहरी १०७५

**ऐसें पुण्य केलें एका पुंडलिकेंची ।**
**निरसिली जनाची भ्रमभुली ।।**

अनेक धर्मग्रंथातून, संताच्या वचनातून अनेक भक्तांना त्यांच्या भक्तीचे फलित म्हणून भगवंत भेटल्याचे वाचायला, ऐकायला मिळते. पण मोठ्या संख्येने असलेल्या अज्ञानी, अहंकारी लोकांचा मीपणाचा, नाशवंत वस्तूच्या मागे लागण्याचा, त्याची जमवा- जमव करण्याचा भ्रम जाऊन आपण कोण आहोत याचा खरा परिचय व्हावा, यासाठी भगवंताला प्रसन्न करून घेणारा पुंडलिकासारखा भक्त निराळाच होय. म्हणूनच की काय मुक्ताई म्हणते,

**ऐसें पुण्य केलें एका पुंडलिकेंची ।**
**निरसिली जनाची भ्रमभुली ।।**

मुक्ताईच्या म्हणण्याप्रमाणे आपण जर ऐसें पुण्य केलें, या वचनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर आपल्या लक्षात येते की, भक्त पुंडलिकांने इतरांपेक्षा निश्चितच वेगळी भक्ती केली आहे. ही भक्ती केवळ नामस्मरणाची नाही तर आई-वडिलांच्या सेवेची आहे. वृद्ध मातापित्यांच्या सेवेत पुंडलिकाला स्वतःच्या देहाचाही विसर पडला होता. जिथे देहाचाच विसर पडला होता तिथे संसाराचा, मीपणाचा, नाशवंत वस्तूत अडकण्याचा प्रश्नच नव्हता. सेवा आणि भक्ती ही आई वडिलांची आणि प्रसन्नता कृपा मात्र भगवंताची, असे हे वेगळेच गणित पुंडलिकाच्या बाबतीत घडले आहे. ईश्वराच्या अस्तित्वाचे खरे स्थान आई-वडील आहेत. आई वडिलांची सेवा करणा-याला भगवंत भक्तीसाठी वेगळ्याने काही करावे लागत नाही. आई-वडिलांच्या सेवेचा, भक्तीचा अधिकार हा स्वतःबरोबर इतरांचा उद्धार करण्याइतपत मोठा असतो, हे पुंडलिकाच्या



भक्तीवरून दिसून येते. पुंडलिकासाठी पंढरीत आलेला पांडुरंग मुक्ताईच्या म्हणण्याप्रमाणे जनसामान्यांचा सांसारिक भ्रम घालवतो. खरे म्हणजे वेगवेगळ्या भ्रमात अडकल्यानेच दुःखाला तोंड द्यावे लागते. इतर प्राण्यांच्या तुलनेत बुद्धिमान असलेल्या माणसाला एके दिवशी इथले इथेच टाकून जावे लागणार आहे, हे लक्षात येत नाही. हे खरेच अवघड आहे. ही अवघडता ज्या भ्रमाने, अहंकाराने, अज्ञानाने निर्माण होते. ते सर्व दोष या पंढरी क्षेत्री आल्यावर निघून जातात. या मुक्ताईच्या वचनांना, एक प्रकारे संत नामदेवांनी दुजोरा देतांना, चंद्रभागेसीं करिता स्नान । तुझे दोष पळती रानोरान ।। लोटांगण घालून महाद्वारी । कान धरोनि नाच गरूडापरी ।।, असे म्हटले आहे. संत नामदेवांचे, मुक्ताईचे म्हणणे खरे आहे. संसारात अडकलेला माणूस जर दृढ भावाने पंढरी क्षेत्री आला, वारक-यांत राहिला, त्यांचे वागणे, त्यांचा भाव, त्यांच्या गरजा, इच्छा, अपेक्षा पाहिल्या तर निश्चितच तो भ्रममुक्त होऊन खऱ्या अर्थाने आनंदी होतो. संसारात मी-मी म्हणणा-या आणि दिंडीत प्रथमच आलेल्या अनेक लोकांना आम्ही दिंडीमध्ये आनदाने झाड लोट करताना, पत्रावळ्या उचलतांना, इतरांची सेवा करतांना पाहिले आहे.

**जय जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, छत्रपती शिवाजी महाराज पुण्यदिन, महाकाली यात्रा |
| दि. ३ एप्रिल २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - चैत्र | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. षष्ठी (२१.४१) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - रोहिणी (०८.०१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - सौभाग्य (२४.००) | |
| करण - कौलव (१०.४०) | |

### राशीभविष्य

**मेष :** बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संपर्क ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील. आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मीन :** रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल.

# पाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांनी उभारली सोन्याची गुढी

## सोने नव्वद हजार पार तरीही ग्राहकांचा मिळतोय प्रतिसाद

### सोने खरेदीची झाली कोटींची उड्डाणे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ एप्रिल-**

साडेतीन शुभ मुहूर्तावर सोन्याची खरेदी करण्याची सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये चालत आलेली परंपरा आजतागायतपणे सुरू आहे. एकीकडे सोन्याचे दर दिवसेंदिवस वाढत असताना, दुसरीकडे मात्र सोन्याची खरेदी ग्राहकांनी सुरूच ठेवली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्यांची मागणी वाढली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात रुपयाचे झालेले अवमूल्यन, भारताच्या खरेदीवर लावलेले कर, जगातील युध्दाचे परिणाम भारतातील सोन्याच्या बाजारपेठेवर झाले आहेत. गेल्या आठवड्यापासून दरवाढ कायम आहे. गेल्या आठवड्यात ८५ हजार प्रति तोळा असलेले सोने मंगळवारी बाजार उघडताच नव्वदी पार केले आहे.

मोठ्या प्रमाणात दरवाढ होऊनदेखील सोने खरेदीकडे ग्राहकांचा कल दिसून येत. आहे. सोन्याच्या आंतरराष्ट्रीय बाजारात डॉलरने व्यवहार केले जातात. मात्र, त्यात भारतीय रुपयांची किंमत घसरली आहे. त्यामुळे देशात सोन्याने मोठी उसळी घेतली आहे. गेल्या आठवड्यात ८५ हजार प्रति तोळा सोन्याचा भाव होता, त्यानंतर गुढी पाडव्याच्या दिवशी.८९ हजार ४० रुपये प्रतितोळा भाव झाला आहे. सोमवारी रमजान ईदची सुट्टी असतानादेखील सोन्याने नव्वदी पार केली आहे. तरीदेखील बाजारपेठेमध्ये या दरवाढीचा कोणताच परिणाम दिसून आला नाही. बुधवारी देखील सोन्याने नव्वद हजाराचा आकडा पार केला आहे.

> **मोठ्या प्रमाणात सोन्यामध्ये उलाढाल**
>
> सध्या लग्नसराईचा हंगाम चालू आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सोने खरेदी होताना दिसून येत आहे. सोन्यामध्ये सुरक्षित गुंतवणूक मानली जाते. त्यामुळे सणाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात भाववाढ होऊन खरेदी झाली आहे. भाववाढीचा परिणाम बाजारपेठांमध्ये दिसला नाही, मात्र यंदा सणात ग्राहकांनी घट्ट सोने खरेदी करण्यापेक्षा तयार दागिने खरेदी करण्याकडे कल दाखवल्याचे चित्र दिसले. सोलापूर सराफ बाजारात सुमारे दोन ते तीन कोटहून अधिकची उलाढाल झाल्याचे चित्र दिसून येत आहे.
>
> **- गिरीष देवरमनी, अध्यक्ष सोलापूर सराफ व्यापारी असोसिएशन**

> **शुभ मुहूर्तावर ग्राहकांकडून सोन्याची खरेदी**
>
> सोन्याची दरवाढ कायम आहे. दरवाढीचा कोणताही परिणाम व्यापाऱ्यांवर झाला नाही. गुढी पाडव्यादिवशी सोलापूरच्या सराफ बाजारात चांगली उलाढाल झाली. ही दरवाढ कायम राहणार आहे. त्यामुळे लाखांच्या पुढे जाण्याअगोदर ग्राहकांनी सोन्यामध्ये गुंतवणूक करावी.
>
> **- हरिष करजगीकर, सराफ व्यापारी**

# पशुगणनेला १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

### पाच एप्रिलपर्यंत उद्दीष्ट पूर्ण होणार

### जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

जिल्ह्यातील पशुगणनेला १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे. सध्या एप्रिल महिन्याच्या सुरूवातीस दीड टक्के पशु गणनेचे काम अपूर्ण आहे. तर ९८. ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ मिळाले असले तरी ५ एप्रिलपर्यंत १.४० टक्के पशुगणनेचे काम पूर्ण होणार असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यात ११३६ गावे, २९७ वार्ड अशा १४३३ ठिकाणी पशुगणनेच्या कामास सुरुवात झाली होती. आत्तापर्यंत गणनेचे ९८.६० टक्के काम पूर्ण झाले असून फक्त १७ गावांमधील १.४० टक्के पशुगणना करायचे राहिले आहे. येत्या दोन ते तीन दिवसात ही गणना पूर्ण होण्याची शक्यता आहे. यातील बहुतांश गावांमधील गणनेचे काम पूर्ण झाले असून फक्त पर्यवेक्षकांचा अहवाल आल्यास राहिलेले गावे पूर्ण होतील. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत दर पाच वर्षांनी राज्यातील पशुधनाची गणना करण्यात येते. पशुगणनेमध्ये १६ प्रजातीच्या पशुधन व कुक्कुटादी पक्षी जाती, लिंग व वय निहाय गणना करण्यात येत आहे. प्रशुगणना २५ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत पूर्ण करण्याच्या केंद्र शासनाच्या सूचना होत्या. मात्र, पशु विभागाकडून मार्च अखेरपर्यंत पशुगणना पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आले होते . मात्र तांत्रिक अडचणी व अहवाल सादरीकरणास विलंब झाल्याने पशुगणना अपूर्ण राहीले आहे. आचारसंहितेमुळे गणनेचे काम सुरू होण्यास एक महिना उशीर लागला. त्यामुळे एक महिना अधिक मुदतवाढ मिळाली होती. आता देशात अनेक जिल्ह्यात काम पूर्ण न झाल्याने १५ एप्रिल २०२५ पर्यंत पुन्हा मुदतवाढ मिळाली आहे. उर्वरीत १.४० टक्के काम प्रगतीपथावर असून ५ एप्रिलपर्यंत पशुगणना पूर्ण होणार आहे.

# उद्धव नगरमध्ये श्री स्वामी समर्थ प्रकटदिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

शहरातील उद्धव नगर भाग दोन परिसरात प्रभाकर वाघमारे यांच्या निवासस्थानी श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी सकाळी ७ ते ८ दरम्यान लघुरुद्राभिषेक करण्यात आले. हिपळे व दिंडूर गावातील या दोन्ही भजनी मंडळानी जुगलबंदीत श्री स्वामी समर्थ यांची गाणी गायली या भजनाचे सूत्रसंचालन मीनाक्षी कोरे, पूजा डिगे व वैष्णवी वाघमारे यांनी केले. दुपारी १२ वाजता महाआरती व महाप्रसादाचे आयोजन केले होते.

प्रकटदिनाच्या या कार्यक्रमास कार्यक्रमास सुरेश हसापुरे, महादेव कोगणूरे, प्रशांत क्षीरसागर, आशुतोष तोंडसे, नागसेन शिवशरण, पद्माकर डिगे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी श्रीशैल कोरे, सुमित डिगे, नामदेव कोरे, तुकाराम कोरे, नागेश कोरे, महादेव काळे, चंद्रकांत कोरे, लक्ष्मण कोरे, पुंडलिक कोरे यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन प्रभाकर व महानंदा वाघमारे यांनी केले आहे. या कार्यक्रमास उद्धव नगर परिसरातील स्वामीभक्तानी श्रीचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. श्री स्वामी समर्थ प्रकटदिनाच्या कार्यक्रमास स्वामीभक्त उपस्थित होते.



# श्रीराम संस्थेतर्फे परीक्षेचे साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

श्रीराम सामाजिक संस्थेच्यावतीने माजी महापौर स्व. महेश कोठे यांच्या ६१ व्या जयंती निमित्त कुरुहिनशेट्टी शैक्षणिक संकुल, माधवनगर येथील बंडा प्रशालेत परीक्षेचे साहित्य वाटप करण्यात आले. या शाळेतील गरीब, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना परीक्षेचे साहित्य वाटप देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन प्रभाकर गोरंटी होते तर माजी महापौर श्रीकांचना यन्नम या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम संस्थेचे अध्यक्ष विजय महिंद्रकर, संस्थापक प्रभाकर राजुल, विनायक नल्ला, गोविंद राजूल, विनायक कुणगिरी, आकाश पंतगणी, अप्पू वाघमारे व सचिन माळी यांनी केले. यावेळी शैक्षणिक संस्थेचे संचालक काकी, गडगी, यशवंत पाथरुट, कुलकर्णी, आळगीकर, मेडीदार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बडूरे, बिराजदार धुळम, कामूर्ती तसेच प्रशालेतील अन्य शिक्षक, शिक्षिका यांचे सहकार्य लाभले.



# जुनी पोलीस लाईन गृहनिर्माण संस्थेची निवडणूक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

मुरारजी पेठ भागातील जुनी पोलीस लाईन भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. संस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी १४ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

परंतु या सर्व जागा बिनविरोध करून सभासदांनी एक आदर्श घालून दिला आहे. यामध्ये अरुण देशमुख वसंत येळे, वसंत ढेरे, मधुकर व्यवहारे, संजय घाडगे, अनिकेत व्यवहारे, दत्ता भोसले, प्रकाश सुरवसे, प्रभाकर व्यवहारे, नामदेव पवार, विकास घाडगे, दत्तात्रय सुरवसे यांची पुरुष सर्वसाधारण गटातून बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच नागरबाई ढोबळे व लक्ष्मीबाई पावडे यांची महिला राखीव गटातून निवड केली गेली. या सर्व नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डी पी सुरवसे यांनी काम पाहिले. आता यातून चेअरमन आणि सेक्रेटरी पदाची निवड केली जाणार आहे. ही पदे कोणाला मिळतात याकडे आता सभासदांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान यापूर्वी संस्थेवर सलग दोन वर्ष प्रशासन होते. प्राधिकृत अधिकारी शरद नागणे व सहाय्यक नागनाथ देवसानी यांच्याकडे संस्थेचा कारभार होता. त्यामुळे ही निवडणूक झाल्याने आता नव्या संचालकावर संस्थेचा कारभार पाहण्याची जबाबदारी आली असून त्यांनी चांगल्या पद्धतीने कामकाज करावे अशी अपेक्षा सभासदांकडून व्यक्त केली जात आहे.

# शशिकांत धोत्रेंचा सजना चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

रोमँटिक चित्रपट सजना आपल्या भेटीला लवकरच येणार आहे.शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित सजना सिनेमा प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी येत आहे. शशिकांत धोत्रे हे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील शिरापूर गावचे असून,त्यांचा सजना हा पहिलाच मराठी रोमांटिक चित्रपट २३ मे २०२५ ला चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.




सजना सिनेमाच्या पोस्टरवर एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेले दोन प्रेमी आपण पाहू शकतो जे पाण्यात रोमँटिक पोज मधे आहेत. धोत्रेंच्या चित्रांसारखंच हे पोस्टरसुद्धा एक सुंदर पेंटिंगच आहे. जे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार शशिकांत धोत्रे यांचे जिवलग मित्र प्रमोद कुर्लेकर यांनी तयार केले आहे.ज्यात दोन प्रेमी पाण्यांवर तरंगत आहे, टिझर मध्ये सुंदर पेंटीग सारख्या व्हीजुअल्स सोबतच कर्णमधूर असं ओंकारस्वरूपचं संगीत आणि सोनू निगमचा आवाज आहे.

# गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर ६,८०० वाहनांची खरेदी

### सोलापूर आरटीओंना मिळाला मोठा महसूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक मुहूर्त आसलेल्या गुढीपाडव्याच्या भमुहूर्तावर सोलापूर जिल्ह्यातील गरिकांनी सुमारे ६ हजार ८५१ हनांची खरेदी केल्याची माहिती आरटीओंकडून देण्यात आली. या वाहनांच्या माध्यमातून शासनाला मोठा महसूल मिळाल्याचेही सांगण्यात आले.

दरम्यान, साडेतीन शुभ मुहूर्तावर सोने, घर, प्लॉट, दुचाकी चारचाकी असे विविध साहित्य आणि वस्तू घेण्याची परंपरा कायम आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूर शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दुचाकी व चार चाकीची मोठ्या प्रमाणात खरेदी केली असल्याचे दिसत आहे. गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सोलापूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे ५ हजार ८३९ चीन वाहनांची नोंदणी झाली असून त्यामध्ये ५ हजार ५५८ हनांमध्ये दुचाकी, कार आदी वाहनांचा समावेश आहे. तर २८१ मालवाहतूक वाहनांची नोंद झाली आहे. अकलूज उपप्रादेशिक वहन कार्यालयाकडे ६०५ नवीन दुचाकी वाहनांची नोंदणी झाली आहे. या मुहूर्तावर २३४ नवीन कार रस्त्यावर आल्या. शेतीसाठी शेतकऱ्यांनी ७४ ट्रॅक्टरची खरेदी केली. अकलूज आरटीओकडे १०१२ इतक्या वाहनांची गुढीपाडव्याच्या दिवशी नोंद झाली.

नवीन वाहनांच्या खरेदीमुळे आरटीओला मोठ्या प्रमाणात रोड टॅक्स मिळाला आहे. त्यातून सोलापूर व अकलूज कार्यालयाचे मार्च अखेरचे आर्थिक इष्टांक पूर्ण झाले आहे. शासनाने दिलेल्या महसुलाच्या उद्दिष्टापेक्षा अधिक महसूल या दोन्ही कार्यालयास मिळाल्याचे कार्यालयाकडून सांगण्यात आले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक . म्हणजे अति लघुकथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (९६) विद्याभारती

स्वातंत्र्यानंतर शिक्षण क्षेत्रात अपेक्षित कायापालट झाला नाही. लेपींशपीं संस्कृतीनी जोर धरला. सरस्वती शिशु मंदिराची संघाने स्थापना केली होतीच, त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला होता. १९७७ मध्ये विद्याभारतीची स्थापना झाली. या अंतर्गत शिशु वाटिका-शिशु मंदिर- विद्या मंदिर - सरस्वती विद्यालय - उच्चतर शिक्षा संस्थान-शिक्षक प्रशिक्षण केंद्र आदि संस्था आहेत. सा विद्या या विमुक्त ये हे याचे बोधचिन्ह (श्रेसे) आहे. याचे देवपुत्र हे हिंदी मासिक सचित्र-प्रेरक- बालमासिक आहे. जे खूपच वाचनीय आहे. याचा संपर्क पत्ता ४० संवाद नगर इंदोर ४५२००१ मध्य प्रदेश. दूरध्वनी (०७३१)) २४००४३९ आहे. आणि विद्याभारतीची ही श्रृंखला जम्मू काश्मीर ते तमिळनाडू आणि केरळ पर्यंत आणि गुजरात तसेच राजस्थान ते मणिपूर आसाम पर्यंत पसरली. अंदमान निकोबार द्वीप समूह मध्ये सुद्धा हे शिशुमंदिर आहे. वनवासी क्षेत्रात विद्याभारतीने विशेष लक्ष घातले. विद्याभारतीच्या सर्वच शाखांमध्ये योग आणि संगीताला अनिवार्य स्थान आहे. अखिल भारतीय खेल कुद हे विद्याभारतीचे एक प्रभावशाली वार्षिक आयोजन आहे. स्वस्थ शरीर स्वस्थ मन हा त्यांचा उद्देश आहे. यांच्या मार्गदर्शक पुस्तिका आणि गीतांच्या कॅसेट सर्वांनाच खूप आवडतात. पुत्र का प्रथम गुरु मातापिता आहेत. त्यामुळे माता-पिता शिक्षा कार्यक्रम विद्याभारतीचे प्रमुख कार्य आहे. या उपक्रमाचे नाव घर प्रथम पाठशाला आहे. या माध्यमातून ग्रामीण- वनवासी सेवावस्तीत आणि शहरात सुद्धा हिंदुत्वाचे वातावरण सफलतापूर्वक निर्माण होते. विद्याभारतीची विशेषता म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांची मूल्यांकन केलेली उत्तर पत्रिका परत पाहण्यासाठी देतात, म्हणजे विद्यार्थी आपले पुनर्मूल्यांकन स्वतः करू शकतो. यामुळे शिक्षकांची दक्षता एवम् निष्पक्षता कळते. विद्याभारती आपल्या विद्यार्थ्यांमध्ये आपला समाज, देश याविषयी प्रेमभाव निर्माण करते. अभिमान जागृत करते .

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### माळशिरस शहराध्यक्षपदी राजू वाघमारे

**नातेपुते, दि. २ एप्रिल-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या सामाजिक न्याय विभाग माळशिरस शहराध्यक्षपदी माळशिरस येथील राजू वाघमारे यांची निवड करण्यात आले वेळापूर येथील गरुड बंगल्यावर आमदार उत्तमराव जानकर, जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. धनंजय साठे, तालुकाध्यक्ष रजनीश बनसोडे यांच्या हस्ते राजू वाघमारे यांना निवडीचे पत्र देऊन पक्षाच्या पुढील कामास शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सोमनाथ तोरणे, माजी पंचायत समिती सदस्य अजय सकट, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष सोमनाथ पिसे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप सरवदे, बंडू साठे, शेखर मिसाळ, सोमनाथ, मिसाळ, नाना मिसाळ उपस्थित होते.



### गायक विलास कुलकर्णी यांच्या मज सांगा हो गुरुराया अल्बमचे प्रकाशन

**अक्कलकोट, दि. २ एप्रिल-**

येथील अक्कलकोट निवासी सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तांसाठी एक भक्तिमय संगीत अल्बम प्रकाशित करण्यात आला आहे मज सांगा हो गुरुराया या अल्बमचे प्रकाशन श्री स्वामी समर्थांच्या प्रगट दिनाच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट येथे करण्यात आले. श्रिया क्रिएशन निमित्त या अल्बममध्ये पाच भक्ती गीते आणि एक गुरु गजर समाविष्ट आहे स्वामींची महती सांगणारी ही गाणी सोलापूरचे गायक विलास कुलकर्णी आणि गौरव कुलकर्णी यांनी गायली असून याला संगीतही विलास कुलकर्णी यांनी दिले आहे. या गाण्यांचे संगीत संयोजन निनाद सोलापूरकर यांनी केले आहे. संपूर्ण ध्वनिमुद्रण पुण्यातील फ्रेंड्स स्टुडिओत करण्यात आले आहे. सोलापूरचे जेष्ठ कवी नारायण कुलकर्णी, माधुरी कुलकर्णी आणि वर्षा हुंजे यांनी अल्बम साठी गीत लेखन केले आहे. अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ वटवृक्ष मंदिरात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर वटवृक्ष देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते मज सांगा हो गुरुराया या अल्बमचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी गीताचे ज्येष्ठ कवी नारायणकाका कुलकर्णी त्यांच्या पत्नी देवस्थानचे सचिव आत्माराम घाडगे विश्वस्त संपतराव शिंदे महेश गोगी यांच्यासह स्वामीभक्त उपस्थित होते.



### उचेठाण-बठाणचा वाळू डेपो कायमस्वरुपी बंद करण्याची मागणी

**मंगळवेढा, दि.२ एप्रिल-**

उचेठाण व बठाण येथील भीमा नदी पात्रातील गाळमिश्रीत वाळू डेपोचा ठेका कायमस्वरुपी बंद करावा तसेच नदीवर अवलंबून मंगळवेढा, भोसे, आंधळगाव पाणीपुरवठा योजनांवर लक्ष देण्याबाबतचे निवेदन प्रांताधिकारी बी.आर.माळी यांना शिवसेना (उ.बा.ठा.) गटाच्या महिला उपजिल्हाप्रमुख क्रांती दत्तू यांनी दिले आहे येथे मंगळवेढा शहर पाणी पुरवठा, भोसे प्रादेशिक पाणी पुरवठा, आंधळगाव पाणी पुरवठा, जलजिवन पाणी पुरवठा व स्थानिक गावचा पाणी पुरवठा महत्वाचा आहे. वाळू पेक्षा पिण्याचे पाणी अधिक महत्वाचे असल्याने या विषयावर गंभीर विचार करुन जिल्हाधिकारी यांनी येथील भविष्यात वाळू लिलाव सुरु होणार नाही याची दक्षता घ्यावी असेही निवेदनात म्हटले आहे. या पात्रातील गाळमिश्रीत वाळू प्रयोगशाळेला पाठवून वाळूत किती गाळ आहे याचे शासनाने मोजमाप करावे म्हणजे या वाळूत गाळ आहे की नाही? हे निश्चित समजून येईल. वाळूमुळेच नदी पात्रात पाणी टिकून आहे. वाळूत पाणी साठवण क्षमता नैसर्गिक असून वाळू उपसल्यानंतर खाली तळाला चोपण भाग लागतो. त्यामुळे पाणीसाठा होणे अशक्य होणार आहे. परिणामी सगळ्यांनाचा भविष्यात पाण्याची भीषणता जावणार असल्यामुळे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी यांनी पाण्याचा गांभीर्यपुर्वक विचार करुन येथील गाळमिश्रीत वाळू डेपो कायमस्वरुपी बंद करण्यात यावा असे निवेदनात म्हटले आहे.

### मुलाच्या त्रासाला कंटाळून पित्याची आत्महत्या

**कुर्डुवाडी, दि. २ एप्रिल-**

मुलाच्या सततच्या शिवीगाळ व मारहाणीच्या त्रासाला कंटाळून वडिलांनी रेल्वेला धडक देऊन गंभीर जखमी होऊन आत्महत्या केली. ही घटना दि. ३१ मार्च रोजी दु.३. ३० ते १ एप्रिल रोजी रा.२ वा सुमारास सापटणे (भो) ता.माढा येथे घडली. बाळासाहेब पाटील असे आत्महत्याग्रस्त वडिलांचे नाव आहे. याबाबत मयताचा थोरला मुलगा निखिल बाळासाहेब पाटील यांनी कुर्डुवाडी पोलिसांत धाकट्या भावाविरुद्ध फिर्याद दाखल केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादीचा धाकटा भाऊ सौरभ बाळासाहेब पाटील याने मला काही जॉब नाही तरी मला काहीतरी उद्योग धंदा करुन द्या, असे म्हणून वडिल बाळासाहेब पाटील यांना शिवीगाळ व मारहाण केली होती. त्याच्या नेहमीच्याच शिवीगाळ व मारहाणीच्या त्रासाला कंटाळून फिर्यादीच्या वडिलांनी मौजे लऊळ (ता. माढा) शिवारात ढोरे वस्ती जवळ रेल्वे पोल नं. ३८६/०६ रुळाच्या जवळ रेल्वेला धडक देऊन गंभीर जखमी होऊन आत्महत्या केली आहे. त्यांना आत्म हत्या करण्यास पूर्णतः सौरभ बाळासाहेब पाटील वय २४ रा.सापटणे (भो) ता.माढा याने प्रवृत्त केले आहे. पुढील तपास पो. उपनिरीक्षक सारीका गटकूळ हे करीत आहेत.

# मंगळवेढा-बोराळे रस्त्यावर उड्डाणपूलासाठी खा. शिंदेंचा पाठपुरावा

## केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून ग्रीन सिग्नल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातून जाणारा रत्नागिरी-नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ मंगळवेढा शहरातून जातो. या म र्गामुळे मंगळवेढा ते बोराळे जाणारा रस्ता बंद झाला आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत, असुन या महामार्गावर बोराळेकडे जाण्यासाठी उड्डाणपूल किंवा अंडरपास करण्याची मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

दरम्यान, यासंदर्भात खासदार शिंदे यांनी मंगळवारी केंद्रीय वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची निवेदन सादर केले आहे. यावर मंत्री गडकरी यांनी सकारात्म क प्रतिसाद दिला असल्याची माहिती प्रणिती शिंदे यांनी दिली. यावेळी त्यांच्या समवेत मंगळवेढ्यातील प्रफुल्ल सोमदळे, आनंद हजारे उपस्थित होते. मंगळवेढा बोराळे रस्त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय मंत्री



गडकरी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली.

सोलापूर लोकसभा मतदार संघातील सोलापूर-कोल्हापूर हा राष्ट्रीय महामार्ग मंगळवेढा शहरातून जातो. या महामार्गाच्या निर्मितीवेळी मंगळवेढा बोराले या रस्त्याच्या अंडरपास अथवा उड्डाणपुलाचा समावेश होणे गरजेचे होते. मात्र तो उड्डाणपूल अथवा अंडरपास अद्यापही न झाल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी नमूद केले.

तसेच सोलापूर हून मंगळवेढा कडे येताना मंगळवेढ्यातील उड्डाणपूलस एकूण सहा रस्ते कनेक्ट होतात, सदर रस्त्याला बायपास रोड देखील कनेक्ट होतो, बायपास वरून लोडेड १६ चाकी वाहने व एसटी देखील उड्डाणपूला खालून जातात यांना व्यवस्थित टर्न घेता येत नाही, त्यामुळे वाहनांची जाताना उड्डाणपुलाखाली कोंडी होते, या बाबीचा देखील या बैठकीत विचार करण्यात आला, यावर गडकरी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत स्वतः जागेवर जाऊन, परिस्थिती पाहून, योग्य ते रस्त्याचे अंतर वाढवावेत, जेणेकरून वाहने व्यवस्थित टर्न घेऊ शकतील आणि सुरक्षित जातील व नागरिकांचा जीव डोक्यात येणार नाही याची दखल घेण्यास आदेश दिलेले आहेत.

> जर या रस्त्यावर उड्डाणपूल किंवा अंडरपास झाला तर वाहतूक कोंडी कमी होईल. रस्ता सुरक्षित होईल आणि ग्रामीण भागातील लोकांना मंगळवेढा शहरात येजा करणे सोयीचे होणार आहे. या बोगद्याच्या काम ासाठी सोलापूर विभागातील महामार्ग प्राधिकरणाने ८४ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार केला आहे. त्या प्रस्तावास तातडीने मंजूरी देऊन ग्रामीण भागातील जनतेची रस्त्याची समस्या सोडविण्याची विनंती खा.शिंदे यांनी यावेळी नितीन गडकरी यांना केली.

# संत दामाजी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, श्री संत दामाजी महाविद्यालय मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने समकालीन समाजात मानवता, वाणिज्य, व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका या विषयावरती एक दिवसीय राष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषदेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या परिषदेमध्ये सुमारे १२० संशोधकांनी हजेरी लावली.



या परिषदेच सुरुवात संस्थेचे संस्थापक स्व.रतनचंद शिवलाल शहा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन श्री विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष राहुल शहा, उपाध्यक्ष भीमराव पाटील, सचिव किसन गवळी व विष्णू चौगुले, संतोष पाटील, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यापीठातील मानव्य विद्या आणि सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे संचालक,प्रो. डॉ. गौतम कांबळे, बीजभाषक शिवाजी विद्यापीठाचे माजी हिंदी विभाग प्रमुख, प्रो. डॉ. अर्जुन चव्हाण, संसाधन व्यक्ती प्रो.डॉ. श्रीकांत चव्हाण व प्रा. अनिकेत ढावरे तसेच महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रो.डॉ. औदुंबर जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

या परिषदेमध्ये सोलापूर विद्यापीठाचे मानव्य विद्या आणि सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे संचालक प्रो. डॉ. गौतम कांबळे, शिवाजी विद्यापीठातील माजी हिंदी विभाग प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण, शासकीय वरिष्ठ महाविद्यालय, बसवकल्याण, बिदर येथील इंग्रजी विभाग प्रमुख, प्रो. डॉ. श्रीकांत चव्हाण, आठल्ये पित्रे सत्रे महाविद्यालय, देवरुख येथील भौतिकशास्त्र विषयाचे प्रा. अनिकेत ढावरे, टी. के. टोपे कॉलेज, परेल मुंबईचे प्राचार्य, प्रो.डॉ. प्रकाश सावंत, डीबीएफ दयानंद महाविद्यालय सोलापूरचे प्राचार्य, प्रोफेसर डॉ.बी.एच.दामजी आदी प्रमुख अतिथींनी समकालीन समाजात मानवता, वाणिज्य, व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे विविध विभागाचे अध्यक्ष फर्ग्युसन कॉलेज पुणेचे प्रो. डॉ. संजयकुमार कोळी, प्रो. डॉ. वामन जाधव, प्रा. डॉ. पंकज पंडागळे, प्रा. डॉ. कसबे टी. एस. व प्रा. पूनम चिंदगे हे होते. या परिषदेसाठी १०० हून अधिक संशोधन पेपर सादर झाले. स्वागत गीत प्रियंका क्षीरसागर हिने गायले.

प्रास्ताविक प्रा.डॉ. राजाराम पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. सुधाकर राठोड यांनी केले. आभार डॉ. संजय शिवशरण यांनी मानले.

# प्रज्ञाशोध परीक्षेत मोडनिंब जि.प. शाळेचे दोन विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २ एप्रिल-**

जिल्हा परिषद सोलापूर,शिक्षण विभागाच्या वतीने इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रज्ञाशोध परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं १ मोडनिंब येथील इयत्ता चौथीमध्ये शिकणारा क्षितिज प्रकाश रणदिवे व इयत्ता सातवी मध्ये शिकणारा यश दीपक बागल यांनी अनुक्रमे तालुक्यात प्रथम व तृतीय क्रमांक पटकावला आहे.





या परीक्षेत जिल्ह्यातील व तालुक्यातील गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांकांच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते लवकरच सोलापूर येथे गौरवण्यात येणार आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना शिक्षक दादासाहेब गायकवाड, मोहन चव्हाण मसुदेव चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. गटशिक्षणाधिकारी विकास यादव, केंद्रप्रमुख डॉ. शिवराज ढाले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा पूनम पाटील, उपाध्यक्ष बालाजी गायकवाड, शिक्षणप्रेमी राजेश निंबाळकर, सर्व सदस्य, मुख्याध्यापक राजन सावंत, शिक्षक वृंद व पालक यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रेल्वेतील चोरी प्रकरणी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि. २ एप्रिल-**

एलटीटी सीबीई एक्सप्रेस (११०१३) या गाडीने दि.२३ रोजी रा.२.२० वा सुमारास पुणे ते कोईमतूर तमिळनाडू असा प्रवास करणाऱ्या बारामतीच्या व्यावसायिकाचा धावत्या गाडीतून त्याच्या झोपेचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने प्रवास्याचा मोबाइलही चोरला आणि बँक खात्यातून सुमारे १ लाख ४३ हजार ५३७ रुपये काढून घेतले. याबाबत व्यावसायिक विवेक अरुण शिळवणे (रा. बारामती) यांच्या उशिराने दाखल केलेल्या फिर्यादीवरुन कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत अज्ञात चोरट्यावर मोबाइल चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी विवेक शिळवणे यांची बारामती येथे स्वतः ची कंपनी असून सदर कंपनीच्या कामासाठी म्हणून ते स्वतः व कामगार बाबुराव शिवाजी जाधव हे एलटीटी सीबीई एक्सप्रेस (११०१३) या गाडीने दि.२३ रोजी रा.२.२० वा बोगी नं बी ४ मधून सीट नं २६ ,२८ वरुन पुणे ते कोईमतूर असा प्रवास करत असताना फिर्यादीने आपला मोबाइल सीट नं २८ च्या बाजूला चार्जिंगला लावला होता. दरम्यान रात्रीची वेळ असल्याने त्या दोघांनाही झोप लागली. फिर्यादीला झोपेतून जाग आली असता त्याला त्याच्या चार्जिंगला लावलेला म ोबाइल दिसून आला नाही. लगेच त्यांनी काम गाराला उठवून सर्व बोगीत मोबाइल बाबत विचारपूस केली परंतू मोबाइल मिळून आला नाही. याबाबत गाडीतील टिसी यांना सांगितले त्यावेळी कुर्डुवाडी स्टेशन सोडले होते ती वेळ पहाटे ४.४५ ची होती. त्यावेळी फिर्यादीला कोईमतूर येथे काम असल्याने त्यांनी कोठेही फिर्याद न देता पुढे कोईमतूरला गेले. तिथे त्यांनी त्यांचे काम आटोपून दि. २४ रोजी रा.८ गाडी नं १६३८२ ने कोईमतूर हून पुण्याकडे निघाले. परतीचा प्रवास चालू असताना दि.२५ रोजी दु.३. वा फिर्यादी ने त्याच्या कंपनीच्या नावे खाते असलेल्या बँक खात्याचे विवरण काढून पाठवण्यास पत्नीला फोनवरून सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादीच्या पत्नीने सदर बँकचे विवरण पतीला पाठविल्यानंतर ते तपासले असता दि.२३ रोजी पहाटे ५ वा. ते दि.२५ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत सदर खातेवरून १ लाख ४३ हजार रूपये रक्कम काढून घेतलेले होते. याबाबत कुर्डुवाडी लोहमार्ग पोलिसांत अज्ञातावर मोबाइल चोरीचा उशीराने गुन्हा दाखल झाला आहे.

# मांजरगाव येथे केळी व ऊस पिकाविषयी मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील निर्यातक्षम केळी उत्पादक व ऊस उदिष्ट शंभर प्लस शेतकरी ग्रुपच्या वतीने मांजरगाव (ता. करमाळा) येथे केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी आयोजित शिवार फेरी कार्यक्रमात शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सोलापूर जिल्ह्यातील बेंबळे तालुका माढा येथील कृषीनिष्ठ शेतकरी सोमनाथ हुलगे यांच्या पुढाकारातून तयार करण्यात आलेल्या निर्यातक्षम केळी उत्पादक व ऊस उद्दीष्ट शंभर प्लस ग्रुपच्या माध्यम ातून सोलापूर जिल्ह्यातील व परांडा इंदापूर तालुक्यातील दोनशेपेक्षा जास्त प्रगतशील शेतकऱ्यांचा ग्रुप केला असून या ग्रुपच्या वतीने शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील केलेल्या प्रयोगाची माहिती इतर शेतकऱ्यांना देण्यात येते.



प्रत्येक महिन्यातील एक तारखेला एका प्रगतशील शेतकऱ्याच्या शेतावर शिवार फेरीचे आयोजन केले जाते मांजरगाव तालुका करमाळा येथील नानासाहेब इंगळे यांच्या केळी शेतावर शिवार फेरी कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात विपणन तज्ञ योगीराज देवकर यांनी शेतकऱ्यांनी केवळ केळी उत्पादन व त्याची विक्री या गोष्टीवर अवलंबून राहता प्रक्रिया व्यावसायाकडे वळण्याची गरज आहे.

यासाठी केळीपासून वेफर्स धाग्यापासून कपड्याने निर्मिती करून पिकाचे मूल्यवर्धन करता येऊ शकते याचा प्रयत्न करण्याची गरज असून या बाबतीत तांत्रिक माहितीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शेतीनिष्ठ सोमनाथ हुलगे यांनी केळीच्या गुणवत्तेसाठी बी.आय. करणे, ट्यागीन करणे, बॅगिंग करणे गरजेचे आहे.शेतीकडे शेतकरी बांधवांनी शेतीकडे उद्योग म्हणून बघितले पाहिजे, असे ते म्हणाले.

निर्यातदार किरण डोके यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यापुढे रशियाची बाजारपेठ काबीज करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे, असे आवाहन केले. यावेळी जैन इरिगेशनचे किरण पाटील प्रयोगशील शेतकरी अंगद पाटील करमाळा बाजार समीतीने संचालक शंभूराजे जगताप यांनी मार्गदर्शन केले.

शेतकरी नानासो इंगळे, संतोष इंगळे चव्हाण अजिंक्य राऊत यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले तर सोमनाथ झोळ यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला संतोष पाटील, प्रदिप चव्हाण, जितेंद्र जावळे, राजेंद्र पटिल, औदुंबर पाटील, ज्ञानराज सुपे, कुणाल पाटिल, सम्राट खानवरे, कल्याण लठ्ठे, अभिजित चव्हाण, मंगेश चव्हाण, सचिन चव्हाण, धनंजय चव्हाण, अमित हुबें तसेच टेंभुर्णी येथील एम. के. देशमुख, महेश देशमुख, रघुनाथ कदम, केशव तळेकर, सरपंच राजेंद्र जगताप, वाय. जे. भोसले, गणेश हुलगे बेंबळे, परिते येथील गणेश बाबर, सागर भोसले, प्रदीप नवले उपस्थित होते.

# तंत्रज्ञान हे समाज उपयोगी असले पाहिजे

## डॉ. सुहास देशमुख; वैरागच्या साई चॅरिटेबल ट्रस्टला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२ एप्रिल-**

तंत्रज्ञान हे समाज उपयोगी असले पाहिजे. सामान्य माणूस, शेतकरी आणि कष्टकरी यांना केंद्रीभूत ठेऊन जेव्हा तुम्ही छोटे संशोधन प्रकल्प तयार कराल तेव्हा खरी क्रांती घडेल, असे प्रतिपादन राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण परिषद नवी दिल्लीचे संचालक डॉ. सुहास देशमुख यांनी केले.

साई चॅरिटेबल ट्रस्टच्या शैक्षणिक संकुलातील बीएएमएस, बीएचएमएस पॉलिटेक्निक आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२५' या विषयावर आयोजित कार्यशाळेत, विद्यार्थ्यांनी मोबाईल, यूट्यूब, चाटजीपीटी या साधनांचा उपयोग दैनंदिन जीवनात कसा करावा याविषयी पुढे बोलताना ते म्हणाले की निरीक्षण करा, त्यातूनच नवीन नवीन कल्पना सुचतात. योग्य दिशेने सतत प्रयत्न केले तर यश हमखास मिळते. आर्टिफिशल इंटेलिजन्स, ऑटोमोबाईल, सोलर हे भविष्यातील जीवन बदलवणारी क्षेत्रे आहेत. एनक्यूआरसारख्या शासनाच्या पोर्टलवर



विविध क्षेत्रातील हजारो कोर्सेस उपलब्ध आहेत. या मोफत कोर्सची माहिती विद्यार्थ्यांनी घ्यावी आणि कौशल्य प्राप्त करावे. डॉ. सुहास देशमुख यांनी आयआयटी मुंबई येथून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये पीएचडी मिळवली आहे. त्यांचे २५ पॅटर्न रजिस्टर असून भारतीय सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाचा 'यंग सायंटिस्ट अवॉर्ड २०१२ त्यांना प्राप्त आहे. महाराष्ट्र शासन आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती मंत्रालय, राष्ट्रीय आर्टिफिशियल इंटेलिजन्स कार्यक्रम, सायन्स आणि टेक्नॉलॉजी मंत्रालय, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय अशा देशपातळीवरील विविध शासकीय संस्थांसाठी त्यांनी आपले तांत्रिक योगदान दिले आहे.

साई चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला भेट देऊन त्यांनी विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक केले. छोट्या वाटणाऱ्या कल्पना जर तुम्ही व्यावसायिक पातळीवर घेऊन जाऊ शकला तर तुम्ही यशस्वी व्हाल. यासाठी लागणारे मार्गदर्शन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे सांगून त्यांनी प्रशिक्षणार्थींना प्रोत्साहित केले.

कार्यक्रमासाठी श्री साई चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक त्र्यंबक डेंगळे-पाटील, अध्यक्ष डॉ. मीरा सूर्यवंशी, उमादेवी देशमुख, साई आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य डॉ. साहेबराव गायकवाड, साई होमिओपॅथी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक अनपट, इंदिरा पॉलीटेक्निकचे प्राचार्य डॉ. डी. आर. पिसाळ साई औ. प्र. संस्थेचे प्राचार्य शाम गोवर्धन, किशोर देशमुख उपस्थित होते.



# पंढरपूर येथील पांडुरंग गवळी या शिक्षकाने गहू उत्पादनात केले रेकॉर्ड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ एप्रिल-**

येथील कवठेकर प्रशाला येथे कार्यरत असलेले पांडुरंग गवळी या शिक्षकाने आठ एकर जमिनीमध्ये १८२ क्विंटल दर्जेदार गहू उत्पादन करून सर्वोत्कृष्ट किंमत मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार उद्योजक संजय येलपले यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी कॅप्टन शामराव लोकरे अभ्यासिकेचे अध्यक्ष डॉ.श्रीधर यलमार व कल्याण गिरी उपस्थित होते. पंढरपूर येथील कवठेकर प्रशालेत कार्यरत असलेले पांडुरंग गवळी यांची शेती मोहोळ येथील अंकोली या गावात आहे.रोज सकाळी शाळा झाल्यानंतर ३५ किलोमीटर अंतर जाऊन शेतीमधील सर्व कामे पांडुरंग गवळी हे नियमित करत असतात. पेशाने शिक्षक असलेले महादेव गवळी हे पंढरपूर येथेच मुक्कामास असतात त्यांना शेतीची आवड असल्याने त्यांनी श्रीराम या वाणाचा गहू करून आठ एकरात १८२ क्विंटल गहू उत्पादन केला.

या दर्जेदार गव्हास प्रति किलो ६२ रुपये किंमत मिळाली आहे. त्याबद्दल त्यांचा पुढील महिन्यात नगर येथे एक लाख रुपये देऊन कंपनीच्या वतीने सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती देखील पांडुरंग गवळी यानी दिली.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आर्या पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २ एप्रिल-**

येथील आर्या पब्लिक स्कूलमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाला २ एप्रिलपासून सुरूवात झाली. त्याचे वार्षिक नियोजन व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे व कृष्णा शिंदे यांच्या आढावा बैठकीने झाले. यावेळी यशस्वी विद्यार्थ्यांचा प्राचार्य प्रा.सागर थोरात यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसेच पी टी उषा योजनेअंतर्गत कला व क्रीडा कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.सर्व विद्यार्थ्यांचे



औक्षण करून गुलाबपुष्पांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले. शाळेला विविध रंगाच्या फ ुग्यांची सजावट केली होती. यावेळी प्राचार्य सागर थोरात यांनी मार्गदर्शन केले. ।कार्यक्रम ।साठी प्राचार्य प्रा. सागर थोरात, संध्या सरडे, म नोज नाटिळक, सारिका यादव, वंदना गोसावी, दत्तात्रय चव्हाण, रागिनी शिंदे, प्रियंका काशीद, शुभम पुरवत, जयदेव गायकवाड, संजीवनी ढोबळे, माधुरी घाडगे, अतुल लंकेश्वर, प्रतिभा आलदर, प्रतीक्षा पाटील यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय चव्हाण यांनी केले.



## संक्षिप्त वृत्त...



### इंग्रजी भाषेतील कौशल्ये अवगत करणे काळाची गरज : ॲड. तुपे

**बार्शी, दि. २ एप्रिल-**

संप्रेषण कौशल्ये विकसित करणे ही करिअरच्या वाटेवरची म हत्त्वाची पायरी असून महाविद्यालयीन काळामध्ये यावर अधिकाधिक भर देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन व्यवहारात मूलभूत संप्रेषण कौशल्ये समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये इंग्रजी या भाषेचे महत्त्व आधारित आहे. इंग्रजी भाषेतील कौशल्ये अवगत करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन ॲड. तुपे यांनी केले. बार्शी येथे गेली सतरा वर्षे ते आस्क-व्हिजन स्पोकन इंग्लिश ॲड ग्रामर ॲकॅडमी अंतर्गत इंग्रजी भाषेचे ते मार्गदर्शन करतात. येथील श्री शिवाजी महाविद्यालय अंतर्गत कर्मवीर स्पर्धा मार्गदर्शन केंद्र यामार्फत स्पोकन इंग्लिश: द नीड ऑफ टाईम या विषयावर ॲड. तुपे यांचे व्याख्यान संपन्न झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.बी. शेख, कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. राहुल पालके उपस्थित होते.



### गणपतराव साठे प्रशालेच्या विद्यार्थ्यांना वैज्ञानिक सागर उकरंडे यांचे मार्गदर्शन

**माढा, दि. २ एप्रिल-**

माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय अविष्कार अभियान उपक्रमांतर्गत अहिल्यानगर डीआरडीओ येथे वरिष्ठ वैज्ञानिक या पदावर कार्यरत असलेले सागर उकरंडे यांनी प्रशालेला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सागर उकरंडे यांचे याच प्रशालेत शालेय शिक्षण घेतले आहे. उकरंडे यांनी आपल्या मार्गदर्शनात शालेय जीवनातील या प्रशालेच्या आठवणी देखील विद्यार्थ्यांना सांगितल्या. एक्स्पर्ट टॉक या उपक्रमांतर्गत सागर उकरंडे यांना आमंत्रित करण्यात आले होते. सागर उकरंडे यांना भारत सरकारकडून युवा वैज्ञानिक देखील पुरस्कार देण्यात आला आहे. माढ्या सारख्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्रशालेत शालेय शिक्षण घेऊन देखील वैज्ञानिक क्षेत्रात उच्च पदावर आपण काम करू शकतो हे सागर उकरंडे यांनी दाखवून दिले आहे. उकरंडे यांनी माढा प्रशालेतून माध्यमिक शिक्षण घेऊन पुण्यातील पीव्हीजी इंजिनीअरिंग कॉलेजमधून मेकॅनिक इंजिनिअरिंग ही पदवी घेऊन डीआरडीओ या देशातील संरक्षण क्षेत्रातील सर्वोच्च संस्थेत वरिष्ठ वैज्ञानिक ग्रेड ई पदापर्यंतचा केलेला प्रवास माढा शहरासाठी गौरवास्पद आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल मुख्याध्यापक नागेश खेडकर यांनी सागर उकरंडे यांचा सत्कार व सन्मान केला. यावेळी सागर यांचे वडील भालचंद्र उकरंडे, आई प्रभावती उकरंडे, भाऊ आकाश उकरंडे प्रशालेचे माजी विद्यार्थी उपजिल्हाधिकारी तथा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे ओएसडी अजित थोरबोले माजी विद्यार्थी प्रितम सावळे उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण शेलार व आभार भरत डुचाळ यांनी मानले.

### प्रा. मोहसीन शेख यांना इनोव्हेटिव टीपीओ पुरस्कार

**पंढरपूर, दि. २ एप्रिल -**



कर्मयोगी इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजिचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मोहसीन शेख यांना महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्सतर्फे राज्यस्तरीय इनोव्हेटिव टीपीओ पुरस्कार प्रदान करण्यात आला. लोणावळा येथे झालेल्या महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्स व विस्डोम करिअर एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. आ.अमित गोखले, लोणावळ्याच्या नगराध्यक्षा सुरेखा जाधव व अभिनेत्री रुपाली भोसले यांच्या हस्ते प्रा. शेख यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस.पी. पाटील, पप्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजिस्ट्रार गणेश वाळके, यांनी प्रा. शेख यांचे अभिनंदन केले.

### पिलीव परीसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

**पिलीव, दि. २ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या परिसरात मंगळवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामध्ये आंब्यांच्या बागांचे तसेच काढणीला आलेला गहु व हरभरा पिकाचे नुकसान झाले आहे. तर वाऱ्यामुळे उभी असणारी कडवळ, मका ही पिके जमीनदोस्त झाली आहेत. अशा अवकाळी पावसामुळे कसल्याही प्रकारचा फायदा नसून या अवकाळी पावसामुळे जास्त नुकसानच होत आहे. यामुळे सध्या शेतकऱ्यांमध्ये अवकाळी पावसाची भिती असून हा पाऊस अजून किती पडतो यामुळे आपल्या हाता तोंडाला आलेल्या पिकांचे नुकसान होते की काय अशी काळजी सध्या शेतकऱ्यांनमध्ये आहे. शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे होणाऱ्या नुकसानीची मोठी धास्ती लागली आहे.

## सोलापूर-चडचण बस सुरू करण्याची मागणी

### मंद्रुपमार्गे गुड्डापूर, जतला जाण्यासाठी सोईचा मार्ग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ एप्रिल-**

महाराष्ट्र व कर्नाटक राज्याला जोडणारा कर्नाटक हद्दीतील उमराणीचा बंधारा तयार झाला आहे. या बंधार्यावरून जड वाहनांसह इतर वाहनांची वर्दळ सुरू आहे. त्यामुळे विजयपूर व सोलापूर महामंडळाने सोलापूर चडचण बससेवा सुरू करण्याची मागणी होत आहे.



सोलापूर बसवनगर- मंद्रुप- निंबर्गी- सादेपूर बंधाऱ्यावरून उमराणीमार्गे कर्नाटकातून चडचणला जाण्यास सोय आहे.

चडचण हा विजयपूर जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ असणारा गाव आहे. याठिकाणी कापड व्यापारासह इतर वस्तू व साहीत्यांची मोठी बाजारपेठ आहे. त्यामुळे पुणे , सोलापूर, उस्मानाबादसह जिल्ह्यातील ग्राहक मोठया प्रमाणात चडचणला जातात. शिवाय येथूनच तीर्थक्षेत्र गुड्डापूर धानम्मादेवी मंदिर आहे. तसेच जतला जाण्यासाठी रस्ता सोईचा आहे. सोलापूर मंद्रुप चडचणम र्गे बससेवा सुरू केल्यास ४० ते ५० किलोमीटर अंतर कमी होणार आहे. शिवाय मंद्रुप परीसरातील शेतकऱ्यांचे धान्य व इतर शेती उत्पादित माल विकण्यासाठी सोय होणार आहे. भीमा नदीवर कर्नाटक सरकारने १३३ कोटी खर्च करून उमराणीचा बंधारा वाहतुकीसाठी खुला झाला आहे. त्यामुळे सोलापूर-विजयपूर दळणवळण वाढला असून बससेवा सुरू केल्यास दोन्ही जिल्ह्याना फायदा होणार आहे. मंद्रुप परीसरातून कर्नाटकाला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. म्हणून सोलापूर मंद्रुपमार्गे चडचण बससेवा सुरू करावे.

> **दोन्ही आमदारांनी लक्ष देण्याची गरज**
>
> इंडीचे आमदार यशवंतगौडा पाटील यांचे दक्षिणमधील नागरीकांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शिवाय ते दक्षिणमधील विविध कार्यक्रमांसाठी नेहमी संपर्क असतात. तसेच दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख हे दक्षिणमधील उत्पादित मालासाठी बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. चडचण बाजारपेठ उपलब्ध झाल्यास दक्षिणच्या शेतकऱ्यांना फायदा मिळणार आहे. त्यामुळे दोन्ही आमदारांनी सोलापूर विजयपूर बससेवा सुरू करण्यासाठी पाठपुरावा करणे गरजेचे आहे.
>
> **- महेंद्र उंबरजे, निवृत्त उपअभियंता, औज (मं.)**

> **शेतकऱ्यांना फायदेशीर**
>
> सोलापूर चडचण बससेवा मंद्रुपमार्गे उमराणी बंधार्यावरून सुरू झाल्यास मंद्रुप परीसरातील शेतकऱ्यांचे धान्य, भाजीपाला, फुले व इतर माल विकण्यासाठी सोय होणार आहे. कर्नाटकात शेतीमालाला चांगला भाव व बाजारपेठ असल्याने बससेवेमुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.
>
> **- संगमेश बगले, सरपंच, लवंगी**

> **गुड्डापूर व जत अंतर कमी होणार**
>
> सोलापूर चडचण बससेवेमुळे सोलापूर व विजयपूर जिल्ह्यातील दळणवळण सुविधामध्ये वाढ होणार आहे. शिवाय दोन्ही जिल्ह्यांमध्ये उत्पादित वस्तू व माल ने-आण करण्यासाठी सोय होणार आहे. गुड्डापूर व जतला जाण्यासाठी अंतर कमी होणार आहे. शिवाय कर्नाटक व महाराष्ट्रातील इतर ठिकाणी प्रवास करण्यासाठी अंतर कमी होऊन पैसा वाचणार आहे.
>
> **- हेमंतकुमार स्वामी,** माजी सरपंच, मंद्रुप

## धनराज हुळ्ळे याचे नवोदय परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २ एप्रिल-**



सन २०२४-२५ रोजी घेण्यात आलेल्या नवोदय परिक्षेत परंपरे प्रमाणे या वर्षीही लाल बहादुर शास्त्री प्रशाला दिंडुरचे यश कायम राखत चि.धनराज मल्लिकार्जुन हुळ्ळे हा विद्यार्थी नवोदयसाठी पात्र ठरला आहे. या निमित्ताने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नागलिंगया स्वामी, उपाध्यक्ष शिवराज स्वामी,सचिव राहुल स्वामी तसेच सर्व संचालक मंडळ व प्रशालेचे मुख्याध्यापक गणेश बंडगर, सिध्दाराम घोडके, कामरय्या स्वामी, नितीन नारायणकर, मल्लिकार्जुन शिवयोगी, राणी बिराजदार, श्रीमती स्नेहल बिराजदार, तसेच धानलिंग मिरजे, सिध्देश्वर पाकणीकर, लक्ष्मण हुळ्ळे, शिवानंद घोडके यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## संग्रामनगरच्या साईबाबा मंदिरात श्रीराम नवमी उत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ एप्रिल-**

श्री साईबाबा सेवा ट्रस्ट संग्रामनगर यांच्या वतीने रविवार दि. ६ एप्रिल रोजी श्री साई प्राणप्रतिष्ठा २८ वा वर्धापन दिना निमित्त श्रीराम नवमी उत्सवाचे आयोजन केले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष किशोर सिंह माने-पाटील यांनी दिली.

श्री साई मंदिर संग्रामनगर येथे श्रीराम नवमी उत्सव मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जाणार असून मंदिरात सकाळी ६ वाजता डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील व उर्वशीराजे मोहिते-पाटील यांच्या हस्ते अभिषेक व महापूजा होत आहे. यावेळी श्रीमती पद्मजादेवी मोहिते पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. सकाळी ८ वाजता विकास भोसले व प्रियंका भोसले यांच्या हस्ते यज्ञ प्रज्वलन होणार



असून सकाळी १० वाजता शिवशंभो भजनी मंडळाचे सामुदायिक भजन होणार आहे. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव व महाआरती सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील व सुलक्षणादेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते होत आहे. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ. एम.के.इनामदार यांच्यासह अनेक म ान्यवर उपस्थित राहणार आहेत.

दुपारी साडेबारा वाजता ओम साई ट्रॅव्हल सराटी यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता खा. धैर्यशील मोहिते-पाटील व शीतलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते आरती होणार असून यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

सायंकाळी ब्रह्मचैतन्य महिला भजनी मंडळ माळीनगर व ओंकार महिला भजनी मंडळ शंकरनगर यांचे भावभक्ती संगीत भजन होणार आहे. शनिवार दिनांक ५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ८ या कालावधीत साई मंदिर परिसरात दिव्यांग, अपंग, गतिमंद, मतिमंद व अतिचंचल मुलावर मोफत निदान व औषध उपचार शिबिराचेही आयोजन केले आहे.

डॉ. रवींद्र शिंदे या शिबिरासाठी मार्गदर्शन करणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहनही ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राम जन्मोत्सवानिमित्त स्वामी विज्ञान केंद्र, लोणावळा केंद्रा अकलूज रोटरी क्लब यांच्यावतीने गर्भसंस्कार शिबिर स्मृती भवन शंकर नगर येथे सकाळी दहा वाजता होणार आहे

## पुंडलीक वरदे हरी विठ्ठल..च्या गजरात नामसप्ताहास सुरवात

### कासेगाव येथे रामनवमीनिमित्त ज्ञाऩेश्वरी पारायण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**कासेगाव, दि.२ एप्रिल-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील विठ्ठल रूक्मीणी मंदीरात रामनवमीनिमित्त दि. १ ते ७ एप्रिल दरम्यान असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानशेवरी पारायण सोहळ्यास मंगळवारी पुंडलीक वरदे हरी विठ्ठल.. च्या गजरात उत्साहात सुरवात झाली. माजी ग्रामपंचायत सदस्य रामहरी चौगुले व मान्यवरांच्या हस्ते वीणापूजन, ग्रंथपूजन करण्यात आले.

जगदगुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे वंशज वै. श्रीगुरू सोपानकाका व वै. श्रीगुरू ज्ञानेश्वर (माऊली) महाराज देहूकर यांच्या कृपाशिर्वादाने विद्यामान वंशज श्रीगुरू बापूसाहेब महाराज व श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा नामसप्ताह सुरू आहे. यामध्ये पहाटे चार ते सहा काकडा, सकाळी सात ते अकरा सामुदायिक श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वीर पारायण, दुपारी १२ ते ३ गाथाभजन, सायंकाळी चार तो पाच प्रवचन, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, रात्री साडेआठ ते साडेदहा हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. या नामसप्ताहात हभप एकनाथ महाराज कदम (गंगेवाडी), हभप शिवाजी महाराज पोतदार (शेळगी), हभप अंगद महाराज चुंगे (पिंपळा), हभप बंडोपंत महाराज कोरे (देगाव),हभप दत्तात्रयमहाराज चव्हाण (हगलूर) व हभप दादा म हाराज रवळे यांची प्रवचनसेवा आहे. तर हभप रामहरी महाराज शेंडगे (वडाळा),हभप वामन महाराज शेळके (सकनाईवाडी), हभप विजय महाराज पवार (ढोकी), हभप मन्मथ महाराज बहिरमल(उळे), हभप हरिभाऊ महाराज शिंदे (सोलापूर) तसेच जगदगुरू तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांची कीर्तनसेवा होत आहे. रामनवमीचे गुलालाचे कीर्तन हभप श्याम महाराज जोशी यांचे तर काल्याचे कीर्तन भारत महाराज चव्हाण यांचे होणार आहे. दि. ७ एप्रिल रोजी दिंडी मिरवणूक, आरती व महाप्रसादाने स्पाताहाची सांगता होणार आहे. या नामसप्ताहासाठी समस्त ग्रामस्थांचे सहकार्य आहे.

## 'जग बदलणारा बापमाणूस' पुस्तकाला पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील युवा लेखक जगदीश ओहोळ यांनी लिहिलेले 'जग बदलणारा बापमाणूस' या ग्रंथास' जागतिक आंबेडकरवादी साहित्य म हामंडळाच्या वतीने 'नेल्सन मंडेला पुरस्कार' प्रदान करण्यात आला. आर्यवृत्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठ त्रिपुराचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश करमाडकर यांच्या हस्ते लेखक जगदीश ओहोळ यांना सन्मान म ानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन नागपुरात गौरविण्यात आले.

'जग बदलणारा बापमाणूस' हे नव्या पिढीला, नव्या भाषेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगणारे मोटिवेशनल पुस्तक आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाच्या दहाव्या वृत्तीचे प्रकाशन अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात झाले आहे. कोलंबिया विद्यापीठात प्रकाशित होणारे 'जग बदलणारा बापमाणूस' हे पहिले मराठी पुस्तक ठरले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे सदस्य डॉ. राजेश गायकवाड, जागतिक आंबेडकरवादी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील सम ाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे, साहित्यिक डॉ. विद्याधर बनसोडे उपस्थित होते.



> डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे, हे 'जग बदलणारा बापमाणूस' पुस्तकाच्या माध्यमातून मांडले आहे. नव्या पिढीने, तरुणाईने या पुस्तकाला खूपच मोठ्या प्रमाणावर प्रेम दिले आहे. १४ एप्रिल २०२५ रोजी या पुस्तकाच्या हिंदी अनुवादित आवृत्तीचे प्रकाशन होत आहे. आजचा हा नेल्सन मंडेला यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार पुढील कार्यासाठी अधिक बळ देणारा आहे.
>
> **- जगदीश ओहोळ,** लेखक व वक्ता

## गावकारभाऱ्यांनी बाशिंग बांधले पण मुहूर्त मिळेना

### ११ ग्रामपंचायत निवडणुकीची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सदशिवनगर, दि.२ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील अकरा ग्रामपंचायतीची मुदत संपून वर्ष झाले. येथील तीन वेळा मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या. परंतु निवडणूक मात्र जाहीर होत नसल्याने गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या गावकारभाऱ्याना प्रतिक्षा करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही.

तालुक्यातील भांबूर्डी, जाधववाडी, खुडूस, डोंबाळवाडी (खु), पिलीव, सुळेवाडी, झिंजेवस्ती(पि.), डोंबाळवाडी(कु), हनुमानवाडी, कदमवाडी, झंजेवाडी(खु.) या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे. या ग्रामपंचायतीच्या




निवडणुकीसाठी मतदार याद्याचे प्रसिद्धीकरण दोन ते तीनवेळा करण्यात आले. नुकतेच २६ मार्च रोजी प्रसिद्धीकरण करण्यात आले. परंतु निवडणूक कार्यक्रम मात्र अद्याप जाहीर झाला नाही. त्यामुळे गावचा कारभार सध्या प्रशासक पहात असल्याने गावच्या विकास कामांचा वेग मंदावला आहे. प्रत्येक गावात अनेक पार्ट्या, गट-तट असतात.गावगाड्याची निवडणूक आपले अस्तित्व दाखविणारी असते त्यामुळे चुरशीची असते. आता जनतेमधून सरपंच निवडला जाणार असल्याने गावात बैठकांना वेग आला आहे. गाव पुढारी इच्छुकांची चाचपणी करीत आहेत. परंतु निवडणूक कधी होणार हे निश्चित नसल्याने प्रत्येक गटाने आपल्या उमेदवारांची नावे अद्याप गुलदस्त्यात ठेवली आहेत.

## मंद्रुप-नांदणी रस्ता दुरूस्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ एप्रिल-**

मंद्रूप नांदणी गावाला जोडणारा दोन किलोमीटर रस्ता खड्ड्यानी भरला असून वाहने चालवताना वाहन चालकांना त्रास होत आहे . रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्यावर नवसाला पावणारा गणेश मंदिर असून गणेश भक्तांची मोठ्या प्रम ाणात ये जा असते. त्यामुळे येथील वर्दळ पाहून मंद्रूप नांदणी रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात येत आहे. रस्ता दुरुस्त करण्यासाठी मंद्रूपच्या नागरिकांनी आ. सुभाष देशमुख यांना दोन वेळा निवेदन दिली आहे.



नांदणी ते गणपती मंदिर पर्यंत दोन किलोमीटरचा रस्ता खराब आहे . गणेश मंदिरपासून नांदणी गावापर्यंत दर्जेदार रस्ता आहे. त्यामुळे वाहनचालकांची गर्दी असते. मात्र मंदिरापासून मंद्रुप पर्यंतच्या रस्त्यावर एक ते दीड फुटापर्यंतचे खड्डे पडले आहेत. शिवाय मुरूम व खडी वर आल्यामुळे वाहने चालवताना अडचणी येत आहेत. अनेक वेळा गाडी घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्यावरून कर्नाटकला जाणाऱ्या व कर्नाटकहून मंद्रूपकडे येणाऱ्या वाहनचालक व प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे नेहमी वर्दळ असते. त्यामुळे हा रस्ता दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे

> मंद्रुप ते नांदणी रस्त्यावर एक ते दीड फूटाचे खड्डे पडले आहेत. शिवाय रस्त्यावर मुरूम व खडी वर आल्याने वाहने घसरून अपघात होत आहेत. नवसाला पावणार्या गणेशमंदिवर व कर्नाटकमध्ये जाण्यासाठी वाहनचालकांना त्रास होत आहे. यासाठी आमदार सुभाष देशमुख यांना दोन वेळा निवेदन दिले आहे. मात्र अद्याप दुरूस्ती करण्यात आली नाही. प्रशासनाने हा रस्ता त्वरित दुरूस्त करावे.
>
> **- सुरेश स्वामी, मंद्रुप**